म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
दा. क. ६९८२

IRBK-0106982
IRBK-0106982

# भाव पल्लवी


अनुक्रम 309
सुमतिबाई शहा
2325
नों. दि.
IRBK-0106982


सुरस ग्रंथमाला, सोलापूर.

प्रथमावृत्ति
१९५८

●

सुरस ग्रंथमाला
पुष्प १९७

●

सर्व हक्क प्रकाशकाधीन

●

चित्रकार
**श्री. चव्हाण**

●

प्रकाशक :
**न. गो. व्होरा,**
सुरस ग्रंथमाला,
सोलापूर.

●

मुद्रक :
**पु. म. गोखले,**
रमेश प्रेस,
७०२ सदाशिव, पुणें २

# म नो ग त

भक्ति हें या पृथ्वीतलावरील दिव्य अमृत आहे. अनेक दु:ख, यातनांचा विसर पडेल, भौतिक जीवनांतील कटु–विषम स्पर्धेतहि प्रगतीचा, सौख्याचा मार्ग दाखवील अशी ती तेजस्वी पणती आहे.

या भक्तीचें स्वरूप ज्ञानेश्वर, तुकाराम, इ. संत, श्री पूज्य–पाद, श्री समंत भद्र, श्री हेमचंद्र आदि मुनि यांनीं अनेक प्रकारें सुस्पष्ट केलें आहे. परंतु भक्ति हा न समजणारा झरा आहे. अखण्ड तेवत राहाणारा नंदादीप आहे. कधींहि न कोमेजणारें पुष्प आहे.

भक्तीचें अधिष्ठान परमेश्वर असला तरी खरें दैवत भक्ताचा आत्माच असते. ज्याचा तोच परमात्मा असतो. कोळशाचा अग्नीशीं संबंध येतांच तो प्रज्वलित होतो. भक्तीच्या संयोगानें भक्ताचें ज्ञान, चारित्र्य उजळून निघतात. ईश्वरापासून तो वेगळा वाटत नाहीं. त्याच्या सर्व क्रियेंत तोच वास करीत असतो.

अशी मौलिक भक्तीच जीवनाला आवश्यक अशी निष्ठा देते. अक्षय निष्ठा देते. कसल्याहि प्रसंगीं ती निष्ठा डगमगत नाहीं. लोभानें किंवा लाभानें ती वाईट कामाला प्रवृत्त होत नाहीं. कस–ल्याहि सम्मोहाच्या व सम्मोहनाच्या ती पलीकडे असते.

अशा नैष्टिक जीवनाची भारतीय उत्थानाला गरज आहे. त्या गरजेची आंशिक पूर्ति करतांना मालेला आनंद होत आहे.

— प्रकाशक

******************************************

# भाव पल्लवी

******************************************

चिंतना

भाव पल्लवी

## : १ : प्रभात

प्रभात झाली अ'हे. दिशा उजळल्या आहेत. पक्षी मंजुळ गाणीं गात आहेत. तो पहा मोर ! आपला पिसारा पसरून नृत्य करीत आहे ! बेहोष होऊन प्रभूची भक्ति करीत आहे.

पाण्याचा प्रवाह मंजुळ आवाज करीत वहात आहे. घरांघरांतून जात्याची घरघर ऐकूं येत आहे. स्त्रिया मंजुळ गाणीं म्हणत आहेत. गवई तालबद्ध सुरांत गाऊं लागला आहे. निर्जीव पदार्थांतूनहि सुंदर निनाद होत आहे.

तुझ्या हृदयांत काय सुरूं आहे? कसले नाना विचार येताहेत? तुझ्यांत विकारांचे कल्लोळ उठत आहेत.

रे मना ! अशा अवस्थेंत मीं प्रभुगुण कसं गाऊं ?

## : २ : दर्शन

सूर्य आपल्या सहस्त्र किरणांनीं प्रभूचें दर्शन घेत आहे. आकाश देखील निरभ्र होऊन प्रभूचें दर्शन घेत आहे. हें सरोवरांतील जल किती स्वच्छ आहे ! आपल्या हृदयांत प्रभूचें प्रतिंबिब असावें म्हणून तें प्रयत्न करीत आहे. पवन साऱ्या जगाला स्वच्छ करून प्रभूच्या दर्शनार्थ धांवत सुटला आहे. रे चंचल मना, तुझ्या अंतःकरणांत सारा अंधार आहे. म्हणून डोळे असूनहि तूं आंधळा आहेस.

ही वनराजी ! किती प्रफुल्ल दिसत आहे ! हिरवा शालू परिधान करून प्रभूला आपल्या फळा-फुलांनी आळवूं लागली आहे. तो हिमालय उत्तुंग धवलध्वजा फडकवुन प्रभूच्या दर्शनार्थ निघाला आहे. तो पौर्णिमेचा चंद्र पिठुरी चांदण्याचा वर्षाव करीत हंसतमुखानें प्रभूचें दर्शन घेत आहे.

पण अंतःकरणांत घोर निराशा समावलेली आहे. अशा मळकट मनानें मी तुला कसा आळवूं.

## : ३ : पावित्र्य

सृष्टींत सर्वत्र सुगंघ भरला आहे. जाई–जुई, बकुल, मोगरा आपापला सुवास सर्वत्र दरवळीत आहेत. गुलाब, चाफा, रातराणी ह्या फुलांनीं स्वत:प्रमाणें आपला सुवास पसरवून सर्वांना सुगंधित केलें आहे. हरीण आपल्या कस्तुरीचा सुवास चोहीकडे पसरवीत आहेत.

सरोवरांतील तें प्रफुल्लित कमळ ! तो केवडा ! आपापला सुगंध प्रभूला अर्पण करून स्वत:स कृतार्थ मानीत आहेत.

तूंच कसा अपवित्र ? तूंच कसा अमंगल ? तुझ्यांतच दुर्गंधी कां भरावी ? रे दुर्गंधी मना ! अशा अमंगल अवस्थेंत आत्मप्रभूचें दर्शन कसें घडेल?

हीं झाडें पाहिलींत कां ? हें आम्रफलाचें झाड ! तें पेरूचें ! हीं तरुराजाचीं पंक्ति, नारळ, केळ, डाळिंब, मोसंबी, बदाम, सफरचंद, द्राक्षें,

नारिंगी इत्यादि झाडांचीं आहे ! आपल्या फलभा-रांनीं तीं सारीच झाडें नम्र होऊन प्रभूचें दर्शन घेत आहेत.

रें अहंकारी मना ! तूंच तेवढा [अहंकारी आहेस ! शालिनतेचा स्पर्शहि कुठें दिसत नाहीं. अशा अवस्थेंत मी आत्मप्रभूचें दर्शन कसें घेऊं ?

● ●

: ४ : **अर्पण**

काजु, खिसमिस, वेलदोडा, पिस्ते, अक्रोड हीं झाडें आपापल्या ओंजळी भरून प्रभूस फलार्पण करीत आहेत. वाटेवरच्या वाटसरूनांहि मुक्त-हस्तानें फळें वाटलीं जात आहेत; पण प्रभू ! मी रिती आहे; कोरडी आहे.

मना ! तुझ्याजवळ असें काय आहे कीं जें प्रभु ग्रहण करतील ?

ही बहुरत्ना वसुन्धरा! आपलीं बहुमोल चित्र-विचित्र रत्नं प्रभूला अर्पण करीत आहे. चराचरांना ती आधार देतें; आसरा देतें! पण त्याचें फल काय मिळतं तिला ? सारे लोक तिला तुडवतात ! पण ती सहनशील आहे ! साऱ्यांना ती पुत्रवत् प्रेम देतें. त्यांच्या दुष्कृत्यांना क्षमा करते ! ती क्षमाशील आहे. म्हणूनच प्रभू तिच्या रत्नांचा स्वीकार करतात !

मना ! तूं अत्यंत लोभी आहेस ! थोडासा त्यागहि तुला सहन होत नाहीं. घेतांना दोन्ही हात पसरवून पुढें सरसावतोस ! देताना मात्र गुर-गुरतोस; लाल होतोस;

अशा अवस्थेंत मी प्रभूला काय अर्पण करूं ?

● ●

## : ५ : औदार्य

हा पहा अथांग सागर ! किती विशाल ! तसेंच खोलहि तितकाच ! आणि गंभीरपण किती दिसतो ! त्याच्या खोल हृदयाचा ठाव तूं कधीं घेतला आहेस ! अनेक बहुमोल मोत्यांचा संग्रह आहे त्याच्यांत-! हे सारे मोती तो प्रभूस अर्पण करतो! त्याचा हार गुंफून प्रभूला देतो ! उथळ पाण्यांतून काय मिळणार ? गारगोट्याच ना ! त्यांच्यांत मोती कधीं मिळाले आहेत ?

गंभीर अंत:करणाच्या, उदार हृदयाच्या सागरांतून मोती मिळणार !

अनेक सद्‌गुणांची तूं खाण आहेस! या तुझ्या बहुमोल गुणांना कशाची उपमा देतां येणार ? पण धीरगंभीर स्वभावाचा तूं असूनहि उथळ होतोस ! अशा वेळीं तुझ्यांतील गुणरत्नांचा लाभ कसा होणार?

क्रोध, असूया इ. गारगोटयांचाच अशावेळीं उद्रेक होणार ! त्यांचीच निर्मिती होणार !

रे मना ! अशा अवस्थेंत मी प्रभूचें दर्शन कसें घेऊं.

● ●

## : ६ : सुवर्ण शलाका

ती पहा सोन्याची खाण! किती मजूर काम करीत आहेत! काय दिसतं तुला तेथें! अरें तें सोनं नाहीं ! माती आहे ! पण त्यांतून सोनं बनतं ! मातीचें सर्व अंश दूर झाले कीं त्यांतूनच सुवर्णाची निर्मिति होते. या सुवर्णाचे अनेक हार तयार करून ती खाण प्रभूस अर्पण करीत आहे.

मना! तूंहि सुवर्णांची खाण आहेस ! तुझ्यातील सम्यक्–ज्ञान म्हणजे शुद्ध सोनंच ! पण तेंच मलीन दिसत आहेस ! अनेक विकारांनीं आणि गृहीत–अगृहीत मिथ्या कल्पनांनीं ते ढगाळलेलं आहे. मिथ्या कल्पना दूर सारून तुझं ज्ञान तूं सम्यक् कां बनवीत नाहींस ! ज्ञानच सुवर्ण शलाका आहे.

अशा अवस्थेंत मी प्रभूचें दर्शन कसें घेऊं ?

● ●

## : ७ : समाधान

तीं काळीभोर शेतं किती दूरवर पसरलीं आहेत ! शेतकरी गाणीं गात गात झाडांना मोटेंनं पाणी पाजीत आहे. त्याचं काम अखंड चालू आहे. त्याला उन्हाची पर्वा नाही, भुकेचीं त्याला ना खंत निं कष्टाचा त्याला ना खेद ! तो ऊंस, ती बहर-लेलीं ज्वारी आणि अमाप पिकलेला तो भात पहा! हें सारं त्याच्या श्रमाचं फळ ! या धान्यांच्या राशी भरभरून तो सर्वांना अर्पण करतो ! सारेजण सुग्रास नैवेद्यानें प्रभूची पूजा करतात ! शेतकऱ्याचं धान्य प्रभूप्रत जातं ! त्याला आपल्या कष्टानं समाधान होतं ! सारं जग शेतकऱ्याला धन्यवाद देतं.

तुला मोठेपणाची हांव आहे आणि तोहि कष्ट न करतां तुला हवा ! झीज न होऊं देतां समाधान हवं ! पण कष्टाविना नि झीज झाल्या-

विना समाधानाला काय महत्व आहे ! तें बेगडी समाधान ठरेल ! निर्मळ मनानें ह्या समाधानाचा उपयोग तुला घेता येणार नाहीं.

अशा प्रमादी अवस्थेंत मी प्रभूला कसं पाहूं ? त्याला कशी आठवूं ?

● ●

संग्रहालय,
अनुक्रम 30755
विभाग
नों. दि.

## : ८ : कृपणता

धन्य ती गाय ! आपल्या वासरालाहि दूर सारून जगाला दूध देत आहे. तिच्या दुधाने प्रभूला रोज अभिषेक होत आहे. त्यागाचा ती आदर्श आहे ! म्हणूनच जग ‘ गोधन ’ म्हणून तिची पूजा करतें. तिचे शेण पूज्य मानलें जातें.

मना, अनंतदान हा तुझा स्वाभाविक धर्म ! पण किती रे तूं कृपण ? या तुझ्या स्वभावामुळेंच तुझें अध:पतन चालूं आहे. तुझ्या कृपणपणाचें किती तरी दृष्टांत आहेत !

रे मना ! अशा अवस्थेंत मी प्रभुपूजा कशीं करूं ?

: ९ :

## थोरपण

गंगा नदीची किती थोरवी ! रत्नाकराला भेटण्यास ती प्रथम किती वेगानें धांवत येतें ! पण पुढे पुढें ती अधिक गंभीर, अधिक शांत नि अधिक पवित्र बनते ! मार्गात सर्वांना मोकळ्या-मनानें ती पाणी देते ! मार्गांतील जमीन सुपीक बनविते ! लोक हजारों घागरीं भरून पाणी नेतात! पण ती कधीं रागावत नाहीं. ती कधी कृपण बनत नाहीं. आपल्या शुभ्र जलानें ती सर्वांना शांत करतें. पण लोक किती कृतघ्न ! गंगेची थोरवी, तिचा उपकार तें विसरतात. तिच्यात केरकचरा टाकतात; नानाविध घाण टाकतात; प्रेतें टाकतात; पण वसुन्धरा-पर्वतकन्या गंगा आपल्या मातेप्रमाणेंच सहनशील ! तीं लोकांचीं सारीं पापं पचवितें ! एवढेंच नव्हे तर त्यांना तीं पवित्र करते, पवित्र गंगा स्वतः पवित्र राहून अपवित्रांनाहि पवित्र करते.

अपवित्राच्या संगतीनें ती अपवित्र बनत नाहीं.

मना ! तुझा आत्मा स्फटिकासारखा स्वच्छ! पण काय तुझी ही अवस्था ! अपवित्रतेच्या नि अमंगलतेच्या मार्गाप्रत तुझी धांव कां ? तुझी सदा तक्रार अशी कीं दुसरें तुला अपवित्र नि अमंगल बनवितात. दुसऱ्यांना दोष देऊन स्वत: दोषमुक्त होणं फार सोपं असतं; समज, दुसऱ्यांनीं तुला बिघडविण्याचा प्रयत्न केला. पण तूं कां बिघडतोस? तूं कां अपवित्र होतोस ? प्रत्येक जीव स्वतंत्र आहे. कोणी कुणाचं अकल्याण करूं शकत नाहीं. तूं आपल्या कर्मामध्यें दंग रहा ! तुझी सेवा निष्काम असूं दे. हजारों बालिकांचें जीवन तुझ्या हातांत आहे. तुझ्या हातीं समाजानें संस्था सोपविली आहे ! चंदनाप्रमाणें तूं झिजतोस ? निष्कामकर्म करतोस ! पण त्यांत अंतिम समाधान मानू

नकोस ! तुझ्यांतील पावित्र्य बिघडवूं नकोस. तुझी संस्था तूं पावित्र्यानें चालवीत असतांहि लोक तुझ्या चित्ताची शांति बिघडवितील. तूं स्थिर रहा. पवित्र रहा. सहनशील राहशील तरच प्रभूचें दर्शन होईल.

● ●

## : १० : सभयता

तुझं दर्शन सर्वाआधीं व्हावें म्हणून मी भल्या पहांटे उठलें. प्रशांत शांतता होती त्यावेळीं! पवित्रता होती ! पक्ष्यांचें शब्द ऐकूं येत नव्हतें. कुकुटांचें आरवणं ऐकूं येत नव्हतं, कोणाचीं गाणीं ऐकूं येत नव्हतीं. तुझ्या मुखाशिवाय कोणाचें मुख दृष्टीला पडूं नये म्हणून कोण माझी धांदल !

मी तुझ्या दर्शनाला निघालें ; पण मला भीति वाटूं लागली. अंधाऱ्या रात्रीं मला

कोणीं अडवेल; माझ्या शरिरावर कोणी वार कर-तील; याची भीति मात्र सतत वाटत होती ! कोणी चोर तरी नसेल ना; संकट तरी नसेल ना! इ० नाना कुशंकांनीं मन गोंधळून गेलं. मी स्त्री पडलें ना ! एकटी कशी निघूं ! अशा नाना कल्पना येत असतानांच मी निघालें, पण.......! माझें मन धैर्य धरेना. पुढें जाववेना.

भिऱ्या मना! तुझा आत्मा निर्भयी असतांना असा कां भिऊं लागलास? आत्म्याला स्त्री, पुरुष वगैरे भेद आहेत का ? समज तुला कोणी मारलं ! तुझ्या शरीराचे तुकडे केले ! पण शरीराच्या नाशा-बरोबर आत्मा नष्ट होईल कां ? आत्मा अमर आहे, निर्भय आहे.

थरथर कांपणाऱ्या अंतकरणानें, भीतीनें गांगरून गेले असतां प्रभूचे दर्शन मला कसें घडेल ?

● ●

## : ११ : शुचिता

आज मी भल्या पहांटें उठलें. सर्वत्र शांत वातावरण होतं. तुझ्या दर्शनाकरितां मी अत्यन्त आतुर झालें होतें. मी डोळें झांकून सरळ तुझ्या दाराजवळ आलें; पण हे प्रभो ! तुझ्या मंदिराचा दरवाजा बंद कसा ? तुझ्या दर्शनाला काय मी पात्र नाहीं ? काय मी पापी आहे ? तुला वाटलें असेल कीं मी स्नान न करतां आलें ? नाहीं, मी स्वच्छ होऊंन आलें ! कपडे सुधौत आहेत. सुधौत शरीर सुगंधी केलें आहे.

प्रभो ! मंदिराचा दरवाजा खुला झाल्याविना तुझें रूप कसें पाहूं ?

मना ! केवळ बाह्य शुचितेचा काय उपयोग? तुझा अंतरात्मा शुध्द कर, शुद्धात्मा दर्पणासारखा आहे; स्फटिकवत् आहे.

अंतर्भूत शुचितेशिवाय प्रभूचें दर्शन कसें घेऊं?

● ●

## : १२ : एकाग्रता

आज मी स्तोत्रपाठ म्हणत उठलें. भक्तिपाठ अत्यंत तालसुरांत म्हणत आलें. एवढेंच नव्हें तर या अवधींत अबाल–वृद्धांना उठवून त्यांनाहि तें म्हणण्यास लावले आहेत. हें संस्कृत श्लोक अत्यंत कठिण ! पण ते शुद्ध म्हणत आलें आहे.

तरी तुझ्या मंदिराजा दरवाजा बंद कां ?

रे चंचल मना! पोपटासारखें नुसते तोंडानें पाठ म्हणून काय उपयोग ?तोंडानें तुझा पाठ चालू असतां तुझें लक्ष कुठं होतें ? याचं तूं अवलोकन केलं आहेस ? त्या स्तोत्रांतील भाव तूं जाणला कां ?

चंचल मना ! मन एकाग्र केल्याशिवाय प्रभूचें दर्शन कसं घेऊं ?

• •

## : १३ : वैभव

भल्या पहांटे मी तुझ्या दर्शनास निघालें ! तुझ्या दरबाराकडे निघालें ! साध्या लोकाधिपतीकडे–राजाकडं–जावयाचें म्हणजे केवढ्या मोठ्या लवाजम्यासह जावें लागतें ? मी तर त्रैलोक्याधिपतीकडे – परमेश्वराकडे निघालें ? म्हणून मी माझा परिवार गोळा केला. नाहींतरी या सर्वांना सोडन मी कसं येऊं ? हे सर्व माझ्या सुखदु:खाचे साथी ! यांत कोणी मला जन्म देणारे आहेत; कोणी पालनपोषण करणारे आहेत; कांहीं माझ्या सुखदु:खांत समरस होणारे आहेत. तसेंच यांत मी ज्याचं पालनपोषण करीत आहें, शिक्षण देत आहे असा शिष्यपरिवार आहे. म्हणजे माझे जन्मदाते, मित्र, हितकर्ते आणि शिष्या हे सर्व माझ्या परिवारांत आहेत. यांना सोडून मी एकटी कशी येऊं ? त्याचं आणि माझं जीवन

एकरूप झालं आहे. अलग अलग अस्तित्व आमचं नाहीं.

ज्याचा परिवार मोठा, ज्याचं वैभव मोठं, ज्याची संपत्ति विपुल अशांकडे साऱ्यांचें लक्ष जातें. मित्रांचे, शेजारचें, गांवाचें, प्रांताचें एवढेंच नव्हे तर सार्वभौम राजाचें पण त्याकडे लक्ष जातें. पण ज्यानीं संसारत्याग केला अशा त्यागीजनांचें पण लक्ष जातं ! मग प्रभो ! तूं तर सर्वांचा अधिपति ! तुझं लक्ष माझ्याकडं चटकन आकर्षित व्हावं म्हणून मी माझा सारा परिवार घेऊन आलें आहे.

मी तुझ्या मन्दिराजवळ आलें; पण दरवाजा बन्द कसा ? काय तुला शंका आली की काय, माझा परिवार लहान आहे म्हणून ? प्रभो ! माझा परिवार मोठा आहे. त्यांत माझ्या घरांतलें

गांवांतलें, प्रांतांतलें एवढेंच काय पण साऱ्या देशांतलें लोक त्यांत आहेत. यावरून माझा परिवार किती विस्तृत आहे हें तुला सहज कळून येईल. या परिवारावरून मी किती लोकप्रिय आहे; लोकनेत्री आहे याची कल्पना येईल.

आतां तरी पाहिली माझी संपत्ति? तरी तुझा दरवाजा बंद कसा? तो उघडल्याशिवाय तुझ्या दरबारांत कशी येऊं? तुझं दर्शन कसं घेऊं?

मना! प्रभूला तुझ्या बाह्य विभूतीची काय गरज आहे. तुझं अंतरंग वैभव दाखव! बाह्यवैभवानें प्रभूचं दर्शन कसं होईल? तूं भाग्यवंत झालास म्हणून तुला भगवन्त भेटेल असं समजूं नकोस. यावद्दल वैभवानें तू तरी सुखी होतोस काय? हें वैभव नैसर्गिक नाहीं; तें नकली आहे. तें तुझ्या कामाचं नाहीं.

तुझ्या खऱ्याखुऱ्या आत्मवैभवाचं दर्शन घडीव ! नाहीं भक्ति, नाहीं भाव तेथें प्रभूचा अभाव ! ही आंतरिक भक्ति व्यक्त कर ! हें आंतरिक वैभव असल्याशिवाय प्रभूचें दर्शन कसें घडेल.

● ●

## : १४ : मनोमंदिर

आज मी मंगल प्रभातीं उठलें नि सरळ तुझ्या दर्शनार्थ निघालें ! पण माझें रितें हात पहातांच मलाच संकोच वाटला. मी शरमून गेलें ! तत्काळ बगीच्यांत जाऊन जाई–जुई, गुलाब, मोगरा इत्यादि सुगंधी फुलं तोडून ओंजळ भरली. आंबे, नारिंग, नारळ, डाळिंब वगैरे फळांनीं चांदीचें मोठें ताट पूर्ण भरलें. जिलेबी, बर्फी, पे`,

बुन्दी वगैरे पंचपक्वानांनीं ताटें भरलीं. घागर भरून दूध आणलें. दही आणलें, जल, गंध, अक्षत, पुष्प, नैवेद्य दीप–धूप, फल व अर्घ्य हीं अष्ट-द्रव्यें मीं आणलीं. हें सर्व वैभव घेऊन मी तुझ्या-कडं आलें. सर्वांआधीं तुझंच दर्शच व्हावं म्हणून मी कोणाकडे पाहिल नाहीं.

हे प्रभो ! हें सर्व माझ्या हातांत मी किती वेळ धरूं ? माझी शक्ती किती आहे हें तूं जाण-तोसच ! असं असून माझी हीं दीर्घ परीक्षा तूं का घेत आहेस ? तुझ्या मंदिराचीं दारं बंद करण्यास तूं कोणत्या माळ्यास सांगितलं आहेस ? तुझ्या मंदिराचा रखवालदार कोण आहे तें; तरी सांग. तूं देवाधिदेव ! तेव्हां तुझ्या मंदिराचा रक्षक मानव प्राणी थोडाच असणार ? तो स्वर्गांतील देवच असणार ! रे प्रभो ! मी आधीं त्याची सेवा करूं

काय ? प्रसन्न होऊन तो तुझ्या मन्दिराचें द्वार उघडेल काय ?

हे प्रभो ! आतां तुझ्या मंदिराचं द्वार उघडण्यास उशीर होऊं देऊं नकोस. उशीर झाला कीं हीं फलं, पक्यान्नं, हीं फुलं कोमेजून जातील. हें सारे पदार्थ शिळे होतील. तें पाहून तूं मला कधींच दर्शन देणार नाहींस.

ह्या बाह्य निर्जीव फला–फुलांनीं व पंच पक्वान्नांनीं कां देव दरवाजा उघडेल ? तुझा आंतरिक बगीचा फुलव. फलव. आंतरिक भक्तीच्या दिव्य रसांत डुंबूं देत तीं पक्वान्नें. नंतरच त्या प्रभूचं दर्नन मला घडेल !

## : १५ : कृपाप्रसाद

मी माझ्या साऱ्या वैभवासह तुझ्याप्रत आलें! सुन्दर सुगंधित फुलं नि फळं घेऊन आलें ! पण तुझं दर्शन घडलं नाही ! तुझ्या अंतरंगांतील भाव मी ओळखले. माझ्या वैभवाचा नि डामडौलाचा तुझ्यावर विपरीत परिणाम झाला हें मी ओळ-खलं ! देवत्वाच्या प्राप्तीसाठीं डामडौल निरुपयोगी आहे याची मलाहि कल्पना आली ! सुन्दर व सुवा-सिक फुलानीं आणि फलांनीं भुलन देवाची प्राप्ती होतें ही माझी वेडगळ समजूत मला कळून आली.

संपत्तीनें–वैभवानें तुझी पूजा आतां करणार नाहीं. त्यानं तुझी प्राप्ती होणार नाहीं; अन् वैभवालाच तूं भुलतोस असं एकदां सिद्ध झाल कीं, गरिबांच्या मनांत ईर्षा निर्माण होईल; धन-हीन लोकांमध्यें तुझ्याविषयीं अनादर निर्माण होईल; त्यांच्या चटणी–भाकरीचा अनादर होईल.

याचा परिणाम म्हणून ते तुझी पूजा सोडून देतील. तुझ्या कृपाप्रसादाविषयी त्याच्यांत संशय निर्माण होईल. म्हणून रे प्रभो ! आज तुझी साधीच पूजा करणार आहे मी.

अजूनहि तुझ्या मंदिराचं दार बंद कां ? तें उघड ना ! तुझ्या दरबारीं येण्यासाठीं तुझ्या द्वारीं मी तिष्टत उभी आहे. कृपा कर. मंदि–राचा दरवाजा उघड ?

चंचल मन ? अजून तुझं लौकिक व्यवहारांत लक्ष आहें ? बाह्य वस्तूंचं अवडंबर माजवून त्यानें प्रभूच्या मनास भुरळ पाडून त्याचें दर्शन घेऊं इच्छितोस ? बाह्य वैभव आणण्यापेक्षा क्रोधादि विकल्पांचा त्याग करून सद्‌गुणाचं वैभव घेऊन ये. त्यानंच तुला प्रभू भेटेल. अन्तरंग स्वच्छ केल्या-शिवाय मी प्रभूचं दर्शन कसं घेऊं ?

## : १६ : देवत्व

तुला वाटत असेल कीं मला वैभवाची धुंदी चढली आहे. संपत्तींतच मी गुंग आहे. तिचं प्रदर्शन करणं मला आवडतं असं तुला वाटत असेल; पण आतां माझी धुन्दी पार उतरली आहे. डामडौल कोसळून पडला आहे. पण मी आतां या साऱ्या वैभवाचा त्याग करतें. सारी आभूषणें फेकून देतें. सगळी संपत्ती दान देऊन टाकतें. हजारों गरिबांचे भलें होईल असं करतें. त्यांच्या कल्याणाकरितां झटतें. गरिबांच्या सेवेला सारं घरदार आणि वैभव अर्पण करतें. दीन, दुःखी लोकांच्या सेवेंत; आजाऱ्याच्या शुश्रुषेंत मी सतत माझी काया झिजवीन; पतिताच्या उद्धारास्तव तनमनधनानें मी प्रयत्न करीन, यासाठीं मी अभिमान धरणार नाहीं. सेवेच्या या पवित्र कार्यास्तव अहंकाराचा स्पर्श मला होऊं देणार नाहीं. परोप-

काराचा टेंभा मिरवणार नाहीं. प्रसिद्धी मिरविणार नाहीं. माझं नांव, गांव न समजूं देतां प्रसिद्धि-पराङमुख होऊन अन्धारांत राहून मी सेवा करीन.

रे प्रभो प्रत्येक मानवांत, पशु–पक्ष्यांत आणि झाडां–झुडुपांतहि तुझा निवास आहे. कृमि-कीटकांतहि तुझं अस्तित्व आहे. त्यांची सेवा म्हणजेच तुझी सेवा असं मी समजेन.

रंजल्या गांजल्यांची सेवा म्हणजे तुझी सेवा, असं तुझ्या रखवालदारानं मला कळविलं आहे. म्हणून साऱ्यांना समान लेखून, साऱ्यांत वसत असलेल्या परमेश्वरास स्मरून मी सेवेला आरंभ केला आहे. रे प्रभो, माझ्या परिवर्तनाची तुला मी कल्पना दिलीं आहे. तेव्हां आतां तरी दार उघड. किती वेळ माझी परीक्षा पहाणार तूं ? प्रभो, तुझ्या मंदिराचा दरवाजा उघड; असंख्य लोकांना तू

दर्शन देतोस; मग माझीच कां तूं परीक्षा पहात आहेस ?

मना , सर्व मानवांत, पशुपक्ष्यांत देव आहे; एवढेंच नव्हे तर ते पवित्र जीव म्हणजेच देव. रंजल्या-गांजल्यांची म्हणजेच परमेश्वराची सेवा करण्याचं मी ठरविलं आहे. त्या दृष्टीनं सुरवात झाली आहे. कार्यास प्रारंभ झाला आहे.

पण एवढयानें कसं भागेल ? देवत्वाची प्राप्ती कशी होईल ? कार्याची सुरवात म्हणजे कांहीं शेवट नव्हे.

माझे शुद्ध विचार अखेरपर्यंत राहिले पाहिजेत. तुझं कार्य शेवटपर्यंत टिकलं पाहिजे. त्याशिवाय तुला प्रभूचें दर्शन कसें होईल ?

● ●

## : १७ : सेवा

मी सेवा करावयास निघालें. हरिजन वस्तींत गेलें; मजुरांच्या चाळींत फिरलें; भंगीं वस्तींत हिडलें; आंधळ्या–पांगळ्यांकडे गेलें. इस्पितळांत जाऊन रोग्यांची विचारपूस केली.

ह्या सर्व दीन दुःखी जीवांकडे पहिल्यानंतर मला भडभडून येते ! त्यांच्या सेवेस माझी शक्ति अपुरी पडते. माझ्याजवळ ना अलोट पैसा, व कसलं बल ? काय म्हणून मी सेवा करूं ? कशी करूं ? कोटयवधि रुपये देखील अपुरें पडतील. हजारों माणसांची सेवा देखील अपुरी पडेल ?

मनांत येतं, जगांत इतके दुःखी, अनाथ जीव कां निर्माण झाले ? कसे निर्माण झाले ? यांच्या दुःखास कारण तरी कोण ? ते स्वत: ? समाज ? राष्ट्र ? कोण आहे कारण ?

त्यांना पाहुन माझं अंत:करण द्रवतं ? माझे

डोळे अश्रूनीं भरून येतात. माझ्यांतली शक्ति नाहींशी होते. मन निराश होतें. हातपाय थंड पडतात. या दु:खी जगाचा कायमचा निरोप घ्यावा असंहि वाटूं लागतें.

तूं एकदां तुझ्या मंदिराचं दार उघड. डोळें भरून एकदां तुला पाहूं दे. तुझ्या दर्शनानें माझ्या निराश मनाला स्फूर्ति मिळूं दे; आनंद मिळूं दे. म्हणजे माझ्या अंगीकृत कार्यांत मला चालना मिळेल; जिवंतपणा येईल.

मना, तूं विश्वाची सेवा करीत आहेस. पण त्याकरितां तुझ्या मनांतील सर्व विकार काढून टाकावे लागतील. वीतरागी बनावं लागेल; ज्ञान संपादन करावं लागेल.

तुझी शक्ति अपुरी आहे. तुझी सहनशीलता अपुरी आहे.

हें कार्य मोठं आहे. आतांच तूं निराश झालास तर प्रभूचं दर्शन तुला कसं घडेल ?

● ●

## : १८ : मृत्यू

अथांग सागरांत पाणीच पाणी दिसावं तसं जगांत सर्वत्र दुःखच भरलं आहें असं दिसतं. अंतराळांत सर्वत्र आकाशच दिसावं तसं जगांत दुःख भरून राहिलं आहे. दुःखी लोकांचं दुःख दूर करावं त्यांचें अश्रु पुसावेत; त्याचं सांत्वन करावं असं मला सतत वाटूं लागलं आहे,

आज मी तुझ्या दर्शनाकरिता घाईघाईनें निघालें. पण रस्त्यांत मला एक भेसूर दृश्य दिसलं. मी थबकलें. जवळ गेले. अनेकजण ऊर बडवून बडवून

रडत होतें. दुःखानें बेहोष झालें होतें. एक भरदार शरीरयष्टींचा, तारुण्यानें मुसमुसलेला मनुष्य जमिनीवर पडला होता. त्याच्यामोंवतीं बसून अनेकजण शोक करीत होते. तो पुरुष गतप्राण झाला होता; त्याचं सारं कुटुम्ब दुःखी झालं होतं. त्याची तरुण पत्नी तर भयंकर दुःखी झाली होती. तिचा गोजीरवाणा बाळ जवळच झोपला होता. त्याच्या भवितव्यतेच्या प्रश्नानं तर ती अधिकच शोकाकूल झाली होती.

मी त्याचं समाधान केलं. दुःखभार हलका केला. संसाराच्या अश्वाश्वतेची जाणीव करून दिली. अधिक दुःख केल्यानें संसाराच्या वृक्षास विषारीं फळंच येतील हे समजावून सांगितलं. त्यांच्या दुःखांत समवेदना दर्शविली. त्याचं दुःख क्षणभर तरी दूर झालं असं मला वाटलं.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
30754
अनुक्रम ५.५१
विभाग २०२५
क्रमांक
नों. दि. ३/१/७५

ही सेवेची हकीकत तुला सांगावी म्हणून तुझ्याप्रत निघालें ! पण तुझा दरवाजा पूर्वीप्रमाणें बंद ! माझ्या सेवेचं फल हेंच काय ? माझ्या परिश्रमाचं बक्षीस हेंच काय ? अजूनहि तूं माझ्यावर अप्रसन्न कां ?

सुख आणि दु:ख यांचा निर्माता ज्याचा तोच आहे. प्रत्येक व्यक्ति निराळी. तिची प्रकृति निराळी. तिचीं सुखदु:खं निराळीं. ती कोणी निर्माण करूं शकत नाहीं. त्यांच्या दु:खांत नि सुखांत समभागी होण्याची भावना ही व्यावहारिक. आत्मिक शुचितेसाठीं केलेली सेवा हीच फलदायी होईल. कुणाच्या सुखांत–दु:खांत तूं आपलं सुखदु:ख समजतोस हाहि व्यवहारच ! तूं दीपासारखा हो. प्रकाश दे; 'मार्ग मात्र ज्याचा त्यानेंच शोधायचा असतो.

● ●

## : १९ : सेवा

तूं सर्वत्र भरून आहेस ! मुलाच्या हास्यांतून तुझं दर्शन घडतं; मातेच्या प्रेमांतून तुझं अस्तित्व दिसतें; पित्याच्या वात्सल्यांतून तूं प्रकट होतोस. प्रेमळांच्या मायेंतून तूं आम्हांला दिसतोस, प्रत्येक प्राणिमात्राची सुकृति दर्शवितें कीं त्या प्रत्येकांत देवत्व–ईशत्व आहे. पशु, पक्षी, वृक्ष, वेली, यांतही देवत्वाचें अंश आहेत. त्याशिवाय कां तें उपकारकर्तें बनलें आहेत ?

प्रभो ! आज मी जंगलांत जाऊन तुझं दर्शन घ्यावं असं ठरविलं. मंगल प्रसंगीं तुझ्या दर्शनास निघालें. नुकतांच अरुणोदय झाला होता ! रात्रीं पडून गेलेल्या पावसानें वृक्ष, वेली टवटवीत दिसत होत्या. सोनेरी सूर्यप्रकाशांत त्यांचें प्रत्येक पान चमकून दिसत होतं. आसपासचे डोंगर सोन्यानें मढविल्याप्रमाणें भासत होते. सुखद वारा अंगाला

स्पर्श करून जात होता. फुलांचा सुगंध सर्वत्र दरवळला होता. त्यामुळें अत्यंत प्रसन्न चित्तानें वाट कापीत मी चाललें होतें. आजुबाजूचें वृक्ष नम्र सेवकाप्रमाणें माझं स्वागत करीत होतें. त्या लहा-नशा जंगलांत एक सुंदर सरोवर होतं. नुकतीच कमळं फुललेलीं होतीं. सरोवराभोंवतीं अनेक पक्षी विहरत होतें. कांहीं सरोवरांवर उडत होते. त्या-वेळीं त्यांची आकाशांत दिसत असलेली माळ, मनाला भुरळ पाडीत होती.

मी तशीच पुढें चाललें. थोडं अंतर चालून गेल्यावर मला एक झोपडी दिसली. जवळ जाऊन पाहिलं ! आंत एक जोडपं जेवण करीत होतं ! त्यांच्याकडं माझं लक्ष गेलं ! त्यांनीं हंसून माझं स्वागत केलं ! आपल्या चटणी-भाकरीचा प्रसाद घेण्याची विनंती केली ! त्याची झोपडी कित्येक

ठिकाणीं भग्न झाली होती. त्यांच्या फाटक्या कपड्या-मधून अनेक ठिकाणीं त्याचं उघडं अंग बाहेर पडूं पहात होतं. मी विचार केला, " हे लोक किती दु:खी असतील ? " ना यांना गगनचुंबी घर, ना त्यांच्या नानाविध इच्छा पूर्ण करणाऱ्या वस्तू! पण त्यांच्या आनंदी चेहऱ्यावरून नि सुखद जीवनावरून हे दु:खी असतील असं वाटणं चूक ठरलं असतं. ते दोघेहि मजेंत होते. अनेक ठिकाणीं भग्न असलेली झोपडी होती म्हणून त्याची खंत त्यांना वाटली नाहीं किंवा साधा चटणी–भाकरीच खावी लागते म्हणून त्यांचा खेदहि वाटला नाहीं. त्यांची सेवा करण्याची इच्छा झाली ? पण काय करूं त्यांची सेवा ? दु:ख नांवाची चीजच त्यांच्या बोलण्यावरून दिसून येत नव्हती. त्यामुळें मी निराश झालें. म्हणून उभयतांनीं मला विचारलं, "माताजी!

आपणांस कसलं दु:ख आहे ? " आपण एकाकी या जंगलांत कशा ? आम्ही आपली काय सेवा करावी ? "

कांहींहि परिग्रह नसूनहि त्यांचं सुख कोणी हिरावून घेतलं काय ? त्यांचा संतोष कुणी काढून घेतला आहे ? संतोष बाळगणें, समाधानी असणं हाच तर तुझा धर्म आहे. अनेक गोष्टीं तुझ्याजवळ असूनहि तूं दु:खी आहेस; तूं विव्हळतोस.

अशांत, अस्थिर आणि अस्वस्थ मनानें मला कां प्रभु मला भेटेल ?

● ●

## : २० : उलगडा

तुझ्या दर्शनाभावीं निराश होऊन मी दूर दूर चाललें. मला माझ्या रहात्या गांवाचा वीट आला. मी स्टेशनवर गेलें. थोड्या वेळानें गाडी आली. मी त्यांत बसलें नि माझा प्रवास सुरू झाला. वेगानें जाणाऱ्या गाडीबरोबर माझं विचारचक्रहि आपो-आप फिरूं लागलें. इतक्यांत मंजुळ आवाजाची लकेर आली. माझं विचारचक्र थांबले. डोळे वर करून मी पाहूं लागले. एक भिकाऱ्याचं पोर गाणं म्हणून भीक मागत सुटलं होतं. गाणं म्हणतां म्हणतां ईश्व-राला डोळे भरून पाहिल्याचं समाधान मानीत होतं तो मुलगा आंधळा होता. त्याच्या गाण्यावर लुब्ध होऊन लोकांनीं पैसा पैसा दिला. मुलाच्या वाटींत पांच मिनिटांत रुपया जमा झाला. माझं कुतुहल जागं झालं. मी त्याला विचारलं.

" आंधळ्या, तूं सुखी आहेस कां ? "

" माई ! मला कसलं दुःख आहे ? आंधळा असलो तरी माझ्या भजनांत नि कवनांत देव दिसतो. त्याला डोळे भरून पहातांच माझ्या अन्तःकरणांला किती समाधान वाटतें ! अन् पोटाची खळगी माझ्या भक्त प्रवाशांनीं दिलेल्या पैशापैशावर भरतें. यापेक्षां मला जास्त काय हवं आहे ? "

मी आश्चर्यानें थक्क झालें. आंधळ्याच्या दुःखाचं कोडं उलगडून त्याला सुखी करण्याच्या हेतूनं त्याला मी प्रश्न केला; पण आपल्या सुखी जीवनाचं त्यानं माझ्याच दुःखाचं कोडं त्यानं उलगडलं, माझ्या अंतर्मनाची खळबळ थांबविली.

● ●

## : २१ : कर्म

तुझ्या दर्शनाकरितां निघालें. झपझप पावलं पडत होतीं. अनेक शेतं पायाखालीं घालून मी पुढें पुढें जात होते. रस्त्यांत एका शेतांत एक शेतकरी नांगरत असतांना दिसला. सूर्योदयापूर्वीहि त्याचं काम चाललेलं पाहून मला त्याची करुणा आली.

मी विचारलं, " रे कृषीवला ! तूं किती कष्टांत आहेस ? किती दुःखी आहेस तूं ? तुला कांहीं मदत हवी कां ? " तो म्हणाला, " बाईसाहेब ! यांत दुःखं कसलं ? माझ्या शेतांतल्या कष्टांत माझं सुख दडलेलं आहे. रात्रीच्या पोटांत उषेनें निवास करावा तसं माझ्या या श्रमांत माझीं नि माझ्या मूलाबाळांची सुखं दडलेलीं आहेत. शेत नांगरणं, त्यांतून धान्य काढणं आणि ते जगास–परमेश्वरास अर्पण करणं हें माझं स्वाभाविक कार्य

आहे. तो माझा धर्म आहे. तें स्वभावनियत कर्म आहे. निष्काम भावनेनं नि अनासक्तीनें तें करणं हें माझं कर्तव्य आहे. जगांत कर्तव्य–पूर्तीच्या आनंदा-पेक्षां श्रेष्ठ असा आनंद नाहीं. बाई ! मी दुःखी नाहीं; पूर्ण सुखी आहे. बाई ! एवढ्या पहांटें आपण कुठें निघालांत ? ”

कृषीवलाच्या उत्तरानें मी आश्चर्यचकित ःरें; दिग्मूढ झालें. त्याचं म्हणणं माझ्यापुढें सतत नाचूं लागलं. त्याचें बोल पुनः पुनः आठवूं लागलें, “ स्वभावनियत कर्म करा; तें निष्कामपणें करा; आसक्ति ठेवूं नका ” हाच त्याचा म्हण–ण्याचा अर्थ !

तुमच्या वाट्याला आलेलं कार्य–मग तें लहान असो कीं मोठें असो; श्रेष्ठ असो किंवा कनिष्ठ असो करीत चला. त्यांत रस घ्या. अशा वेळेला

प्रभु तुमच्या साहाय्याला आल्याशिवाय राहाणार नाही. त्यांतच तुम्हांला प्रभूचें दर्शन घडेल. कृषिवलाचें ते शब्द ऐकून मी थक्क झालें.

दुसऱ्याला सुखी करण्याचा नाद सोड ! स्वतःच दुःखी असणारा दुसऱ्याला काय सुखी करणार ? तूं अज्ञानी असतांना दुसऱ्याला ज्ञानाचा प्रकाश काय दाखविणार ? तूं स्वतः दुर्बळ असतांना दुसऱ्याला काय साहाय्य करणार ? तेव्हां तूं स्वतः परिपूर्ण होण्याचा प्रयत्न कर ! दुसऱ्याच्या चिंतेंत व्यर्थ वेळ घालवूं नकोस.

## : २२ :

## प्रभु–दर्शन

तुझ्या दर्शनार्थ येत असतां आज रस्त्यांत मला एक भंगीण भेटली. तिची ती दयनीय अवस्था पाहून मला तिची करुणा आली. मी तिच्याजवळ गेलें ! तिच्या सुरकतलेल्या चेहऱ्यावरून मला दुःखाचा लवलेशहि सांपडला नाहीं. उलट ती समाधानी दिसली. मी तिला म्हटलं,

" बाई ! हा धंदा सोड. किती त्रास होत असेल तुला ? "

" बाईसाहेब ! " ती म्हणाली, " हा माझा धंदा वर्षानुवर्षं चालला आहे. माझा पिढीजात घंदा आहे हा ! हा करतां करतां माझाहि जन्म संपत आला. माझ्या आयुष्यांत हें कार्य करीत असतां दुःखानं कधीं स्पर्श केला नाही. लोकांचा घाण उपसणं नि त्यांचीं जीवनं शुद्ध करणं हें काम थोडंच वाईट आहे ? जणुं प्रभूनेंच माझ्याकडें हे

कार्य सोंपविलं आहे. लोकांची ही सेवा करतां करतांच हें माझं थकलेलं शरीर गळून पडलं तर त्यांत मला आनंदच आहे. हें कार्य मी सोडून दिलं तर प्रभु माझ्यावर नाराज होतील; त्यांची भक्ति कमी होईल. बाईसाहेब ! तुम्हीं कुठं निघालात ?"

" प्रभूच्या दर्शनास. "

माझ्या उत्तरानं ती गोंधळांत पडली. आपल्या कार्याशिवाय इतरत्र प्रभू आहे या कल्पनेनं गोंधळली. ती म्हणाली. " बाईसाहेब ! तुम्ही चालविलेल्या महान कार्याशिवाय इतरत्र देव आहे ? तुमच्या कार्यात तुम्हांस अजून प्रभु दिसला नाहीं ? मग तुमचं कार्य निरलसपणें चालत नसेल ! कांहीं तरी त्यांत दोष आहे. कर्तव्याची जाणीव ठेवून निरलसपणें केलेल्या कार्यातच प्रभु भेटतो. त्यासाठीं तुमची ही निराळी धडधड नको, वेगळा वेळ नको. "

● ●

## : २३ : सुश्रुषा

आज तुझ्या दर्शनास निघालें असतां रस्त्यांत आज एक रुग्णालय दिसलें. मी आंत गेलें. तेंथें एका खोलींत कॉटवर एक रोगी झोंपला होता. त्याच्या हातांत वर्तमानपत्र होतं. तें वाचण्यांत तो गुंतला होता. मी त्याच्याजवळ गेलें. त्यानें प्रश्नार्थक मुद्रेनं माझ्याकडं पाहिलं मी म्हटलें,

'तुम्हां रोग्यांची सेवा करण्याकरितां मी आलें. तुमचं दु:ख थोडंबहुत दूर करण्याकरितां आलें आहे. डॉक्टर तुमचीं सेवा करतात हें पाहून मला आनंद झाला. त्यांची थोर सेवा पाहून मला आनंद झाला. मीहि आलें.' तो रोगी खिन्नपणें हंसला. नंतर तो उदासपणं म्हणाला,

" बाई ! कशाला आला तुम्ही येथें ! हा सर्व देखावा आहे ! जगांत पैसा बोलतो आहे. जगांत सर्वांत अधिक किंमत आहे पैशाला. सर्वांत

मोठा रुपया आहे. म्हणून तर या दायी नि हे डॉक्टर मला हातवरल्या फोडाइतके जपतात. बाई ! पैशानें या भौतिक जगांत] वाटेल तीं कामं होतात. यांच्या अंत.करणांत खरी दया असती तर मी केव्हांच घरीं नीट होऊन गेलों असतों. अंत:–करणाचा ओलावा दिसला असतां तर त्यांच्यातला परमेश्वर मला केव्हांच भेटला असता ! बाई ! आमचं दु:ख तुम्ही कसं दूर करणार ? आमची कोणती सेवा तुम्ही करणार ? बाई ! सेवेच्या नांवाखाली कोणाची सेवा करूं नका ! आपलीं सेवा अज्ञात असावी ! ती बोलून दाखवितां कामा नये. खऱ्या सेवेला मोबदला नसतो. ती अनमोल असते. खऱ्या दयेनें प्रेरित होऊन तन, मन, धनानं केलेलं कोणतेंहि कार्य म्हणजे सेवाच होय. कीर्तीची अपेक्षा बाळगून, नांवालौकिकाची हांव धरून केलेंलं कार्य म्हणजे सेवा नसून दंभ आहे असं समजा.

## : २४ : सौख्य

आज तुझ्या दर्शनार्थ निघालें असता रस्त्यांत एक महिला भेटली. पाण्याची भली मोठी घागर घेऊन ती चालली होती. ओझ्याच्या भारानं ती वाकल्यासारखी दिसत होती. मला तिची दया आली. मी विचारलें,

" हे दु:खी भगिनी ! एवढ्या प्रात:कालीं पाण्यानें भरलेला ही मोठी घागर घेऊन कुठं चाललीस ? "

" बाई ! मी दु:खी आहे हें कसं कळलं तुम्हांला. ही घागर घेऊन मीं घरीं चाललें आहे. स्वयंपाक करणं, भांडीं धुणं, कपडे धुणं, मुलांना व पतीला जेऊं घालणं इत्यादि बरीच कामें पडून राहिलीं आहेत माझी. म्हणून मी पाणी घेऊन चाललें आहे. "

मी म्हटलं, " बाई ! सकाळपासून संध्या–

काळपर्यंत ही कामं चालणार तुमचीं ? मग तर तुम्ही फारच थकून जात असाल ! फारच दुःखी असाल तुम्ही ? सुखाचा क्षण कसा असतो हें तुम्हांला ठाऊकहि नसेल. बाई ! मी तुम्हांस कांहीं मदत करूं ? "

माझ्या बोलण्यानं ती हंसूं लागली. ती म्हणाली,

"बाई! मी आर्य स्त्री आहे. मला दुःखाचे क्षण कसे याची कल्पना नाहीं. माझ्या कार्यांत मला सतत आनंदच मिळतो. माझे पति किती प्रेमळ आहेत ! त्यांच्या सेवेंत असतांना मीं स्वतःला धन्य समजतें. किती सुख मिळतं त्यांत मला! दुःखाचा लवलेशहि नसतो त्यांत. तशीच ती माझी गोजिरवाणीं मुलें. जणूं देवांचाच अवतार ! त्यांच्या हास्यांत मला देव दिसतो! त्यांना सांभाळतांना, जेवूं घालतांना,

## : २४ : सौख्य

आज तुझ्या दर्शनार्थ निघालें असता रस्त्यांत एक महिला भेटली. पाण्याची भली मोठी घागर घेऊन ती चालली होती. ओझ्याच्या भारानं ती वाकल्यासारखी दिसत होती. मला तिची दया आली. मी विचारलें,

" हे दुःखी भगिनी ! एवढ्या प्रातःकालीं पाण्यानें भरलेला ही मोठी घागर घेऊन कुठं चाललीस ? "

" बाई ! मी दुःखी आहे हें कसं कळलं तुम्हांला. ही घागर घेऊन मीं घरीं चाललें आहे. स्वयंपाक करणं, भांडीं धुणं, कपडे धुणं, मुलांना व पतीला जेऊं घालणं इत्यादि बरीच कामें पडून राहिलीं आहेत माझी. म्हणून मी पाणी घेऊन चाललें आहे. "

मी म्हटलं, " बाई ! सकाळपासून संध्या–

काळपर्यंत ही कामं चालणार तुमचीं ? मग तर तुम्ही फारच थकून जात असाल ! फारच दुःखी असाल तुम्ही ? सुखाचा क्षण कसा असतो हें तुम्हांला ठाऊकहि नसेल. बाई ! मी तुम्हांस कांहीं मदत करूं ? "

माझ्या बोलण्यानं ती हंसूं लागली. ती म्हणाली,

" बाई! मी आर्य स्त्री आहे. मला दुःखाचे क्षण कसे याची कल्पना नाहीं. माझ्या कार्यांत मला सतत आनंदच मिळतो. माझे पति किती प्रेमळ आहेत ! त्यांच्या सेवेंत असतांना मीं स्वतःला धन्य समजतें. किती सुख मिळतं त्यांत मला! दुःखाचा लवलेशहि नसतो त्यांत. तशीच ती माझी गोजिरवाणीं मुलें. जणूं देवांचाच अवतार ! त्यांच्या हास्यांत मला देव दिसतो! त्यांना सांभाळतांना, जेवूं घालतांना,

स्तनपान देतांना स्वर्गीय आनंद मिळतो. मला हीं मुलं म्हणजे देवाघरचीं फुलं. त्यांचं जतन करणं म्हणजे प्रभूची सेवा करणं! हीं मुलं म्हणजे राष्ट्राचा आधार! त्यांना सुखी करण्यांत किती आनंद भरलेला असतो? त्यांतच मला समाधान वाटतं! बाई! मी दुःखी नसून पूर्ण सुखी आहे."

"बाई! भल्या पहाटें आपण कुठें निघा-लांत?" तिनं विचारलं.

"प्रभूच्या दर्शनास जात आहे," मी उत्तर दिलं. माझं हें उत्तर तिला विचित्रच वाटलं. ती हंसत हंसत म्हणाली,

"बाईसाहेब! कशाला जातां इतक्या दूरवर? पायपीट करून काय देव लाभतो? त्यानें कांहींच प्राप्ति होणार नाहीं. तुमच्या ताब्यात मोठी संस्था आहे. कित्येक मुली असतील त्यांत. त्यांना नीट

सांभाळ करा. त्या बाल-बालिकांचं जतन करा. त्यांच्या जीवन–कळया फुलवा. त्यांच्या अंतरंगांत शिरून त्यांचे आत्मे थोर बनवा. त्यानेंच तुम्हांला आनंदाची प्राप्ति होईल.

त्यांच्या अंत:करणांत प्रभु दडलेला आहे. असं असतांना तुम्ही दुसरीकडे कां चालतात ? आपण परमेश्वराचेंच कार्य करीत आहांत. परमेश्वर तुमच्या संस्थेंतच आहे. त्याचा शोध अत्यत्र कुठें करणार ? तो दुसरीकडे तुम्हास कसा दिसेल? "

असं म्हणून ती बाई निघून गेली.

मी खिन्न झालें. प्रभूच्या शोधाचा मार्ग चुकीचा आहे हें मला कळून आलें.

● ●

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. क्र. ६६८ नों. दि ........
वि. बाल.वा क्र. ........

## : २५ : उपासना

सूर्योदय झाला होता. त्याचीं अनंत कोवळीं किरणें सर्वत्र विखुरलीं होतीं. त्याच्या किरणांच्या सोनेरी जाळ्यांत जग अडकलं होतं. मी पायींच चाललें होतें. रस्ता माणसांनीं फुलून गेला होता. त्यांत पुरुष होते, स्त्रिया होत्या; म्हातारे होते नि तरुणहि होते. मी सहज त्यांची चौकशी केली. ते सारे गिरणी मजूर होते. एवढ्या सकाळीं केवळ पोटाच्या विवंचनेंकरितां जाणाऱ्या या मजुरांची मला करुणा आली. त्यांच्याविषयीं दयाबुद्धी निर्माण होऊन त्यांच्यापैकीं एकास मी सहज विचारलं, " कसं काय आहे तुमचं ? " माझा हा अनोळखी प्रश्न ऐकून तो म्हणाला, " बाई ! आपण कोण? कुठं चाललांत ?"

" मी प्रभूच्या दर्शनास चाललें. ठीक आहे ना ! तुम्ही कुठें चाललांत ? " मी उत्तरलें.

माझ्या या प्रश्नानें तो हंसला. सकाळच्या सूर्याचं ऊन त्यांच्या तोंडावर पडतांच रात्रीच्या गाढ निद्रेनं नि सकाळच्या न्याहारीनं टवटवीत दिसणारा त्यांचा चेहरा उजळून निघाला, संध्या–काळीं घरीं जाण्याची ओढ, दिवसभरचा थकवा नि रोजच्या विवंचना यामुळें त्याचा चेहरा टव–टवीत दिसणार नाहीं, दुपारच्या प्रखर उन्हानें कोमेजून जाणाऱ्या फुलांप्रमाणें तो म्लानही दिसेल. पण आताच्या उत्साही वातावरणांत तो सुखी होता. तो म्हणाला,

" बाई ! आमचा तो प्रभू दिसला कां तुम्हाला? पाहिला कां त्याचा चेहरा आक्राळविक्राळ देह ? हत्तीच्या सोंडेप्रमाणें तो आपलं लांबट तोंड वर करून आकाशांत धूर सोडीत आहे. मधून मधून मोठा आवाज करून तो आम्हांस बोलावीत आहे.

तोच आमचा देव ! त्याचीच आम्ही दिवसभर सेवा करतो. श्रम व मेहनत करतो. आमच्या वाट्याला हें काम आलं आहे; हेंच काम आम्ही करावं अशी प्रभूची इच्छा आहे. आमचें हात नि आमचें पाय राबण्याकरितां आहेत. हें आमचं काम आम्ही केलं नाहीं कीं आम्हांला जगण्याचा अधि-कार नाहीं ! असं म्हणण्यापेक्षां आम्हांला जगतांच येत नाहीं. आमच्या श्रमाच्या मोबदल्यांत आम्ही सारे मजूर घरखर्च भागवितो. आम्ही विणलेला कपडा परिधान करतो. मला कसलं कर्ज नाहीं. रात्रीं जेवण झाल्यावर प्रभूचं नांव घेत नाहीं तोंच गाढ झोंप लागते. बाई ! मी सुखी आहे. "

या मजुराची सेवा करावी, त्याच्या कुटुंबियांना हातभार लावावा असं माझ्या मनांत होतं ! पण......... मना! श्रम करीत रहा! पवित्र

भावनेनं कार्य करीत रहा ! परमेश्वर तुझ्याजवळ आहे. आईबापांची सेवा करण्यांत दंग असणाऱ्या भक्तांनीं परमेश्वर सेवेसहि गौण स्थान दिलं आहे. कर्तव्य–कर्म करणाऱ्यांना पुन्हां वेगळी अशी ईश्वर-सेवा करावी लागणार नाहीं.

मी मजुराशीं बोलत उभी असतांच मोटारींतून एक व्यक्ति खालीं उतरली. मला तिनं जेव्हां नम–स्कार केला तेव्हां माझ्या ध्यानांत आलं कीं ती व्यक्ति म्हणजे गिरणीमालक होय. त्याच्या मोटारी-कडे माझें लक्ष गेलं! चांदीच्या ताटांत अनेकविध फळं होतीं. अनेक सुगंधित द्रव्यं आपला सुवास पसरवीत होतीं. मोठमोठे हार नि गुच्छ आपला सुगंध दरवळीत होतें. हें पाहून त्या गिरणीमालकास प्रश्नार्थक मुद्रेनं विचारलं. " हे सर्व कशासाठीं? "

" बाई! तुम्ही खऱ्या भगवंतोपासक आहांत!

संग्रहालय,
अनुक्रम.........
नों. दि.......

तुम्ही भगवंताजवळ जाण्यापेक्षां तुमच्या कार्यानं संतुष्ट होऊन भगवंतच तुमच्याजवळ येत असतो ! पण आमची गोष्ट निराळी आहे ! आमच्या पाप-कृत्यांनीं भगवंतास आम्हीं दुरावलों आहोंत. त्याला जवळ करायचं म्हणजे नको कां ही द्रव्यं आवश्यक? या द्रव्यांनीं आम्ही त्याची पूजा करणार आहोंत. माझ्यावर आज कचेरींत केस चालू आहें. मी लाखो रुपये मिळविले; भावाचं लग्न मोठ्या थाटानं केलं; नवीन चार मोठें बंगले बांधले यावर सरकारची ' वाईट ' नजर गेली. हा न्यायाचा पैसा नाहीं असं सरकारचं म्हणणं आहे. माझी पत्नी घरांत क्षयानें आजारी आहे. या साऱ्या विवंचनेनं माझी झोंप उडाली आहे. या त्रासांतून प्रभूनं आमची कायमची सुटका करावी म्हणून त्यांची आम्ही आज मोठी पूजा करणार आहोंत. "

मना, मालक आणि नोकर या परस्परविरुद्ध जगाचं दर्शन घडलं ना? भगवंत भक्तीचा नि निरासक्त कर्माचा भुकेला असतांना त्याला भुलविण्याचें हे नानाविध प्रयत्न पाहिलेस ना?

तुला मिळालेल्या अनुभवाचं चिंतन कर. मनन कर. त्यांतून वैराग्याचं महान विकसनशील जीवन निर्माण होऊं दे! चितेंतून पवित्रतेची साक्ष पटवीत बाहेर येणाऱ्या सीतेप्रमाणं तुझ्या वैराग्यांतून उन्नत जीवन बाहेर पडूं दे!

● ●

## : २६ : चिकित्सा

पहांट झाली होती ! शांतता वातावरणांत भरून राहिली होती ! आश्रमांत पवित्रता व्यापून उरली होती. घंटेच्या खणखणाटाने शांतता भंगली नि तुझ्या दर्शनार्थ मुलींची रांग लागली ! मुलींच्या खोल्या धुंडाळींत धुंडाळींत.मीहि तुझ्या दर्शनार्थ निघालें. सर्व मुलीं तुझ्या मंदिरांत गेल्या हें पाहून समाधानानें मीहि तुझ्याकडे निघणार, इतक्यांत एका खोलींत मला दोन मुली झोंपलेल्या आढ–ळल्या ! माझा राग अनावर झाला ! अशा प्रशांत वेळीं तुझ्या मंदिरांत न येतां झोंपत रहाणें, हा तुझा अपमान समजतें मी ! मी त्यांना रागावलें; खूप खूप टाकून बोललें ! “ पहांटेच्या वेळीं सर्व विद्यार्थिनींनी उठलं पाहिजे; त्यांनीं सत्वर प्रभूचं दर्शन घ्यावं; आळस सोडून द्यावा नि मन लावून अभ्यास करावा. ” असं माझं पुराण चालू झालं ! पण......... !

भुकेलेल्याचं पोट गोड गोड शब्दानं भरणार काय ?' तहानलेल्याची तहान काव्य गायन ऐकून शमणार आहे काय ? जागरणानं ज्यांचें डोळे प्रयत्न करूनहि झांकलेच जात आहेत, अशांना लवकर उठण्याचें पुराण सांगून कांहीं उपयोग आहे काय ? माझा अनिवार राग पाहून एक मुलगी म्हणाली,

" बाई ! आमच्यांवर रागावूं नका ! आज परीक्षा असल्यानें रात्रभर जागरण करून मी अभ्यास केला आहे. अभ्यास करतां करतांच मला झोंप लागली. घंटा न ऐकूं आल्यानं अधिक वेळ झोंपण्याचा प्रमाद मजकडून घडला आहे. मला क्षमा कराल तुम्ही ? तुमच्या मुलींचा हा एवढा अपराध पोटांत घालाल ? "

दुसरी मुलगी म्हणाली,

" काल संध्याकाळीं जेवतांना थोडंसं कच्चं

अन्न मजकडून खाल्लं गेलं, रात्रभर पोट दुखत होतं. आतां कोठें डुलकी लागतें नाहीं तोंच उठण्याची घंटा झाली. पोटांतल्या त्रासामुळं मी उठू शकलें नाहीं."

त्यांचीं हीं उत्तरं ऐकून मला माझंच वाईट वाटलं. नकळत माझे डोळे ओलावले नि माझ्या अन्त:करणाला मायेचा पाझर फुटला. मी त्यांची शांततेनें चौकशी केली असती तर, मुलींना वाईट वाटलं नसतं ! त्यांच्या अन्त:करणाला जखम झाली नसती; पण अजाणपणें बोललेल्या कठीण शब्दा-मुळें त्यांनीं केवढी जखम झाली असेल !

● ●

## : २७ : क्षमा

आज मंगल प्रभातीं उठलें. तुझ्या दरबारीं येण्यास निघालें नाहीं तोंच माझ्यापुढें दोन मुली दत्त म्हणून उभ्या राहिल्या. अधोवदन करीत दुःख प्रदर्शित करणाऱ्या मुलींना पाहून प्रथम मला आश्चर्य वाटलं? त्यांचीं कोवळीं तोंडं पहाटेंच सुकलीं होतीं! त्यांच्या डोक्यावरील अस्ताव्यस्त केस पहाटेच्या मंद वाऱ्यातें भुरभुरत होते. मी प्रश्नार्थक मुद्रेनें त्यांना विचारतांच त्या म्हणाल्या.

" भून, आपण प्रभूच्या दरबारीं निघालात. पण त्याआधीं तुमच्या या अपराधी मुलींना क्षमा करा. "

क्रोधाची एक सनक माझ्या अंगांतून गेली. विजेचा झटका बसावा त्याप्रमाणें प्रथमदर्शनीं झटका बसला? मंगल प्रभातींहि अपराध करणाऱ्या मुलींचा मला खूप राग आला. संतप्त अवस्थेंतच

मी विचारलं,

" चुका मुदाम करतां आणि वर हें क्षमा मागण्याचं सोंग करतां? हें नाटक आतां पुरे करा! रोज पहावं तर एक नवीनच सोंग ! आश्रमाच्या रंगभूमीवर मुद्दाम अपराध करून क्षमा मागणा-रांचीं अनेक सोंगं मी पाहिलीं आहेत. आणि मी तुम्हांला काय क्षमा करूं ?"

मी अचानक धारण केलेल्या रौद्र स्वरूपामुळें त्या मुली घाबरून गेल्या. माझ्या पायांवर आपलीं शरीरं लोटून देऊन अश्रुमोचन करीत त्या म्हणाल्या,

" भून ! आम्ही तुमचीं बालकं ? प्रेम करणं आणि रागावणं हें दोन्हीं अधिकार तुम्हाला आहेत ? तुम्हीच रागावल्यानंतर आम्ही कोणाकडे पाहावं ? तुमच्या प्रेम सरोवरावर तरंगणाऱ्या आम्ही हंस पक्षिणी ! प्रेम-जलच तुम्ही काढून घेतलं तर

आमचं भवितव्य तुम्हांला काय निराळं सांगायला हवं ?"

मुलींच्या अपराधानं मी जशी क्रुद्ध होतें तशीच त्यांच्या या दीन भाषणानं लगेच शांतहि होतें. क्रोधाच्या झोतानं माझं संवेदनशील अन्तः-करण हेलकावें खाऊं लागतं, पण चित्ताच्या शांतीनं तें तत्काळ शमूनहि जातें. मी शांत झाल्याचं पाहून मुली म्हणाल्या,

"भून ! आम्ही तुम्हांला सकाळींच त्रास दिला ! आजच्या दिवसाची सुरवात तुम्हांस अशा रितीनें करावी लागली, याबद्दल आम्ही तुमची क्षमा मागतो. पुन्हां आमच्या हातून अशी चूक होणार नाहीं. अनंत अपराध पोटांत घालून क्षमा करणाऱ्या परमेश्वराप्रमाणें आपण आहांत ! आम्हांस एकदां क्षमा कराल ना ?"

माझं मन द्रवलं ! क्षणापूर्वीच निर्माण झालेल्या क्रोधाचा पर्वत मुलींच्या क्षमायाचनेच्या शस्त्रानें दुभंगून त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या ! प्रभो ! माझ्या क्रोधाची भरती–ओहोटी ही अशी रोज चालते ! तूं मला याबद्दल क्षमा करशील ना?

अस्थिर विचारांच्या लाटांच्या प्रवाहांत तूं सतत वाहात आहेस ! तुला स्थिरता नाहीं. अनेक रूपांनीं तो तुझ्याप्रत येऊन तुझी परीक्षा पाहात आहे अन् तूं सागरपृष्टि वहात जाणाऱ्या लाकडाच्या, तुकड्याप्रमाणें भावनेच्या प्रवाहांत हेल-कावे खात इकडे तिकडे वहात आहेस ! हे मना, लहान लहान बाल–बालिकांत आविष्कृत झालेल्या प्रभूला जाण !

## : २८ : मानवता

मी पहाटें उठलें ! तुझ्या दर्शनार्थ निघणार इतक्यांत माझ्यापुढें पांचसहा मुली हजर झाल्या ! तें मुलींचे शिष्टमंडळ होतं. कालच्या घटनेमुळं उत्स्फूर्त विचारांमुळेंच ह्या मुली आज आल्या होत्या. अन्यायांची दाद हवी होती त्यांना ! त्यांनीं म्हटलं,

" भून ! आपल्या स्वयंपाकीण बाईला सोडूं नका ! दूध देऊन आटलेल्या गाईची कत्तलखान्यांत रवानगी करावी तशी तिची भेसूर जगतांत रवानगी करूं नका ! आपल्या सुंदराबाई पिकलं पान आहे ! आज आहे उद्यां नाहीं ! आजार, संकट इ. कालवाताच्या सुळकीबरोबरहि तें खालीं गळून पडेल. त्या थकल्या आहेत, अंगांत त्राण नाहीं. अशा अवस्थेंत त्या कुठें जाणार ? आपण सर्वांचा सांभाळ करतां ! तसाच तिचाहि करा! अंगांत शक्ति असे-पर्यंत तिनं आपणांस स्वयंपाक करून घातला

आहे. अलीकडे कांहीं वर्षे तिचा आपण सांभाळहि केला आहे. तेव्हां आतांच असा निर्णय कां घेतला?"

मुलींच्या भाषणानं मला राग आला. मी उफाळून म्हणालें,

"लहान तोंडी मोठा घास घेऊन तुम्हांला बोलायला कांहीं वाटतं काय? हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्याचा हा प्रकार आहे. माझा निर्णय तुम्ही फिरवूं इच्छितां! पण आजपर्यंत वृद्ध सुंदराबाईची सेवा करण्याचे कोणा मुलीच्या मनात विचार आले होते? आजच तिच्याविषयीं स्नेहाचा झरा तुमच्या ठिकाणीं पाझरूं लागला आहे."

माझ्या या अनपेक्षित उत्तरानें मुली सर्द झाल्या. पण त्या विचारी होत्या. आपला बेत तडीस जाणार नाहीं या जाणिवेनें त्या दुःखी झाल्या! पण एक धीट मुलगी पुढें येऊन म्हणाली,

" भून ! तुम्ही तुमचा निर्णय मागें घ्याल तर आम्ही वृद्ध सुंदराबाईची सेवा करूं ! तिच्या वृद्धापकाळीं आम्ही तिला आघार होऊं. अनाथांची सेवा करण्यांत आम्हांला आनंद वाटेल. "

त्या मुलीचे हे आंतरिक भाव ऐकून मी सद्गदित झालें पण त्यांची पुन्हां परीक्षा पहाण्याच्या हेतूनें मी एका मुलीस म्हटलें,

" काय ग ! तुला हें मान्य आहे? "

ती अत्यंत नम्रपणें म्हणाली. मला दुर्दैवानें आजी नाहीं. आजीच्या प्रेमाला मीं पारखी झालें आहे. हिला मी माझी आजी समजून तिची सेवा करीन. "

मुलीच्या या उत्स्फूर्त सेवा भावनेचें कौतुक करण्यासाठीं मी म्हटलं,

" मुलींनो ! तुम्ही खरोखर थोर आहांत !

एवढें उन्नत विचार ज्या मुलींच्या ठिकाणीं आहेत त्यांच्या उदरीं भाग्यवान पुरुषांचाच जन्म होणार ! तुमचा हा विचार खरोखर फार मोठा आहे ! तुम्ही असाच उच्च विचार मनांत बाळगा नि तुमचा, तुमच्या कुटुम्बाचा, समाजाचा आणि देशाचा उद्धार करा ! मी माझा निर्णय मागे घेत आहे. "

माझ्या या विचारानें त्या सर्वजणी हर्षित झाल्या ! त्यांचा आनंद हृदयांत न मावून त्यांच्या चर्येवरून ओसंडून वाहूं लागला. अत्यंत समाधानानें त्या आल्या तशा निघून गेल्या.

माझं मन मात्र विचारांच्या फेऱ्यांत चकरा खाऊं लागलं. लहान मुलींच्या ठिकाणी एवढें उच्च विचार वास करीत आहेत, हें पाहून माझं मन आनंदानें मोहरून गेलं. माझ्या सुखद नि दु:खद प्रसंगाच्या स्मृतिमंजूषेंत ही स्मृति विशेषत्वानं

चमकून उठते. माझ्या जीवनसरितेला कलाटणी देणाऱ्या अनेक प्रसंगापैकीं हा एक विशेष प्रसंग आहे.

त्यानंतर आणखी कांही दिवसांनीं घडलेली गोष्ट! वृद्ध सुंदराबाईंनीं आंथरूण धरलं. सर्व मुलींनीं तिची मातेप्रमाणें रात्रंदिवस सेवा केली. आजार बळावतच चालला! मृत्यूच्या दाढेंतून तिला परत आणण्यासाठीं मुलींनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली! पण व्यर्थ! एके दिवशी मृत्यूला वादळाच्या थयथयटात म्हातारीची प्राणज्योत कायमची मालवली! शेवटपर्यंत ॐकार मंत्राचं जाप्य देत आणि सल्लेखनेचा अंगीकार करीत म्हातारीनें प्राण सोडला. म्हातारीचं सोनं झालं. मुलीच्या प्रयत्नास योग्य फळ मिळालं. धर्माचं उच्चारण करीत मरण येणें हें भाग्यशाली समजलं जातं.

असं भाग्यशाली मरण म्हातारीस आलं. मुलींना याहून दुसरं बक्षीस कोणतं हवं होतं ?

मुलींची ही सेवा सदैव ध्यानांत ठेव ! हेंच तुझं धन ! तें तूं त्यांची सेवा करतांना खर्च कर ! तुला आढळून येईल कीं, ते धन खर्ची न पडतां त्यांत दिवसेंदिवस वृद्धीच होईल ! मनाची शांति वाढतच जाईल.

● ●

## : २९ : वात्सल्य

सकाळ झाली होती ! आश्रमांतील कोपरान् कोपरा प्रकाशानें उजळून निघाला होता. प्रत्येकजण उद्योगांत दंग होता. मीहि स्नानादिक क्रिया आटोपून तुझ्या दर्शनास निघालें; पण फाटकांतून आश्रमांत येत असलेला टांगा पाहुन मी थबकलें. माझी दृष्टि टांग्याकडे गेली ! सुव्यवस्थित पोषाख केलेली सुस्थितींतली एक प्रौढ व्यक्ति दिसली मला. मागच्या बाजूला चार सुंदर मुली दिसल्या ! मला कुतूहल वाटलं. टांगा जवळ येऊन थांबला. हातांतील तबक जवळ ठेऊन मी त्यांना नमस्कार केला. माझ्या नमस्काराची सस्मित वदनानें प्रतिफेड करीत त्यांनीं म्हटलं,

" आपणच भून कां ? "

मी होकार दिला आणि ' कोठून आगमन ' झालं म्हणून प्रश्न केला.

इतक्यांत चारहि मुली खालीं उतरल्या.

त्यांच्या गोड किलकिलाटानें माझ्या आनंदाला भरती आली ! नवीन जागेंत आल्याचं कुतूहलहि त्यांना वाटूं लागलं होतं. त्यांच्याकडे आंगुलीनिर्देश करीत ते गृहस्थ म्हणाले,

" या चार शिष्या आपल्या स्वाधीन करण्याकरितां मी आलों आहे त्यांचा सांभाळ करून त्यांना सुशिक्षित नि सुसंस्कृत करा. "

" चौदा वर्षांच्या आंतील होत्या. त्या चार मुली ! श्रीमंत नि सुशिक्षित दिसलं त्यांचं घराणं, असं असून त्यांना आश्रमांत त्यांनी आणल्याचें आश्चर्य प्रदर्शित करीत मी विचारलं,

" यांना तुम्ही घरीच शिक्षण कां देत नाहीं? एवढ्या लहान वयांत त्या येथें राहतील कां ?"

" भून ! माळ्याशिवाय फुलझाडांची देखरेख झाली आहे काय? हें शिक्षणाचं पवित्र कार्य तुम्हीच करावं. त्याशिवाय मुली सुशिक्षित

नि सुसंस्कृत बनणार नाहीत. येथल्या पवित्र वातावरणास भुलून मी आलों आहे. "

मीं त्यांचं स्वागत केलं. मुलींचं वसतिगृह दाखविलं. त्यानंतर मुलीचे पालक दोन दिवस आश्रमांत राहिले. तेवढ्या अवधींत त्यांनीं संस्थेचं सूक्ष्म निरीक्षण केलं. संस्थेचे नियम समजावून घेतले. अत्यंत संतुष्ट मनानें ते जेव्हां घरीं निघाले तेव्हां म्हणाले,

"या मुलींच्या माता तुम्हीच! त्यांना शिक्षण देणं, त्यांचा साभाळ करणं; धार्मिकतेकडं प्रवृत्त करणं आतां तुमच्यावर सोपविलं आहे,"

जातांना मूलींच्या पालकाचे डोळे भरून आलें. माझंहि अंतःकरण भरून आलें.

ही मुलं म्हणजे समाजाची–राष्ट्राची ठेव आहे. तीं देवाघरचीं फुलं आहेत. त्यांचा नीट सांभाळ करण्यांतच, त्यांना सुसंस्कृत करण्यांतच माझ्या जीवनाचें सार्थक आहे.

● ●

## : ३० : स्त्री

अनेक दिवसांपासून मी तुझ्या दारापुढें आक्रोश करीत आहे. एखाद्या ठिकाणीं दबून राहि-लेलें पाणी वर उसळून येण्याच्या धडपडींत असावं तसंच माझ्या अन्तःकरणांतली भक्ति पुन्हा पुन्हा वर उसळून येत आहे ! हें आतुर डोळे तुला पाहू-नच संतुष्ट होतील. हें अतृप्त मन तुला पाहिल्या-नंतर शांत होईल; पण माझी ही स्थिति पाहूनच तूं अडून बसलास कीं काय, हें समजत नाहीं ! माझ्या उत्कट भक्तीचा उत्स्फूर्त उद्रेक पाहूनहि तुझ्या अन्तःकरणांतली दया पाझरूं नये काय ? तुझं दर्शन होईल म्हणून मी वाट पहात बसलें. वाट पाहून पाहून माझें डोळे शिणलें आहेत पण तूं मात्र माझी अजून परीक्षाच घेत आहेस.

मी केलेल्या अन्यायाचा पाढा तुझ्यापुढें वाचा

यचा नाहीं तर कोणापुढें वाचूं ? पण येथें पहावें तर साराच कारभार निराळा ! जखमेवर मीठ चोळावं तसं तुझ्या वर्तनामुळें माझं दुःख द्विगुणित होत आहे.

माझी ही आंतरिक तळमळ तुला कां कळूं नये ! माझ्या दुःखानें दगडालाहि पाझर फुटेल पण तुझ्या दयार्द्र अन्तःकरणांतून दयेचा एक अंधुकसा झराहि फुटणार नाहीं असं दिसतं. तूं त्रिकालसर्वज्ञ असूनहि माझी ही असहाय्य स्थिति तुला कळूं नये याचं आश्चर्य वाटतं ? तूं सर्वज्ञ असून काय उपयोग ?

तुझ्या या हट्टानें मी चांगलीच होरपळून निघालें आहे. तुझ्या दर्शनाशिवाय अन्नपाणी ग्रहण न करण्याचं व्रत मी घेतलं आहे. तुला नैवेद्य दिल्या-शिवाय अन्नाचा घास मी कसा घेईन ? तूं माझा

स्वामी आहेस! तुला नैवेद्य अर्पण केल्याशिवाय माझ्या पोटांत अन्नाचा घास कसा उतरेल ?

मी अगदीं हतप्रभ झालें आहे. उदास झालें आहे. रोज तुझ्या दारापर्यंत तरी येत होतें. पण आतां तेंहि शक्य नाहीं. तुझ्या द्वारपालाची माझ्यावर सक्त नजर आहे. तुला हें ठाऊक असूनहि तूं स्वस्थ कां ? तुझ्या भक्तावर चाललेला हा अन्याय तूं उघड्या डोळ्यांनीं पहावा हें आश्चर्य नव्हे कां ? न्यायदेवताच आंधळी तर पामरांनीं कुठं न्याय मागवा ? तुझ्या न्यायदानावरचा विश्वास उडून जावा अशा क्रिया तुझ्याकडून घडत आहेत.

मी स्त्री आहे. अशुद्ध आहे. म्हणून कां तू मला जवळ येवूं देत नाहीं ? मी शरिरानं अशुद्ध झालें म्हणून काय झालं? मनानें तर पवित्र आहे ! देहाच्या क्षणभंगुरत्वाविषयीं आणि त्याच्या मलिनते-

विश्रयीं तूं तुझ्या दिव्य ज्ञानानें आम्हांस कल्पना दिली आहे ना ? मग माझ्या पवित्र मनाची तुला जाणीव नाहीं कां ? मी स्त्री झालें. हा माझ्या गतजन्मांचा अपराध आहे. या जन्मांत कांहीं पौरुष करून हें स्त्रीत्व पुनः प्राप्त होणार नाहीं असा प्रयत्न तरी मला करूं दे.

सोनं तप्त केल्यानं शुद्ध होतं आणि मन पश्चात्तापानें पवित्र होतं ! हें तूंच सांगत आलास ना ? आतांहि एखादं प्रायश्चित्त सांग मला तूं ? मी तें आनंदानें भोगेन ! प्रभो ! तूं आतांपर्यन्त अनेक पातकी जीवांना पवित्र केलंस ! पण मीच तुझ्या कृपाप्रसादापासून वंचित कशी राहिलें ?

नश्वर देहाची मला काळजी नाहीं. त्याविषयीं मला ममता वाटत नाहीं; पण तुझ्या मुखकमलाचं दर्शन होऊं शकत नाहीं म्हणून मला वेदना होतात.

अनुक्रमांक ........
........
नों. दि. .......

म्हणून माझ्यावर दया कर ! माझा अन्त पाहूं नकोस !

मना, स्त्री म्हणून किंवा पुरुष म्हणून जन्मास येणं हें कांहीं तुझ्या आधीन आहे काय ? ते कर्माधीन आहे. त्यांत आतां बदल घडून आणणें तुला अशक्य आहे. प्रभूच्या मंदिराचं दार उघडो किंवा न उघडो ! तूं शरीरानें पवित्र आहेस कीं अपवित्र आहेस हा कांहीं महत्वाचा प्रश्न नाहीं ! तूं मनानें पवित्र आहेस ना ? मनानें शुद्ध आहेस ना ? शुद्ध मन असेल तेथेंच भगवंताचा वास असतो. या शुद्ध मनानें भगवंताचें स्मरण करशील तर अनेक भवाच्या संचित पापांतून तुझी सुटका होईल.

मना, तुझ्या आत्मप्रभूची स्तुति कर! त्यालाच भक्तिभावानें आळवून त्याची पूजा कर ! तुझ्या शुद्ध भावजलानें त्याला अभिषेक घाल ! तुझीं

भक्तिकुसुमं त्याला अर्पण कर.

तुझ्या नयनरम्य हृन्मंदिराचं दार तुलाच उघडावं लागेल! सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान आणि सम्यक् चारित्र या रत्नत्रयाची प्रतिष्ठापणा तूं तुझ्या हृन्मंदिरांत करणार असशील तरच तें दार उघडेल ! या तुझ्या हृन्मंदिरांतील आत्मप्रभूचं एकदां जरी तूं दर्शन घेतलं तरी तुला तुझ्या उद्धारासाठीं निराळी धडपड करायला नको!

सरोवरांतील शुद्ध नि स्थिर अशा जलांतच तुझं प्रतिबिंब तूं पाहूं शकतोस? तसंच तुझ्या स्थिर पवित्र हृदयांत तूं तुझा आत्मप्रभू पाहूं शकतोस. त्यासाठीं करावयाच्या प्रयत्नाच्या तयारीस तूं आतां पासूनच लाग.

## : ३१ : हृन्मंदिर

'तुझें हृन्मंदिर उघड,' असं म्हणतांच तूं गोंधळून गेलास, कां बरं असं ? तुझं गोंधळून जाणं हें सयुक्तिकहि आहें. आतांपर्यंत तुला दगडीं मंदिरच ठाऊक होतीं. दगडाविटांनीं बांधलेलीं, सोन्या-चांदीनं मढवलेलीं, दिव्यांच्या प्रकाशानें सजवलेंलीं मंदिरंच तुला ठाऊक होतीं, त्या मंदिरांत तूं नेहमीच जात होतास.

मना! आज मी दगडी मंदिरासंबधीं बोलत नाहीं ! तेथील लाकडी दारं उघडण्यासंबंधीं सांगत नाहीं. आज एका वेगळयाच मंदिरांत जाण्यास तुला सांगणार आहे ! पण एक गोष्ट ध्यानांत ठेव ! तें मंदिर तुझ्यापासून फार लांब नाहीं! हें सुंदर मंदिर तुझ्याजवळ आहे. एवढेच नव्हे तर तें तुझ्यांतच आहें. धर्माचीं सर्व तत्त्वं याच मंदिरांत आहेत! खरा धर्म तेथेंच दडला आहे. ते

मंदिर म्हणजे ‘ हृन्मंदिर ’ होय. या मंदिराच्या सभोवतीं तुझ्या देहाचा भक्कम कोट उभा आहे. तुझं हृदय हा त्याचा गाभारा होय. त्या गाभाऱ्यांत तुझ्या अष्ट गुणाचं सिंहासन आहे. अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत सुख, अनंत वीर्य, अव्याबाधत्व, अगुरु लघुत्व, अवगाहनत्व, सूक्ष्मत्व हें अष्टदल कमल होय. त्यांवर अत्यंत निर्विकार नि अशरीरी आत्मा विराजमान आहे. त्याच्या स्वरूपाचं काय वर्णन करावं ? तो अत्यंत तेजस्वी, प्रकाशमान नि निर्मळ असा आहे. या आत्मदेवाचीं तू मनोभावें पूजा कर. त्याची भक्ति कर. या आत्मप्रभूच्या दर्शनानें तुला उच्च कोटिची शांति लाभेल.

मना, उत्तम क्षमा, उत्तम मार्दव, उत्तम आर्जव, उत्तम शुचित्त्व, उत्तम सत्य, उत्तम संयम,

उत्तम तप, उत्तम त्याग, उत्तम अकिंचन्य, उत्तम ब्रह्मचर्य या दश स्तंभावर तुझं हृन्मंदिर अधिष्ठित आहे. प्रायश्चित, विनय, वैय्यावृत्य, स्वाध्याय, संयम, घ्यान, हे आंतील गाभाऱ्याचे स्तंभ होत. धर्मध्यान आणि शुक्लध्यान हीं आत्मप्रभूच्या सिंहासनावरील सिंह होत. त्यावर स्फटिकासारखं शुद्ध असलेलं ज्ञानासन आहे.

संयम हा तुझ्या मंदिराचा रखवालदार आहे. अनशन, अनमोदर्य, वृत्तिपरिसंख्यान रसपरित्याग, विरिक्त शय्यासन, कायक्लेश हीं मंदिराचीं दारं होत.

तुझ्या हृन्मंदिरांत स्वच्छ जलाचं तळं आहे. तुझ्या अंत:करणांतून निघालेला भावनेचा प्रवाह या तलावास जाऊन मिळतो! त्यानें तें परिपूर्ण आहे.

चौवीस जिनेशांची तूं केलेली स्तुति म्हणजे त्यांतील कमळं होत. निर्भयपणें त्या हृन्मंदिरात प्रवेश कर! शांत, स्थिर नि आनंदी चित्ताने प्रभूचें दर्शन घे. भक्तिभावानें आत्मदेवाची पूजा कर. तुला तेथें कोणी अडविणार नाहीं. ज्या प्रभूच्या दर्शनाकरितां तूं रात्रंदिन तळमळत आहेस त्या आत्मप्रभूचं दर्शन तुला आतां सहजशक्य झालं आहे. हृन्मंदिरांतील अत्युच्च सिंहासनावर ' परमात्मा ' अधिष्ठित आहे. तुझ्या आत्म्यानें लांब पल्ल्याचा प्रवास केला आहे. या अवधींत त्यांच्यांत निरनिराळीं स्थित्यंतरें झाली ! मुक्तिप्रवासास निघाला तेव्हां तो ' बहिरात्मा ' होता ! देह आणि जीव यांना एक संबोधून त्याचें व्यवहार घडत. त्यामुळें दृष्टिहीन माणसाप्रमाणें तो ठेंचकळत, ठेंचकळत प्रवास करीत असे ! वाट चुकून भलतीकडेच जात असे!

पण नंतर त्याला शरीर आणि आत्मा यांतील फरक कळूं लागतांच बहिरात्म्याचं अन्तरात्म्यांत रूपांतर झालं ! पण कर्मच्या कचाटयांत त्याला जलद प्रगति साधतां आली नाहीं. आतां सम्यक्त्वाच्या प्राप्तीनं अंतरात्म्याचं परमात्म्यांत रूपांतर झालं आहे. हा परमात्माच तुझ्या हृन्मंदिरांतील अत्युच्च सिंहासनावर विराजमान आहे.

परमात्म्याप्रत जाण्याचा उपाय मी तुला सांगितला. त्या मार्गानं पवित्र होऊन तूं जाशील तर तुला आत्मप्रभूचं दर्शन अवश्य घडेल.

आतां तू मुळींच विलंब करूं नकोस. फार उशीर झाला तर तुझें इच्छित साध्य होणार नाहीं.

तुझ्या हृन्मंदिराचं शिखर किती उंच आहे ! भव्यता, सौंदर्य आणि उंची यांचा त्रिवेणी-संगम

झाला आहे तेथें ! शिखराशिवाय मंदिरास कसली शोभा येणार? तुझें शिखर असामान्य आहे. त्याचं वर्णन कोणत्या शब्दांत करतां येणार ? त्या शिखराचं शेवटचं टोक म्हणजे सिद्धशिला होय! अनंत आकाश कापीत कापीत जाणाऱ्या वेगवान अस्त्राप्रमाणें तुझ्या शिखरानें लोकाकाशांतून असाच वेगवान प्रवास केला आहे. त्याचें शेवटचं टोक लोकाकाशाला भिडलं आहे, लोकाकशाच्या अग्रभागीं आहे!


तुझ्या हृन्मंदिराच्या शिखरावरील कळस म्हणजे सिद्ध भगवान होत ! त्यांचें तूं रोज दर्शन घेत जा ! त्याना वंदन करीत जा ! त्याची मनोभावें पूजा करीत जा !

तुझ्या मंदिरांतली घंटा घणघणूं लागली. प्रभातकालीं, मध्यान्हसमयीं, संध्यासमयीं आणि

मध्यरात्रींहि तो घणघणूं लागली कीं सारं विश्व खडबडून जागं होतं. विश्वांतील सर्व लोक अज्ञान–झोंप झटकून जागे होतात आणि तुझ्या मंदिराकडे धांव घेतात. परमात्म्याचं दर्शन घेऊन पावन होतात.

● ●

# अहिंसेचा नंदादीप



भ. महावीर

वं द ना

भाव पल्लवी

• • •

: ३२ :

श्री वृषभ .

तुमच्या दर्शनाकरितां मी आतुर झालें आहे. तुमच्या दर्शनाविना जीव व्याकूळ झाला आहे. आईच्या भेटीस्तव मुलानें धडपड करावी; पक्षि–णीच्या भेटीस्तव पाखरांनीं किलबिल करीत रहावें, वासरांना गाईची ओढ लागावी तशी मला तुमच्या दर्शनाची ओढ लागली आहे. सरितेनें सागराकडं धांव घ्यावी तशी मी तुमच्याकडे धांव घेत आहे.

मुलांची धडपड आईच्या भेटीनं थांबली आहे. पक्षिणीच्या आगमनानें पांखरं शांत झालीं आहेत; गाईच्या येण्यानं वासरं तृप्त झालीं आहेत. मीच आपल्या दर्शनाविना अजून व्याकूळ आहे. पशु-पक्ष्यांना तूं तृप्त केलंस! पण मी असा कोणता अपराध केला म्हणून ही शिक्षा मला मिळाली ?

मी तुमची थट्टा करीत नाहीं. तुम्हांला वाटेल



भ. ऋषभनाथांना त्यांच्या मागील जन्माची पत्नि, परंतु या जन्मीचा राजा श्रेयांस रस–दान करीत आहे.

मीं तुमची मस्करीच करीत आहे. तुम्ही माझे पालनकर्ते ! तुम्हीं माझे रक्षक ! माझं नांव सुमति ठेवलं तुम्ही ? आपल्या आशिर्वादानं लिपिबद्ध झालें ! आपलीच कृपा म्हणून गणित–विज्ञान–गीत आदि शास्त्रांनी मी मंडित झालें. आपल्या स्तव–नाचं फळ म्हणून लाभलेलं ज्ञान मी इतरांना अर्पण केलं ! आपलीच ठेव ! पिता आपल्या कन्येला दुसऱ्याची ठेव म्हणून पालन करतो आणि योग्य वेळी ती ठेव दुसऱ्यांना अर्पण करतो त्याप्रमाणें मी ज्ञान-ठेव दुसऱ्यांना अर्पण करीत आहे.

मी 'सुमति' झालें म्हणुन काय झालं ? प्रभो ! आपल्या अथांग ज्ञान–सागरापुढें माझी 'मति' ही केवढी ! ही 'सुमति' आपल्या ज्ञाना पुढें बिंदूवतच !

अजूनहि माझ्यावर अनुग्रह कां न व्हावा ?

तुमच्या अंतरंगाचा एक लहान कोपराहि मला पुरेसा होईल. प्रभो! मी अल्प–संतोषी आहे. आपण माझ्या सेवेचा स्वीकार करून अनुग्रहित केलं तरी माझं जीवन मी कृतार्थ समजेन. धन्य होईन मी.

प्रभो! मी तुमची मुलगी म्हणून जन्मास आलें, म्हणून तुमचा माझ्यावर अनुग्रह होत नाहीं कां? मुलगी म्हणून जन्मास येणं कां गुन्हा आहे? माझी भावना तुम्ही अपवित्र कां समजावी? माझी भक्ति ही अपुरी कां? शुद्ध भावनेनं नि भक्तीनं मी माझं अन्तःकरण भरलं आहे! हृदयकलश भरला आहे. त्याचा स्वीकार करा. मुलगी आहे; स्त्री आहे, माझी अवहेलना करूं नका. पित्याचें प्रेम मुलीवरच अधिक असतं असं म्हण–तात. पण येथें पहावं तर उलटच.

मी टाहो फोडून तुझी भक्ति करीत आहे

पण तरीहि तुमच्या अंतःकरणाला पाझर फुटूं नये? तुम्ही म्हणाल, " मी वीतरागी आहे. सर्व जीव समान आहेत. त्यांच्यात भेदभाव करतां येणार नाहीं मला. "

पण प्रभो ! आधीं तुम्हीं माझे पिता आहांत अन् नंतरच वीतरागी आहांत! वीतरागी बनलांत म्हणून मुलींविषयीचं कर्तव्य तुम्हांला दूर लोटतां येणार नाहीं.

तुम्ही पृथ्वीचें नियंत्रक आहांत. सेवासृष्टीचें तुम्ही जनक आहांत. असि, मसि, कृषि, सेवा, शिल्प, वाणिज्य या कला प्रथम तुम्हीच जगास अवगत करून दिल्या. कृषि कर्माच्या वेळीं जमीन नांगरावी लागते. त्यांतील तण काढून तीं चांगलीं करावी लागतें. प्रभो, या कर्मांत मी तुमचं वाहन होऊन जनसेवा करीन !

मी वृषभ होईन; बैल बनेन ! शेतांतील 'तण' काढतांना कामवासना काढून टाकताना, विषय वासनेच्या हरळीकडे माझं लक्ष गेलं तर मी तुमची मुलगीच आहे असं समजून क्षमा करा. विषय-वासनेला बळी पडलें तर तुम्ही मला जागृत करा. हे प्रभो! तुमचं कर्तृत्व नि तुमचं प्रभुत्व हीं अनंत आहेत ! आपण अनंतशक्तिधारी असतांना मला सन्मार्गावर आणण्यास आपली किती शक्ति खर्ची पडेल ?

माझी सारी प्रार्थना पालथ्या घागरीवर पाणी ओतल्याप्रमाणें ठरत आहे! तुमच्या सान्निध्यापासून लांब लांब जात आहे. तुमच्याशीं एकरूप होण्याचा एकच एक मार्ग मला आतां सुचतो! मी तुमचं बसण्याचं वाहन बनणार! माझ्या पृष्टभागावर मी

तुम्हांला विराजमान करणार! सन्मार्गाच्या प्रवासांत मी चकलें तर ज्ञानवेसणानं तुम्ही नियंत्रण करा! मला तुम्ही विसराल म्हणून वृषभ होऊन तुमचं वाहन बनलें तर मात्र मला विसरणं तुम्हांला जड जाईल. तुमच्या सान्निध्याप्रत जाण्याचा हाच एक-मेव उपाय आहे.

● ●

: ३३ :

## श्री अजित

तूं अजित आहेस; अजिक्य नि अजय आहेस काम-क्रोधादि समस्त कर्मांचा तूं संपूर्ण नाश केल्या-मुळें तूं वीतरागी बनला आहेस. शोकाचा संपूर्ण परिहार झाल्यानें तू अशोक आहेस ! तुला जगांत कोणीहि शत्रु राहिला नाहीं म्हणून तूं अजित आहेस. साऱ्या जगाला प्रकाश देणारा सूर्यहि राहूकडून ग्रासिला जातो; सार्वभौम चक्रवर्ति भरत आपल्या धाकटया भावाकडून पराजित झाला. जंगलाचा अधिपति सिंहहि मानवाच्या जाळयांत अडकतो.

तूंच एक असा अद्वितीय सूर्य आहेस कीं, ज्याला कोणी जिंकूं शकत नाहींत. मानवांतील दौर्बल्यावर तुझ्या आत्म्यानं पूर्ण विजय मिळवि-ल्यानें त्याच्यांत अजितत्व निर्माण झालं आहे. तुझी वाणी वीरशाली आहे. तुझं शासनहि अजिक्य आहे

कारण तूं कुणास जिंकण्याच्या भानगडींत पडत नाहींस. तुझी भारती भद्र आहे. तूं प्रस्थापित केलेल्या शासनानें एकांतवाद्यांचा पराभव केला आहेस. तुझ्या प्रेमानें सर्व वाद-संवादी झाले. समता नि शांतता. प्रस्थापित केली.

तुझी कीर्ति ऐकूनच मी तुझ्यावर लुब्ध झालें. अनेक जन्मांत सतत बसणाऱ्या पराभवाच्या धक्यानें मी हतवीर्य झाले आहे. जन्मोजन्मीच्या पराभवांतून तुझ्यावांचून मांझी कोण बरें सुटका करणार!

तूं माझ्यावर संतुष्ट हो! मला तूं अनुग्रहीत कर! तुझ्या सानिध्यांत राहून अंतरंगांतील दौर्ब-ल्यावर प्रभुत्व प्रस्थापित करण्याचं सामर्थ्य माझ्यांत येऊं दे! माझी ही एवढी इच्छा तूं पूर्ण कर. तुला वाहून नेण्याकरण्या करितां मी ऐरावत बनेन! उंच मेरुशिखरावर नेऊन तेथल्या पांडुकाशिलेवर

तुला अधिष्ठित करीन. दीक्षाकल्याणिकाच्या वेळीं तुला तपोवनांत घेऊन जाईन. पण प्रभो ! या प्रत्येक प्रसंगीं तुला अंकुश जवळ बाळगावा लागेल. तुझ्यासारख्या त्रिभुनवंद्य परमात्म्यास वाहून नेतांना माझ्यांत उन्मत्तपणा आला नि मी स्वैरावैरा पळत सुटलें तर मोठाच अनर्थ व्हायचा! तेव्हां अंकुश दाखवून मला सन्मार्गावर आण !

मीं कृतकृत्य आहे असं समजून अलिप्त राहूं नकोस. तुझ्या आश्रयासाठीं मी आलें आहे. तुझा स्पर्शहि माझ्या जन्मोजन्मीचं संचित पाप दूर करील ! तुझ्या स्पर्शानें माझं पातक जळून जाईल. अग्नीच्या सान्निध्यानें लोणी वितळून जावं तसं तुझ्या सहवासानें माझीं पापं वितळून जातील. रे प्रभो ! मी तुझ्या कृपाप्रसादानं निश्चतपणें सुखी होईन. म्हणून मला तूं दूर लोटू नकोस.

कितीतरी दिवसापासून तुझ्या अनुग्रहासाठीं तुझ्या दारांत बसलें आहे. कित्येक रात्रीं निघून गेल्या. कित्येक दिवस निघून गेले. तूं दयार्द्र अंत:करणानं मजकडे पहा! तेवढ्यानेंहि माझं समाधान होईल.

● ●

: ३४ : श्री संभव

ती प्रचंड मिरवणूक ! किती अफाट गर्दी ! असंख्य माणसांनीं सारे रस्ते फुलून गेले आहेत. ती धर्म ध्वजाची मिरवणूक आहे. जनता तुझ्या ध्वजाचं स्वागत करण्यासाठीं वेडी झाली आहे. आनंदसागरांत बुडून गेली आहे.

तूं क्षत्रिय आहेस. तुझा विजयी ध्वज डौलाने फडकायला हवा ! तो माणसानं धरला तर थोडाच उन्नत दिसणार आहे! उंच रथावर रोवला पाहिजे. त्यानें तुझ्या शासनाचा प्रभाव सर्वत्र दिसेल. तुझा

विजयीध्वज वाहून नेणारा घोडा होईन मी. या महारथास दोन चक्रं आहेत. वर भव्य सिंहासन आहे.

प्रभो ! त्यावर आरूढ झालेली तुझी मूर्ती जगास न्यायदान करणाऱ्या न्यायाधीशाप्रमाणें भासते.

या महारथावरील महारथी होवून माझ्यावर तूं नियंत्रण ठेव! माझ्यावर अधिराज्य गाजव! रथ सुमार्गानें जावा यासाठीं माझ्यावर नियंत्रण हवंच. त्यासाठीं हा लगाम तुझ्या हातीं धर. शिवाय हा चाबूक पण घे तुझ्या हातांत. उद्दाम बनून मी रथ ओढू लागलें कीं माझ्यावर या चाबकाचें आसूड ओढ. मार्ग सोडून भलतीकडे धावूं लागलें कीं, हा लगाम खेंचीत जा ! तुझ्या हातांतील लगाम म्हणजे माझें जीवन ! त्याची बऱ्यावाईटाची जबाबदारी तुजवर राहील.

मोठमोठ्या आचार्यांनीं तूं महावैद्य आहेस म्हणून स्तुति केली आहे. सर्वांना विनामूल्य औषध देणारा आणि त्यांचे रोगनिवारण करणारा मोठा वैद्य आहेस तूं ! भवरोगानें संत्रस्त झालेल्या अनेक रोग्यांचे रोगहरण तुजमुळेंच झालें आहे. तुझ्या औषधालयांत गरीब–श्रीमंत; लहान मोठे सारेच गर्दीकरून आहेत. त्यांच्यांत भेदभाव न पाळतां साऱ्यांनाच तूं मुक्तहस्तानं औषधदच करतोस.

रोगग्रस्त होऊन मी भटकत भटकत येथें आलें आहे ! आजपर्यंत माझा रोग दूर करणारा वैद्य भेटला नव्हता. माझ्या आत्म्यास जडलेला मिथ्यात्वाचा महारोग नष्ट करणारा वैद्य तुझ्या रूपानें आज भेटला. जन्मजन्मांतरीचा महारोग आज नष्ट होण्याची सुवर्णसंधि आली आहे. तुला धुंडण्यासाठीं मी आकाशपाताळ एक केलं

श्री ग्रंथ संग्रहालय, वाशी.
30755
अनुक्रम बं. वा.
क्रमांक 2324
नों. दि. 31/3/4

अनेक जन्मांच्या खडतर प्रयत्नानें आज तुझी प्राप्ति झाली आहे. अनेकांना जसं तूं नवजीवन दिलं आहेस, तसं मला पण दे! तुला पाहताक्षणींच मिथ्यात्व गळून पडेल नि अनेक जन्माच्या रोगांतून मी कायमचा मुक्त होईन.

प्रभो ! तुझ्या भेटीस्तव तळमळणारी मी तुझी एकनिष्ठ भक्त आहे. माझी भक्ति ध्यानांत घेऊन आमंत्रणाशिवाय तूं येथें ये ! तुला सन्मानानं आणण्यासाठीं मजकडं वाहनं नाहींत. म्हणून तुला शेवटची विनंती करते !

प्राणज्योति मालवण्यासाठीं मला एकदां तू दर्शन दे ! तेवढ्यानंहि मी रोगमुक्त होईन.

● ●

## : ३५ : श्री अभिनंदन

सारी सृष्टि आनंदांत बहरली आहे. फुलांनीं फुललेलीं तीं रम्य उद्यानें पहा ! अनेक रंगांच्या फुलझाडांच्या त्या वेलीं पहा ! खटचाळ वारा त्यांना स्पर्शून त्यांची नाजुक शरीरं डोलवितो. वाऱ्याच्या झोतासरशीं फुलांचा सुगंध सर्वत्र पसरविला जात आहे. अनेक तऱ्हेचें कीटक, फुलांतील मध लुटीत आहेत. फळांनीं नम्र झालेलें तें वृक्ष पहा ! फलदान करतांनाहि ते किती विनम्र आहेत.

जिकडे पाहावें तिकडे आनंद भरला आहे. प्रभो ! ही सारी तुझी कृपा आहे. प्रत्येकाला तू विकासाचा पाठ देत आहेस. प्रत्येकजण तुझ्याकडून उन्नतीचा पाठ घेत आहे. हें समजतांच मी तुझ्याकडे धांवत आलें; पण प्रभो ! साऱ्या सृष्टीला विकसित करणारा तूं, माझ्याच बाबतींत कृपणता कां दाखवीत आहेस ! मी तुझ्या निवासस्थानीं

आलें. आंत प्रवेश करावा, तर दारांतच 'वानर' बसलं आहे. तुझ्या मंगल मूर्तीचें दर्शन घेण्याकरितां निघालें, तो दारांतच अपशकून ! तुझं उज्वल मुख दिसण्याऐवजीं याचं तोंड दिसलं ! अन् दांत कसें विचकावतं आहे? मेला फार वाईट आहे ! सारखी भीति वाटतें मला याची ! रस्ताच अडवून बसलं आहे.

जगांत अनेक सुन्दर पशु–पक्षी आहेत. हंस, चक्रवाक्, सिंह, हत्ती, पोपट हें पशु–पक्षी तुला ठाऊकच नाहीं वाटतं ! प्रभो ! तुझ्यासारख्या रत्न पारख्यानें आपलं चिन्ह म्हणून 'वानर' निवडून गाजरपारखी वृत्ति दाखवावी, हें तुला शोभतें काय?

काळ्याकुट्ट मेघांत विजेची रेषा चमकावी, तशी दांत विचकतांना याच्या काळ्या चेहऱ्यावरून दंतपंक्तिची रेषा दिसतें ! अशा हीन प्राण्याची सेवा

तुला पटावी ना !

प्रभो ! हा माझा अविचार झाला ही मी मोठीं चूक केली. तुझ्यासारखा सर्वदर्शी नि सर्वज्ञ विभूतीस मी ज्ञान शिकविण्याचा प्रयत्न करून लहान तोंडी मोठा घांस घेतला ! मी मर्यादातिक्रमण केलं खरं ! तुझ्यासारख्या स्थितप्रज्ञाला बाह्य शारिरीक सौन्दर्याचें काय ? क्षणिक शारिरीक सौन्दर्य कां कायमचं टिकणार ? आत्मिक गुण हेच प्रत्येकाचं सौन्दर्य ! तेंच नसेल तर मनुष्य म्हणून रहाणार नाहीं ! या वानराच्या अंतरंगाची परीक्षा तूं पाहिलीस ? म्हणूनच त्याची सेवा तुला आवडली असेल. प्रभो, ही आपली निवड सुयोग्य आहे.

हे वानरा ! तूं भाग्यवंत आहेस ! तुझी निर्भत्सना केली मी ! मोठा अपराध घडला मज– कडून ! क्षमा कर ! भाग्य, भक्ति नि सेवा यांचा त्रिवेणीसंगम झाला आहे तुझ्यांत ! म्हणूनच प्रभु

तुला भेटला! तुझ्या भक्तीवर नि सेवेवर तो लुब्ध आहे. जगांत सर्वत्र तुझी अवहेलना होत होती! पण प्रभूंनीं तुला आधार दिला. गुणवान् माणूसच गुणी लोकांची पारख करतात! तुझ्या गुणांची योग्य परीक्षा प्रभूंनीं केली. मत्सरग्रस्त जगांत तुझी किंमत झाली नाही म्हणून तूं प्रभूचे चरण धरलेस ना!

तूं प्रभूचा सेवक आहेस! गुरुप्रत पोहोंचविणारा माझा तूं वाटाड्या हो! मी भवसागराच्या पैलतीरांवर आहे अन् प्रभू भवसागर ओलांडून पैलतीरावर गेले आहेत. आमच्यांत किती अंतर आहे! पण आम्हां दोघांना जोडणारा दुवा हो तूं! प्रभूला भेटण्याची माझी आंतरिक तळमळ त्यांना सांग!

प्रभूचा संदेश सीतामाईला कळविणारा तूंच

ना! सीतामाईची विरहव्यथा प्रभूप्रत पोहोंचविणारा तूंच ना! दोघांची दु:खद अंत:करणं आपल्या सेवेनं खुलविणारा तूंच ना ?

माझी विरहव्यथा प्रभूला कां सांगत नाहींस? त्यांचा अनुग्रह मला कां कळवीत नाहींस ? केवळ मोठ्या पुरुषाना अनुसरून त्यांच्या कीर्तीच्या बळावर मोठेपणा प्राप्त करणं तुला शोभतं कां ? आम्हां-सारख्या रंजल्या-गांजल्यांची तूं सेवा करूं नयेस कां ? आम्हांला तूं जवळ करूं नये कां ?

तुझं कांहीं काम असेल तर मी करीन. पण माझी विरहव्यथा तूं प्रभूस सांग जा ! माझ्या विषयीं प्रभूच्या अन्त:करणांत दया पाझरेल असं कर. माझ्याविषयीं तूं केलेल्या प्रशस्तीनेंच हें कार्य घडेल.

"जगांत प्रत्येक आत्मा स्वतंत्र आहे. आपल्या प्रयत्नानं प्रत्येक जीव आपली हीनावस्था टाकून परमेश्वराप्रत जातो! जगांत प्रत्येकानें आपला विकास स्वतंत्रपणें करावा. कोणी कोणाच्या विकासाआड येऊ नये!" हाच ना भगवंताचा संदेश! तो मी जगास अवश्य कथन करीन.

पण माझा संदेश तूं प्रभूला केव्हां कळविणार? तूं प्रभूचा एकनिष्ठ सेवक आहेस. तू माझं एवढं काम कर!

● ●

## : ३६ : श्री सुमति

हें सारं जग बुद्धीच्या वैभवानं डुलत आहे. निर्मळ मतीचे ( ज्ञानाचे ) तुम्ही नाथ आहात. जेथें सुमति तेथें संपत्ति ! तीच तुमच्याजवळ असल्यास जगांत संपत्तीचा पूर लोटेल.

मला मात्र तुम्ही दूर लोटलं आहे. मी पतिनिष्ठ आहे. सति आहे. पतिविषयींच्या सतत विचारानें मी व्याकूळ झाली आहे, अंधाऱ्या रात्रीं, मुसळधार पावसात दुर्दैवानं सांपडलेल्या स्त्रीप्रमाणं माझी असहाय्य अवस्था झाली आहे. दुःखव्याप्त जगांत आधारहीन होऊन 'सुमति' अनाथ झाली आहे. तिची या असहाय्य स्थितींतून सुटका तुझ्याशिवाय कोण करणार ?

आतां विरहव्यथा असह्य झाली आहे. मीलनाच्या विचारानं मन हर्षित होतं; पण मीलन न झाल्यानं मति भ्रष्ट झालीं आहे.

तुम्ही सुमतिनाथ म्हणविता ! आज तुम्हांला डोळे भरून पहाण्यासाठीं; तुमचं रूप हृदयांत साठविण्यासाठीं मीं आलें ! तुमच्या . महालांत पाय टाकणार तांच जें दिसू नये तें दिसलं ? प्रभो, हें भयंकर दृश्य पाहून मी मृतवत झालें आहे. तुमच्या महाली हा चक्रवाक पक्षी कां ? हें सवतीचं दुःख मी कसं भोगावीं ? चक्रवाकांला जवळ बाळगून तुम्ही माझ्या जखमेवर मीठ चोळलं आहे. प्रभो ! स्त्रियानींच पतिनिष्ठ रहावें; सति म्हणून रहावं आणि पुरुषांनीं मात्र असा विश्वास घात करावा ? या कृत्यानं नाथ अजूनहि 'सुमति' अनाथ झालीं आहे.

चक्रवाकी पक्षीण रात्रभर चक्रवाकाच्या विरहानें टाहो फोडतें. तिच्या आर्त किंकाळीनें माझें हृदय व्याकूळ होतं ! दुःख भरभरून वाहू लागतं !

आम्ही उभयतां समान दुःखी आहोंत. प्रभो ! तिची सुटका करा नि तिच्याजागीं माझी स्थापना करा.

" मीहि विकारातीत झालें आहे. वासनांची विषवेल उपटून टाकली आहे. अभिलाषा मरून गेली आहे, वासना जळून गेली आहे. प्रभूजवळ राहिलें तर त्यांच्या नष्ट वासना मी अंकुरित करणार नाहीं ! अभिलाषा जागृत करणार नाहीं! विकारांची निर्मिति करणार नाहीं.

ही ' सुमति ' आतां जीवनहीन वेलीप्रमाणं रुक्ष बनली आहे. प्रभूच्या नामस्मरणानंच मी नाम-मात्र जीवंत आहे. साजशृंगार केव्हांच निघून गेला. तारुण्यांतील बहार लुप्त झाला. यौवनाची कांति नष्ट झाली. प्रभो ! तुझ्या प्राप्तिविना तिची अशी स्थिति झाली ? उष्णतेनें करपून

गेलेल्या वेलीला पुन्हा बहर थोडाच येणार आहे ? विरहानें जळून गेलेली वासना पुन्हां थोडीच उफाळून येणार आहे ?

चक्रवाक पक्ष्या ! माझा संदेश प्रभूला कळव मला प्रभूप्रत जाण्यासाठीं अनकुल परिस्थिति निर्माण कर.

● ●

: ३७ : श्री पद्म

तुमच्या शुक्रेन्दुवत् मुखकांतीनं माझे नेत्र मुखावले आहेत. अंग मोहरून आलं आहे. वृत्ति बहरली आहे. भावना उफाळल्या आहेत. पुनवेच्या चंद्रानें सागरजल उचंबळून वर यावं तसं माझं अन्त:करण उचंबळून येत आहे.

तूं अंतर्बाह्य शुद्ध आहेस. तुझं अंत:करणं जितकं निर्मळ आहे तितकंच तुझं शरीरहि स्फटिकवत् आहे. वासना नि विकार यांच्या अधीन झालेलं तुझं मन अत्यंत निर्मळ झालं आहे. तुझा आत्मा कर्मातीत झाला आहे. राखेच्या आवरणांत लपलेला स्फुल्लिंग बाहेर पडावा नि त्यानं आपलं दिव्य स्वरूप दाखवावं तसं कर्मांच्या आवरणांतून बाहेर पडलेला तुझा आत्मा आपलं उज्वलं स्वरूप व्यक्त करीत आहे. स्वच्छ जलाशयांत आकाश प्रतिबिंबित व्हावं तसं तुझ्या ज्ञानांत विश्व प्रतिबिंबित झालं

आहे. पंकाचा संपर्क असला तरी त्यांतूनच कमल उमवतं तसं या नश्वर शरीरांतूनच आजचं तुझं परमदिव्य ज्ञान-शरीर उदित झालं आहे. त्याची कांति सर्वत्र पसरली आहे.

तूं पद्म-प्रभु आहेस! प्रभो! तू माझाच आहेस. सुमति म्हणजे विद्येची देवता! सरस्वति! तिचा निवास प्रफुल्लित कमळावर असतो. अरुणाच्या दर्शनानें कमळानं उमलावं; तिच्या पाकळ्यांनीं स्वर्गीय कांती धारण करावी; याच कमलासनावर-अधिष्ठित झालेल्या सरस्वतीनें वाऱ्याच्या झुळके-बरोबर शुभ्रजलांत विहरावं!

मी तुझं आसन व्हावं. तुझ्या सहवासाचा एक क्षण तरी मला मिळावा म्हणून माझं सर्वस्व मी तुला अर्पण केलं आहे. त्याचा स्वीकार कर. मी तुझ्या चरणांची दासी! माझ्या मस्तकावर सदैव तुझे चरण असूं दे!

तू निर्विकारी आहेस. तूं शुद्ध नि पवित्र आहेस. मी विकारी, अशुद्ध नि अपवित्र आहे असं तूं समजूं नकोस ! तुझ्याविषयींच्या भक्तिभावानें मी स्वतःस तुला अर्पण केलं आहे. माझ्या अव्याज प्रेमांत न्यूनता पाहूं नकोस. सर्व सुखोपभोगांचा त्याग करून तुझ्याप्रत येण्याचें दिव्य मी केलं आहे. प्रभो! निर्मळ पाण्याचा स्पर्शहि करूं न देणाऱ्या अतिपवित्र कमळावर माझा निवास असतो. माझ्यांत अपवित्रता कोठून असणार ? तरीहि तुला माझ्या पावित्र्याविषयी संशय येत असेल तर कोणतंहि अग्निदिव्य करावयास तयार आहे. माझ्या ध्यानीं मनीं नि स्वप्नीं मीं तुलाच पहातें. माझ्या श्वासोच्छ्वासाच्या प्रत्येक कणाकणांत तुझ्याशिवाय कोणाचं अस्तित्व आढळणार नाहीं ! माझ्या अंतःकरणावर तुझी असंख्य नांवें कोरलेलीं दिसतील तुला !

पार्वतीपतीच्या मस्तकावरून पवित्र अमृत-जल वाहूं लागलं तसं सुमतीच्या मस्तकावरून ज्ञान-गंगा वाहूं दे ! सुमतीचं मस्तक अनेक नद्यांच्या उगमस्थानाप्रमाणें ज्ञानगंगेचं उगमस्थान होऊं दे?

तुझी कृपा झाली तर हें काय अशक्य आहे! देवाच्या मस्तकावर बसलेल्या माशीलाहि लोक वंदन करतात. देवाचा आधार सुटतांच जगांत तिला कोण विचारतो? तुझा आधार सुटतांच मला कोण विचारील? म्हणून प्रभो! तुझ्या जीवनाच्या पवित्र प्रवाहांत माझ्यासारख्या अभागिनीची अशुचिता आपोआपच धुवून निघेल ! माझ्या कोटिकोटि जन्माचं कल्याण होईल.

तू अनंतशक्तिधारक नि मी अबला ! तुझा भार मी सहन करीन असा विचार मनांत आणू नकोस! मी तुझी एकनिष्ठ दासी आहे. मला तुझा

भार कसा वाटेल? तुझ्या सान्निध्यानं माझा जीवन-रेणु पुलकित होईल. त्या दिव्य नि स्वर्गीय आनंदांत तुझा भार मला सुसह्य वाटेल, माझ्यांतहि अनंत शक्ति निर्माण होईल. कस्तुरीच्या स्पर्शानें माती जशी सुगंधित होते त्याप्रमाणें !

तूं एकदां प्रसन्नचित्तानं माझा स्वीकार कर. पारसमण्याच्या संसर्गानं लोखंडहि उजळून सुवर्णमय बनावं तसं माझं जीवन तुझ्या सहवासांत पुनीत होईल.

● ●

३८ : **श्री सुपार्श्व**

तुझ्या पवित्र कांतीनं सारं विश्व सुधौत झालं आहे. तुझ्या तेजानं सर्वांचेच डोळे दिपून गेले आहेत. प्रभो! तुमचं नि तुमच्या सभेचं वैभव किती म्हणून वर्णन करावं? त्या सभेला समवशरण म्हण-तात. तुझ्या सभेमुळं चमकणाऱ्या रत्नांच्या प्रका-शानं अंधःकाराचा लोप झाला आहे. तेथील सुवर्ण कमलासनावरील तुझ्या मूर्तीचा प्रकाश अनेक रत्नांतून परावर्तित होऊन दशदिशांत पसरत आहे. तुझ्या राज्यांत सर्वत्र समता आहे. देव आणि मनु-ष्यच नव्हे तर पशुपक्षीदेखील तुझी अमृतवाणी ऐकण्यास एकत्र जमले आहेत. गाय आणि सिंह, अहि-अन नकुल एकत्र येऊन तुझा अपार महिमा सिद्ध करीत आहेत. तुझ्या आगमनानें गगनचुंबी झाडें पर्णांनीं नि फळा-फुलांनीं बहरून गेलीं आहेत. सर्वत्र जिवंत नि काव्यमय वातावरण झालं आहे.

सुगंधी फुलांच्या नि पक्व फळांच्या सुवासानें मधु-रता पसरून राहिली आहे. सरोवरांतील कमळावर विविध रंगांचीं फुलपांखरें उडत आहेत. तुझ्या समवसरणाभोंवती असलेल्या जलाशयांत निर्माण झालेल्या लाटांहि जणुं तुझ्याकडे आकर्षिल्या जात आहेत. पक्षी आपल्या मधुर गायनानें तुझी भक्ति-गीत गात आहेत.

सर्व जीव आपापल्या स्थानीं विराजमान होऊन तुझा उपदेश ग्रहण करीत आहेत. तुझें आसन फारच भव्य दिसत आहे. त्याचा पृष्ठभाग दैदिप्यमान इंद्रनील मण्यांनीं सुशोभित झाला आहे. मरकतमणी नि पद्मराग मण्यांनीं पसरविलेलें तेज इंद्रधनुष्यांतील रंगाप्रमाणें भासत आहे. त्यांच्या चारी बाजूस धर्म ध्वजांनीं

मंडित चार उंच स्तंभ असून, त्यावर रत्नांच्या माळा लटकलेल्या आहेत. प्रत्येक स्तंभावर तुझ्या चार चार रत्नमय मंगलमूर्ती, सात्विक भावनांचा वर्षाव करीत आहेत. याच स्तंभांना मानस्तंभ म्हणतात.

तुझ्या आसनाजवळील चारही बाजूंकडील धर्मचक्रें उदयाचल पर्वतावर आरूढ होऊन आपलीं किरणें सर्वत्र पसरविणाऱ्या तेजस्वी सूर्याप्रमाणें भासत आहेत. प्रभो ! हीं सर्व शोभा तुझ्यामुळं अधिकच शोभून दिसत आहे. तुझ्या निर्मळ शरीर-कांतीनें समवशरण उजळून निघालें आहे. प्रभो! या तुझ्या सुन्दर देहामुळेंच तुझं नांव सुपार्श्व असं ठेवलं आहे. प्रभो ! हें रूप माझ्या निर्बल डोळयांनीं माझ्या हृदयांत कसं सांठवून ठेवूं ? हजार नेत्र जरी उघडलें तरी ते सांठवितां येणार नाहीं. सहस्र-

नेत्रधारी इंद्रहि तुझ्या दर्शनानं अतृप्त राहतो. म्हणून पुनः पुनः तो या लोकी येऊन तुला डोळे भरून पाहातो. तेजःपुंज शरीर पहातांना माझें डोळें अधिकच चंचल बनतात.

मी गत जन्माचं संचित पातक घेऊन तुज–कडे आलें आहे. त्याच्या ओझ्यानं मी थकून गेलें आहे. त्यांतून माझी सुटका कर. प्रभो ! लहानां–तल्या लहान कीटकापासून तें हत्तीएवढ्या प्रचंड प्राण्यापर्यंत सर्वांवर तुझी कृपादृष्टी आहे. देवापासून मानवापर्यंत सर्व जीव तुझ्या तीर्थाचा लाभ घेत आहेत. मीच का त्याला अपवाद ? तुमच्या धर्म-ध्वजावरील स्वस्तिकचिन्ह बनेन मी. माझें दोन हात नि दोन पाय यांनीं स्वस्तिकाच्या चार रेषा मी काढीन.

ध्वजावरील चिन्हाला अधिक कांहीं तरी

मौलिक अर्थ असतो. तसा त्या स्वस्तिकालाहि आहे. स्वस्ति म्हणजे सर्व जीवांचा अभ्युदय, त्यांचा विकास त्यांच्या योगक्षेमाचं प्रतीक. सर्वांच्या योग-क्षेमाचं प्रतीक असणारं स्वस्तिक मला होऊं दे.

तुझ्या धर्मप्रवचनांनी तूं हेंच तर करीत आला आहेस. सर्वांचं आत्यंतिक कल्याण, आत्यंतिक क्षेम हाच तुझ्या धर्म घोषणेचा अर्थ ! त्या अर्थाचं प्रतीक असलेलें स्वस्तिकचिन्ह मला होऊं दे !

: ३९ : श्री चंद्रप्रभ

तूं चंद्रदेव आहेस; शशिकांत आहेस. तुझी धवलता विश्व व्यापून राहिली आहे. तूं मोठा मांत्रिक आहेस. कोणता मंत्र तुझ्याजवळ आहे, कोण जाणें ! कोणतं तंत्र तुझ्याजवळ आहें, हें कांहीं कळत नाहीं; पण तुझ्या मंत्र सामर्थ्यानें सारं जग भुललं आहे. खटयाळ वारा निपचित पडून आहे. गाई आशाळभूतपणें तुजकडे पहात आहे. मयुरांनीं आपलं नृत्य थांबविलं आहे. गुराख्यांची बांसरी बंद पडली आहे. त्यांतून येणारा निनाद थांबला आहे. प्रभो! ही सारी किमया तुझी आहे. ही मोहिनी तुझीच आहे. सर्व अंगाला आकर्षून घेणारी ही तुझी मंत्रसिद्धि अपूर्व आहे; 'न भूतो न भविष्यति' अशी आहे. आपल्या शीतल किरणांचा मधुर वर्षाव करणारा चंद्रहि भुलून तुझ्याकडे आला आहे. ज्यानं साऱ्या जगाला आजपर्यंत आपल्या सौन्दर्यानं भुल–

खिलं तो चंद्रहि आज तुझ्या मंत्रानें भुलावा ना ! सार्‍या चंद्रांगनाहि तुझ्यावर लुब्ध झाल्या आहेत. तुझ्या पिठोरी चांदण्यांत त्या आपला संसार दाह कमी करून घेत आहेत.

अनेक वासना-ज्वरामुळें माझ्या शरीराचा सतत दाह होत आहे. जगाला शीतल प्रकाश देणारा तूंच एकमात्र माझा दाह कमी करशील. तूं म्हणशील " सूर्यदेव असतांना, माझ्याकडे कां आलीस ? " पण प्रभो ! उकाड्यानें ज्याच्या शरीराला दाह होतो आहे, त्यानें तो कमी करण्यासाठीं अग्नि-प्रवेश केला तर काय उपयोग ? अनंत भवांत मी हा वासनेचा दाह सोसत आहे. तो कमी करण्या-साठीं सूर्याकडे जाणें म्हणजे, रोगावर उलट मात्रा लागू केल्याप्रमाणें होईल.

पण आकाशांतील चंद्र तरी जागेवर कुठं

आहेत ? आकाशांतील आपलं सार्वभौमत्व विसरून तो तुझ्या सेवेंत हजर झाला आहे. अनंत ताऱ्याच्या समुदायांत प्रकाशत असतां चंद्राला आपल्या प्रकाशा-विषयीं अभिमान वाटत होता. साऱ्या तारकांनींहि त्याचें सार्वभौमत्व मान्य केलं आहे. तुझ्या प्रकाशानं चंद्र आपलं सार्वभौमत्व विसरून गेला. त्याचा अहं-कार मावळला. रात्रभर अनंत तारकांमध्यें वैभवानं आकाशांत विहार करणारा चंद्र तुझ्या सेवेकरितां आला आहे.

वर्षाऋतूच्या दमट वातावरणाचा मनस्वी संताप आल्यानं शारदीय पौर्णिमेच्या चंद्राच्या शीतल नि मोहक प्रकाशाची अपेक्षा करणाऱ्या कामुक लोकांची वासना अतृप्त राहिली आहे. कारण तो आपलं स्थान सोडून तुझं धर्मचक्र आपल्या मस्तकावर घेऊन तुझी कीर्ति गात निघाला आहे.

तारकांहि तुझ्या स्थानापर्यंत येऊन तुझ्या छत्राच्या मौक्तिक झालरीं बनल्या आहेत. जणुं आकाशच खालीं येऊन तुझ्याभोंवतीं लपेटून बसलं आहे. प्रभो! ही शुक्राची चांदणी दिसली ना ? चंद्राच्या राण्यांत आपल्या विशेष कांतीनं चकाकून दिसणारी ही त्याचीं आवडती राणी; पण ती देखील तुमची एकनिष्ठ सेविका बनली आहे. चंद्राच्या सेवेवर तुम्ही लुब्ध बनलात, त्याच्या शीतल प्रकाशाचा तुम्हांलाहि मोह पडला म्हणूनच तुम्ही त्याला आपलं आसन बनविलं.

मग माझं कसं होणार ? माझा दाह कसा शमणार? पृथ्वीवरील सर्व लोकांना होणारा दाह चंद्र शमवितो ! पण त्याच्या अनुपस्थितींत त्याच्याकडं धांव घेण्यांत काय अर्थ आहे. शेतांत पीकंच नाहींतर पक्षी कशाला जातील तेथें? म्हणून तुझ्या

द्वारीं आलें आहे.

मी दीन आहे. अनाथ आहे. दारिद्र्यानें पीडित आहे. वरून देह सुदृढ दिसत असला तरी आंतून अनेक रोगांनीं तें पोखरण्यास आरंभ केला आहे. नेत्र आतां कामांतून गेलें आहेत. वाणीची मधुरता लुप्त पावली आहे. अशा अवस्थेंत तूंच एक शरणमात्र समजून मी तुजकडे आलें आहे. तुझं दर्शन म्हणजे स्वर्गसोपान आहे असें भाविक लोक मानतात; तें पापनाशक आहे आणि शेवटीं मोक्षसाधक आहे असं म्हणतात !

तुझ्या प्रवचनांत सद्धर्मामृताचा वर्षाव होतो नि जन्मजन्मांतरीचा दाह लोप पावतो. सुखसमृद्धीची बरसात होते. हें ऐकून तर मी तुजकडें आलें. माझ्या रोगामुळें होणारा जन्मजन्मांतरीचा दाह कमी कर ! सद्धर्मामृत मला पाज नि सुखसमृद्धींत

माझं जीवन लोळूं दे ! मी गरीब आहे, म्हणून मला दूर लोटूं नकोस.

अनेक रोग तुझ्या अमृत वर्षावानें बरे होतात. म्हणून भवरोगाचा इलाज करण्यासाठीं मी खऱ्या धन्वंतऱ्याकडे आलें आहे.

तूं तृष्णारहित नि हितोपदेशी आहेस. विमल नि विरागी आहेस. सर्वज्ञ आहेस, त्यामुळे कोण-त्याहि वस्तूच्या स्वरूपाचें अचूक निदान करतोस नि निरासक्तपणें औषध देतोस. तुझ्या शीतल प्रकाशानें माझा हा शरीरदाह कमी कर.

तूं निरासक्तपणें काम केलं तरी मी विना-मूल्य कसं करून घ्यावं? प्रभो ! रोगमुक्त झाल्या-वर मी तुया चरणाजवळ बसून राहीन. माझ्या निवासस्थानापासून थोड्याच अंतरावर चंदनाची बनं आहेत. तेथून रोज चंदन आणून तुझ्या चरणावर

त्याचा लेप देत जाईन. माझी एक आंतरिक इच्छा आहे, हें माझं मस्तकच मी चंदन बनविते. तुझ्या पायावर ते सतत राहूं दे? चंदनांप्रमाणं तुझ्या सेवेंत ते झिजत गेलं तर माझं जीवन मी कृतार्थ मानीन? तुझा चरणस्पर्श माझा सर्व दाह कमी करील.

● ●

: ४० : श्री पुष्प-दन्त

.. समवसरणाच्या सर्वश्रेष्ठ स्थानावरून तुझ्या मुखांतून ज्ञानगंगा निर्माण झाली आहे. जगांतल्या सर्वश्रेष्ठ पर्वतातील–हिमालयांतील–गंगोत्रीपासून नि जम्नोत्रीपासून गंगा नि यमुना या दोन महा-नद्या उगम पावतात. समवसरणांतील सर्वश्रेष्ठ स्थानावरील ज्ञानोत्रीपासून ही ज्ञानगंगा उदित झाली आहे. जगांतील यच्चयावत ज्ञानाचं उगम–स्थान म्हणजे ही ज्ञानोत्रीच होय !

अज्ञानाच्या आवर्तांत गिरक्या खात खात दिङ्मूढ झालेल्या लोकांविषयीं तुझ्या मनांत अनु–कंपा निर्माण झाली. सतारीच्या तारांचा स्पर्श होतांच मंगल ध्वनि निर्माण व्हावेत, त्याप्रमाणें तुझ्या दयार्द्र अन्तःकरणाला जनतेविषयी अनुकंपा स्पर्श पावली. त्यांतून ज्ञानाचा प्रवाह निर्माण झाला. सूर्याच्या आगमनानें अंधाराचा कण न् कण नष्ट

होतो, तसंच तुझ्या ज्ञानभास्करानें अज्ञान दूर होतें.

तुझ्यापासून निर्माण झालेल्या या ज्ञानगंगेंत अविद्या कुठं वाहून जातें कोण जाणें ? तुझ्या ज्ञान-गंगचें शेंकडों ग्रंथ–प्रवाह सर्वत्र पसरले. तुझी ज्ञानगंगा म्हणजे एक तीर्थच आहे! त्याच्या स्पर्शानें प्रत्येक वस्तु पावन नि पवित्र बनत आहे. लोक नि अलोक याचं स्वरूप स्वतःच प्रकट झालेलं आहे. दुथडी भरून वहाणाऱ्या या ज्ञानगंगेचे अहिंसा नि सत्य हें कांठ होत. गंगेचे पात्र ठिकठिकाणीं तिच्या किनाऱ्यावर असणाऱ्या तीर्थक्षेत्रांनीं शोभून दिसावं, तसं तुझ्या ज्ञानगंगेचे पात्र तिच्या किनाऱ्यावर आसन मांडून ज्ञान–ध्यानमग्न झालेल्या मुनींनीं शोभून दिसत आहे. राजहंसांनीं दूध नि पाणी यांच्या मिश्रणांतून दूधच हुडकून काढावे, त्याप्रमाणें हिंसा



९

नि अहिंसा, सत्य नि असत्य यांच्या मिश्रणांतून महान मुनि नेमकं अहिंसा नि तत्व ह्या गोष्टींच हुडकून काढीत आहेत. या पात्रांतून दया, क्षमा, शांति यांची लव्हाळी विनम्र झाल्या आहेत. उदात्त विचारांची कमळें प्रफुल्लित झालीं आहेत. राग-द्वेषांचें शेवाळं नाहीं. स्वार्थाचा चिखल नाही, ससीमसागराची तुझ्या निस्सीम ज्ञानगंगेशी तुलनाहि होणं अशक्य. पापें धुवून जावीत, म्हणून लोक तुझ्या ज्ञानगंगेंत नहात आहेत.

सर्व प्राण्यांत आपल्या बुद्धिवैभवानें प्रभुत्व गाजविणारा मानवप्राणीच तुझ्या पात्रांत सुधौत होत नसून सर्वंच प्राणी आपापलीं पापं समूळ नष्ट करीत आहेत. पुराच्या पाण्याच्या लोंढ्यानें काठां-वरचें मोठमोठें वृक्षहि उन्मळून पडावेत, त्याप्रमाणें अनेक भवाच्या भ्रमणानें ग्रंथित झालेल्या पाप राशीं

तुझ्या ज्ञानप्रवाहांत नष्ट होत आहेत. पशु-पक्षी नि हिंस्रप्राणी देखील आपापला वैरभाव सोडून तुझ्या तीर्थांत एकत्र येतात.

ही मगर तर कायमचीच तुझ्या तीर्थांत निवास करून आहे. प्रभो ! मगरीसारख्या हिंस्र प्राण्याला तूं आपल्या तीर्थांत जागा द्यावी नि तुझी अनन्यभावें सेवा करणाऱ्या, मला मात्र स्थान असू नये ही एक महदाश्चर्यांची गोष्ट आहे. रात्रंदिन तुझी भक्ती करणाऱ्या भक्ताला तूं विचारूं पण नयेस ? तुझ्या तीर्थांत स्नान करण्याची गोष्ट तर बाजूलाच राहूं दे; पण त्या अथांग ज्ञानसागरांतील एक बिंदूहि मला मिळूं नये ? तुझें प्रतीक बनून ही तुझ्या तीर्थांचं रक्षण करीत आहे. प्रभो ! अशा भयाण प्राण्याची तुझ्या तीर्थक्षेत्री जर तूं नियुक्ति केलीस तर आमच्यासारख्या अबलांनीं तेथें प्रवेश

कसा करावा. प्रभो ! तूं वीतरागी नि हितोप-देशी असूनहि तुझ्या तीर्थी येण्यास आम्हांस भीति वाटावी हें आश्चर्य नव्हे का ?

पण कदाचित तुझ्या संगतीनें ती अत्यंत निर्मळ मनाची नि पूर्ण अहिंसक बनून तुझी सेवा करीत असावी. म्हणून तुझं प्रतीक म्हणून त्याला जागा मिळाली असावी.

मी मगरीस नांवें कां ठेवूं ? माझ्या अज्ञान सागरांत क्रोधादि विकारांचें मगरमच्छ कां कमी आहेत? त्यांच्या केवळ हालचालीनें माझा विवेक क्षुब्ध होतो, माझी शांति नष्ट होते, माझी माणुसकी मला पारखी होते, माझे सद्विचार पंखांवर आरूढ होऊन पसार होतात.

मलाहि तुझ्या सेवेचा निवारा दे. तुझ्या सावलीनंहि प्रकाश मिळेल. तेवढा प्रकाश तरी मिळूं दे.

: ४१ :

## श्री शीतल

जगांतील उत्तमोत्तम शीत पदार्थांनीं तुझं शरीर बनलं आहे. अनेक सुगंधी द्रव्यांनीं तें युक्त असल्यानें त्याचा सुवास सर्वत्र दरवळला आहे. तुझ्या शरीराची शीतलता नि मोहकता यामुळें सारे लोक तुझ्याकडे आकृष्ट झाले आहेत.

तुझ्या शोधार्थ मी निघालें. खूपखूप भटकलें. संसाराच्या या पदयात्रेनें मीं थकलें आहे. किती कालापासून मी सारखी चालत आहे. हें उन्हाचें तडाखे आतां मला सहन होत नाहींत. माझ्या कृश देहाला ही दगदग सोसवत नाहीं. रोज रोज उन्हाच्या झळाळीनें माझं शरीर करपून जातं ! मी तुझ्या दर्शनाला निघालें पण माझ्या मूर्खपणामुळें मी वाट चुकलें ? त्यामुळें तुझ्या शोधार्थ निघूनहि तुझ्यांतील नि माझ्यांतील अंतर वाढतच गेलें.

वस्तूचं स्वरूप अज्ञानानं जाणण्याचा प्रयत्न

ग्रंथालय
30755
अनुक्रम ८१.९१
दिनांक 2.3.21

करणें म्हणजे माझ्या मूखतेची कमाल झाली. मिथ्या दर्शन, मिथ्याज्ञान नि मिथ्या चारित्र्य, या दुष्ट वाटचाड्यांनीं माझ्या मार्गांत अनेक विघ्न आणून त्रास दिला. त्यानींच मला संभ्रमांत टाकले. त्यांनीं केलेलं मार्गदर्शन म्हणजे लांडग्यानें कोंकरास केलेलें मार्गदर्शनच होय. किंवा आंधळयानें आंधळयांस केलेलें मार्गदर्शन होय. त्या मार्गदर्शनानें मी एकांताकडें झुकलें.

कोणत्याहि कार्याच्या सिद्धीकरतां उपादान नि निमित्त या दोन महत्वाच्या कारणांची आवश्यकता असतें. मुख्य नि गौण साधनांनीं कार्यें होतात. यापैकीं एक जरी नसेल, तरी कार्यसिद्धी होत नाहीं. हें मला कळलें नाहीं. पण आतां माझ्या डोळयांवरील मिथ्यात्वाची झांपड नष्ट झाली आहे. आपण सांगितलेल्या प्रामाण्यपूर्ण व न्यायसंगत मार्गानें मी गेलें नाहीं. म्हणून मी आज तुझ्याप्रत आलें.

मी क्षुधित नि तृषार्त झालें आहे. घामानं परिश्रमानं, तहानेनं नि भुकेनें मीं व्याकूळ झालें आहे. तुझ्या श्रीवृक्षाच्या सांवलींत मला विसांवा घेऊं दे !

श्रीवृक्ष हें तुझं चिन्ह ! खरंच किती मोलाचं चिन्ह आहे हें ! वृक्ष मग तो कोणताहि असो, मानवांचा हितकर्ता आहे. त्याच्या सांवलीत विसांवा घ्यावा. त्याच्या फुलांनीं शृंगार करावा, औषधी बनवाव्यात नि रोगमुक्त व्हावं. त्याच्या लाकडानं संसारिक अनंत गरजा भागवाव्यांत. त्याच्या रसानं संतुष्ट व्हावं.

वृक्षाच्या संगतींत वाढलेली मानवजात परोपकारी, दानी, संयमी आणि विवेकी बनावी हाच तर तुझा संदेश नाहीं ना ?

वृक्षाला प्रतीक ठेवतांना तूं खरंच फारच

मोठं तत्त्व हृदयाशीं बाळगलं असेल, वृक्षासारखंच मानवी हृदय पाऊस, ऊन, थंडी यांच्याशी एकरूप झालं तर दुसरं तप तें काय असणार ?

वृक्षाला आपलं चारित्र्य तोंडानं सांगावं लागत नाहीं, तें त्याच्या सर्वांगांत सामावलं असतं. त्याच्या फांद्या–फांद्यांतून तें प्रफुल्लित झालं असतं. मला वाटतं यालाच सम्यक चारित्र्य म्हणत असावें.

• वृक्षाला काय ज्ञान असेल, अशी माझी भोळी सम ूत होती. पण केवळ बडबड म्हणजे ज्ञान नव्हे. उपदेश म्हणजे ज्ञान नव्हें. असं जणु तुला सुचवायचं आहे काय ?

तुझ्या उपदेशाचं मर्म जसं माणसांपासून तो पशुपक्षांनाहि सहज कळते. त्याप्रमाणंच झाडाच्याहि उपदेशाचं मर्म सर्वांना कळतं. त्याला वेगवेगळ्या भाषा नसतात. पण सर्वांना सहज कळेल, अशा

भाषेंत तो सर्वांना आवाहन करीत असतो.

त्या श्रीवृक्षाचा कृपा-प्रसाद मला प्राप्त होऊं दे. मला श्रीवृक्ष होता न आलें तर, मला त्याची फांदी कर. तेहि शक्य नसेल तर, पान तरी कर !

मला श्रीवृक्षाचें हिरवें पान होऊं दे.

● ●

## : ४२ : श्री श्रेयांस

आज तुझ्या उद्यानांत कसला जमाव जमला आहे ? जगांतील सर्वोत्तम मंगल असे आचार्य, उपाध्याय आणि साधु-साध्वी तुझ्या पवित्र क्षेत्रांत जमले आहेत. प्रभो ! विश्वांतील अखिल जीव-जंतूंचा तूं कल्याणेच्छु आहेस. तुझा आदर्श समोर ठेऊन जगाचं हित चिंतणारें आचार्य, उपाध्याय, साधू हे तुजपासून स्फूर्ति घेण्यासाठीं येथें जमले आहेत.

त्यांच्या उपस्थितीनं तुझ्या समवसरणास शोभा आली आहे. तुझ्या मधुर अमृतवाणीचा झरा अखंड वाहात आहे. त्याच्या पाण्यावरच हीं फुलझाडं फुललीं आहेत. त्यांच्यावरील असंख्य फुलांमुळें, ताऱ्यांनीं फुललेलें आकाश, जमिनीवर उतरल्याचा भास होतो.

माळयाच्या रूपानं हा मस्तवाल गेंडा कां फिरतों सर्वत्र ? इतक्या रम्य उद्यानाचा पालन-कर्ता हा अरसिक प्राणी, गेंडा-असावा, याचं आश्चर्य वाटतं. मोठमोठे रसिकहि केव्हां केव्हां अरसिकाप्रमाणें वागतात, असं म्हणतात, तें कांहीं खोटं नाहीं; पण प्रभो ! तूं सर्वज्ञ आहेस. तुला ज्ञान शिकविण्या प्रयत्न म्हणजे सूर्याला त्याचं अस्तित्व दाखविण्यासाठीं एखादी मिणमिणती पणती दर्शविल्याप्रमाणें होय.

तुझी निवडच योग्य आहे. गेंड्यासारखा हिंसक प्राणी तुझ्या दरबारीं गोगलगाय बनला आहे.

आपले सर्व हिंसक भाव सोडून तो तुझ्यापुढें अति नम्र झाला. हिंसक प्राण्यांनाहि अहिंसक बनविण्याची तुझी किमया अजब आहे. तुझं नांवच शीतलनाथ आहे. अत्यंत क्रुद्ध प्राण्यांना शांत बनविण्याची किमया तुझ्याशिवाय आणखी कोणाकडे असणार ?

मला मात्र या गेंड्याची फारच भीति वाटते. त्याच्या अजस्र आकाराकडे पाहून माझी भीतीनें कोण गाळण उडते ?

गेंड्या ! प्रभूचं प्रतीक बनून तू प्रभूच्या महालीं गेलास ? तुझ्या सेवेवर भगवंत खुष झाले. प्रभु विश्वांतील सर्व जीवांचें हितकर्ते असतांना त्यांच्या दरबारी राहण्याचा मान तंच सतत बाळ-गावा, हें तुला शोभतं तरी काय ? "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति" असं म्हणतात. पण संतांच्या सान्निध्यांत तूच एकटा राहून, तुझें कल्याण सावतो आहेस. ही तुझी स्वार्थी वृत्ति सोड.

'कल्याण साधा आणि साधूं द्या' ही नीतीहि तुझ्यापुढें आदर्श ठेव. अरे! आत्मकल्याण साधण्याकरितां मी फारच लांबून येथें आलें आहे. पण येथें मला मज्जाव आहे. हा माझ्यावर अन्याय आहे. तो दूर होईपर्यंत मी येथेंच बसून राहणार. यापुढें मला कोणाचीच भीति वाटणार नाहीं. मरणाची कल्पना मला भिववूं शकणार नाहीं. आजपर्यंतच्या जीवसृष्टीचा इतिहास सांगतो–"आत्मा अमर आहे नि देह मर्त्य आहे. आत्म्याला कोणी छेदूं शकणार नाहीं. त्याचा वध होणार नाहीं. शरीर नाशवंत आहे."

प्रभूच्या दर्शनानें आत्म्याभोंवती असलेलीं कर्मांचीं वज्र–बंधनें तटातट तुटून जातील. म्हणून मी आलें आहें. माझ्या मार्गानें मला जाऊं दे. किंवा तूं तरी माझा मार्गदर्शक हो.

## : ४३ : श्री वासुपूज्य

सरोवरांतील जलाप्रमाणें तुझं मन निर्मळ झालं आहे. सर्व प्रकारच्या रागद्वेषांपासून तूं अतीत आहे. चंद्र निरीच्छपणें जगास प्रकाश देतो. गरीब-श्रीमंत किंवा सुशिक्षित–अशिक्षित असा भेद न करतां आपल्या शीतल किरणांचं दान देतो. चंद्राला कोणी निंदो किंवा वंदो पण तो मात्र सर्वांना सार-खाच प्रकाश देतो.

जगाच्या कल्याणकार्यांत तुझी स्तुति कर–णारे किंवा तुझे निंदक असे भेदभाव तूं पाळीत नाहीस. तूं निरिच्छ नि निर्विकारी आहेस. पण तरीहि तुझ्या भक्तीनं अनंत जीवांचें कल्याण झालें, आहे. तुझ्या भक्तीनं तुझ्या भक्तांच्या मनांतील पाप जळून भस्म होतात. अशुभ प्रवृत्ति नि दुष्ट यांचा उच्छेद होतो. आणि त्यायोगें पुण्यप्राप्तीचा दरवाजा मोकळा होतो, जरी तूं कांहीं देत–घेत

नाहींस तरी त्यांच्या प्राप्तीसाठी तूं निमित्त आहेस. वादकाच्या हस्तस्पर्शानें मधुर आवाज करणारा मृदंग लोकांपासून कसलीं अपेक्षा बाळगतो? जन-हितासाठीं दिव्यज्ञानाचा उपदेश देतांना तूंहि निरिच्छ असतोस. वाद्यांना स्पर्श करतांच जगाचं मनोरंजन करणारा मधुर ध्वनि निर्माण होतोच ना! तसंच तुला स्पर्श केल्यानं अनेक पापविनाशी सुस्वर मनांत उद्‌भवतात. भौतिक किंवा अध्या–त्मिक कोणतेंहि कार्य असो त्याच्या सिद्धीसाठीं मी आणि तूं यांची मला जरूरी वाटते.

मोक्षाची वाटचाल करणारा माझा आत्मा मुक्तीच्या कार्यांत मुख्य कारण आहे. अन् भक्ति? ती मात्र निमित्त आहे. जीवाजीवांच्या संगतीनं अनंत दुःखं देणाऱ्या संसाराचा आरंभ होतो. पण मोक्षगामी आत्मा नि तुझी भक्ति यांच्या

संगतीनें मुक्तीचा लाभ होतो. तुझ्या भक्तीचा महिमा अफाट आहे. ती जणुं कल्पवृक्ष आहे. पण तुझ्या भक्तीला कल्पवृक्षाची उपमा देणं चूक आहे. कारण दोन्ही गोष्टीं इच्छा सफल करणाऱ्या असल्या तरी कल्पवृक्षाच्या सान्निध्यांत केलेल्या इच्छेनें भौतिक सुखाची प्राप्ति होते नि तुझ्या भक्तीनें अध्यात्माच्या अमृताचा लाभ होतो.

भक्तीचं व्यक्त स्वरूप म्हणजे गुण-स्तुति ! तुझ्यांत अनंत गुण आहेत ! त्या प्रत्येकाची स्तुति करण्यास जगांत कोण बरे समर्थ आहे ? तुझी स्तुति किती करणार ? पण प्रभो ! तुझी भक्ति सतत करावी, हीच एक मनीषा बाळगून मी येथें आलें आहे. ती कदाचित चूक असेल माझी. त्यानें तुझ्या स्वरूपांत कोणता बदल होणार ? विषाच्या एका थेंबानें समुद्र विषमय थोडाच बनणार आहे?

समुद्र तो थेंब आपल्यांत सामावून घेतो. तसंच माझी वेडीवाकडी भक्ति तूं गोड करून घे. माझें बोबडेबोल लहान मुलाचे बोल समजून कौतुकानें ते ऐकून घे !

तुझी भक्ति लोक अनेकरूपांनीं करतात. धनवंत तुझी मंदिरें बांधतात. भक्त लोक पूजन-सामुग्रीनें तुझी भक्ति करतात. कांहीं लोक तुझ्या मंदिराचे दगड वाहून पूजा करतात.

तुझी भक्ति करणाऱ्या भक्तांपैकीं महिषावर तूं अधिक प्रसन्न झाला आहेस. त्याला तूं आपलं प्रतीक निवडलं आहेस.

● ●

: ४४ : **श्री विमल**

तूं निर्मळ आहेस. तुझ्या विमल यशाची कीर्ति त्रिभुवनांत पसरली आहे. तुझ्या धवल यशाची गंगा गंभीरपणें वाहत आहे. तिच्या स्पर्शानें आपलं जीवन पुनीत करण्याकरितां असंख्य लोक तिच्याकडे धांव घेत आहेत. तुझ्या यशोगंगे-तील एकेक थेंब ग्रहण करण्यासाठीं काय त्यांची धांदल उडाली आहे! तूं ज्ञानावरण कर्माचा क्षय केल्यानं गडद–निळ्या ढगांतून वाट काढून पूर्ण–बिबानं प्रकाशणाऱ्या चंद्राप्रमाणें शोभूं लागला आहेस. तुझ्याज्ञानचंद्राच्या कला आतां पूर्ण झाल्या आहेत. त्यामुळं तुझं ज्ञान परिपूर्ण झालं आहे.

निष्क्रियत्व, अव्याबाधत्व, अकर्तृत्व अभो-क्तृत्व, सूक्ष्मत्व आदि गुण तुझ्यांत वास करीत आहेत. या गुणांमुळेंच तुझी कांति फांकली आहे. दीपक स्वत: प्रकाशमान राहून इतरांनाहि उजेड

देतो, त्याप्रमाणं तुझं अनंतज्ञान स्वप्रकाशक व पर–प्रकाशक आहे. तूं आतां निर्मळ झालास ! तुझं कल्याण तूं साधलं.

तूं विमल आहेस. जगतालाहि निर्मळ कर–ण्याचा तुझा यत्न प्रशंसनीय आहे. तुझ्या कार्यांत अविरतपणें साहाय्य करणारा सूकर तुझा सोबती आहे. मळ नाहींसा करण्याची सेवा करणारा सूकराशिवाय दुसरा सोबती तुला मिळणार नाहीं. हें काम तो रात्रंदिन करीत आहे. जेथें जेथें लोकांचा निवास आहे, जेथें जेथें गांवं वसलीं आहेत, त्या प्रत्येक ठिकाणीं जाऊन तो तेथील जागा स्वच्छ करतो. सेवेचें हें महान कार्य सर्वश्रेष्ठ आहे.

तुझं चिन्ह ‘ सूकर! ’ डुक्कराचे शरीर मलीन. अशा मलीन प्राण्याला ‘विमल’ प्रभूनं आसरा द्यावा ना ! ज्याच्या शरीरस्पर्शानें कुणीहि घाण ठरेल;

अशा प्राण्यास तुझी कृपा प्राप्त झाली आहे.

हे सूकरा ! तूं धन्य आहेस ! तुझ्या यशाचें रहस्य मला सांग. आमचीं शरीरंच आम्हीं स्वच्छ ठेवतो. त्याला भूषवितो. त्याच्या पोषणासाठीं अवाढव्य व्याप—संताप करतो, साऱ्या चेतन—अचेतन सृष्टीला ग्रासून टाकणारा लोभ आमच्या मनाला वेष्टून आहे.

शरीराच्या पलीकडे कांहीं जीवन आहे, शरीराला सोडून कांहीं सार-तत्व आहे याचा आम्हांला विसर पडला. आपलीं मनं, शरीरं सारीं लोभांनं माखलेलीं आहेत. परिग्रहाच्या—ममत्वाच्या पोकळ कल्पनांनीं, रेशमी तंतूंनीं बद्ध झालीं आहेत.

आत्मविस्मृति हाच मळ ! चैतन्याचा विसर हीच नाशाप्रत नेणारी काजळी. काजळीत ज्योतहि मलीन दिसते. तसं आमच्या आत्म्याचं झालं आहे.

मौलिक विचार धुरकटले आहेत. ज्ञानशस्त्रें गंजलीं आहेत. धवल चारित्र्याचे हिमनग विरत आहेत.

ही आमच्या मनाची घाण, हे डुक्कर प्राण्या, नष्ट करण्याचा पाठ आम्हांला शिकव! मला शिकव. सर्वांना शिकव.

तुझा आदर्श समोर ठेवल्याविना प्रभु-दर्शन मला कसं घडेल. विमल-नाथ कसे दिसतील?

● ●

## : ४५ : श्री अनंतनाथ

अनंत म्हणजे एक आणि एक म्हणजे अनंत. एक म्हणजे आत्मा. अनंत गुणांनीयुक्त असलेल्या आत्म्याचें मोजमापं होणं शक्य नाहीं!

मुंगीच्या शरीरांतील आत्मा, हत्तीच्या शरीरांतील आत्मा आणि सर्व लोकांना व्यापून असलेला आत्मा हे सारे सारखे, साऱ्यांत अनंत शक्ति, अनंत ज्ञान!

सागराला सीमा आहे. आकाशाला सीमा आहे. परंतु आत्मसूर्यांच्या किरणांना सीमा नाहीं. तें बद्ध असले तरी मुक्त आहेत. मुक्ति हा स्वभाव. स्वभाव कधीच नष्ट होत नाहीं. आणि जो नष्ट होतो त्याला स्वभाव तरी कसें म्हणावे?

तू अनंताचा नाथ आहेस. सर्वांना सुखाचा मार्ग दर्शविणारा दीप आहेस. त्या दीप–प्रकाशांत पुरुषार्थ मात्र ज्याचा त्यानें करावयाचा असतो.

भवसागरांतील विकाराच्या प्रचंड लाटांशीं टक्कर कशी द्यावी, हें ज्याचं त्यानं ठरवावयाचं असतं. कुणी भक्तीनं तरतात; तर कुणी ज्ञान–मार्गांनें जातात. कुणी चारित्र्याची साधना करून जातात. पण भक्ति–श्रद्धा, ज्ञान अ णि चारित्र्य हीं सारीं धवल पाहिजेत. एकवटली पाहिजेत.

ही साधना कांटेरी आहे. म्हणूनच तूं, मला वाटतं तुझं चिन्ह म्हणून सायाळ पक्षी ठेवला आहेस.

सायाळा ! अनंताच्या साधका, अनंत काटे उराशी बाळगून सुखाची साधना कशी करावा हा पाठ मला शिकवशील काय ?

सुखा–समाधानानं, तपश्चर्या न करितां रंग-महालांत बसून मोक्षाची साधना कधी तरी होणं शक्य आहे कां ?

कठोर साधनेशिवाय मोक्ष कां प्राप्य आहे? तूंच मला या अनंत संकल्प–विकल्पांच्या जाळ्यां–तून सोडीव !

सायाळा, तुला प्रमाण !

● ●

: ४६ : **श्री धर्म**

अत्यंत कठिण अशा कर्मपर्वताला तुझ्या रत्नत्रयधर्मानें भेदून त्याचे तुकडे तुकडे केले आहेत. मोहाचा कोट तुझ्या वज्रमयी धर्मानें जमीनदोस्त झाला आहे. प्रभो ! तूं धर्मनाथ आहेस ! संसारां-तील दुःखापासून सुटका करून सुखाप्रत नेणारा धर्मच खरा धर्म होय. धर्म हा सुखी जीवनाचा मार्ग होय !

तूं साक्षात धर्मच आहेस. तुझ्या मार्गदर्शनानें आतापर्यंत अनेकजण दुःखमुक्त झाले. तुझे सर्वच

व्यापार असामान्य होत. तुझ्या सर्वच क्रिया आत्मिक. तुझे कायिक, वाचिक नि मानसिक असे सर्वच व्यापार अजब वाटत आहेत.

ज्ञानाच्या अग्नीनं तूं दैनंदिन गरजा नष्ट केल्या आहेत. तुला भूक त्रास देत नाहीं. तहान स्वतःच कोरडी होऊन तुला सोडून गेली आहे. रोगांचे कीटाणु तुझ्या शरीरकांतीनं स्वतःच अमरदेह धारण करीत आहे.

सदैव तरुणासारखा तुझा देह दिसत आहे. आळस, शैथिल्य, सुरकुतलेपणा या गोष्टींनीं तुझा त्याग केला आहे.

नित्यानंदस्वरूप, नित्य उल्हसितवृत्ति, नित्य-प्रकाशी तूं आहेस. तुला पाहतांच माझी निराशा, माझं मनोमालिन्य, माझा निरुत्साह, माझे भग्न-हृदयभाव दूर–दूर कुठे पळून गेले हें मला कळत नाहीं !

मी धर्माचा शोध दगडधोंड्यांत, झाड–पाल्यांत, पोथी–पुराणांत करीत आलें. मला धर्म दिसला नाहीं. जिथं जावं तिथं मला त्याची विटं–बना वाटली. मी धर्मासंबंधीं निराश झालें. धर्माच्या नांवाखालीं विकारांची साधना, वासनेचे चोज पुरवणें चालू होते.

मी तुझ्याकडे आलें. तूं न सांगताहि मनांस पावित्र्य लाभलं. शांतता लाभली. माझ्या उन्नतीचा मार्ग मला दिसूं लागला. आत्मधर्माचा मार्ग मला दिसला.

धर्मदेवा, तुं तुझं चिन्ह ' वज्र ' ठेवलं आहेस. कां ठेवलं असेल, तें चिन्ह! याचा मी विचार करतें. माझं मन म्हणतं–धर्म वज्रासारखा असतो. अवि–नाशी असतो. सर्वपापांचा नाश करणारा असतो. पतित जीवांचा उद्धारक असतो. म्हणूनच कदाचित

तें तुझं लांछन-चिन्ह शोभून दिसतं.

वज्रासारख्या धर्माची साधनाहि तितकीच कठीण असणार ! मला तें कसं शक्य आहे ? माझं हें स्त्रीचं शरीर-कोमल, सुकुमार ! वाऱ्याच्याहि आघातानं वेलीसारखं थरथरणारं; कापसासारखं मृदु-विकाराच्या यःत्कचित ठिणगीनं पेट घेणारं ! मग या देहांनं माझी साधना पूर्ण कशी होईल.

माझ्यांतील धर्म-पुरुषार्थ जागा व्हावा, मला वज्रासारखं खंबीर मन प्राप्त व्हावं म्हणून हें वज्रा मी तुलाच आव्हान करते. तूं प्रभूला माझा निरोप कळव. धर्म विरहानं व्याकूळ झालेल्या एका अब-लेची करुण कहाणी त्याला सांग.

● ●



भगवान शांतिनाथांच्या जन्मदिनीं इंद्राचे पत्नीसह आगमन.

## : ४७ : श्री शांति

मी अशांत होतें. मी अतृप्त होतें. अज्ञा-नाच्या अन्धःकारांत चांचपडत होतें. तुला शोधावं म्हणून धडपडत होतें. तुझ्या शोधांत असतां मी मलाच सापडलें. माझं हरवलेलें मी-पण मला गवसलं.

एका रात्रीं मी विमूढ होऊन निद्रिस्त झालें होतें. कशाचीहि आठवण नव्हती. मी स्वतांत विलीन झालें होतें.

वीणेचा मधुर निनाद मला ऐकू आला. त्या नीरव शांततेत शांतीचें गुलाब फुलवीत येणारे तें निनाद मांत्रिकाच्या मंत्रोच्चारासारखें वाटले मला. माझ्या मोहमय निद्रेंतून कुणी तरी मला जागृत केलं. माझं भौतिक शरीर कुणी तरी हिरावून घेतलं आहे. मी मुक्त झालें आहे. देहभार हलका झाल्यानं आत्मा कसा अनिर्बंध झाला होता.

चराचरांत विहार करून लोकांच्या अग्रभागी जाऊन आलें मी. मी कृतकृत्य झालें.

प्रभु, हा तुझ्या शांति विणेच्या झंकाराचा प्रताप असावा, असं मला वाटतं.

तुझं चरित्र गावं, तुझ्या चारित्र्याशी एक-रूप व्हावं, म्हणून मी धडपडलें.

सर्व प्रकारचीं भौतिक सुख-दुःख भोगतांना तूं स्थितप्रज्ञासारखा राहिलास! षट्खंडभूमि जिंकून आल्यावर तूं जेव्हा मातेला वंदन करावयास गेला तेव्हां मातेनं म्हटलं होत ' सुखी हो, बाळ. '

तूं आईला म्हणाला होतास, ' आई, कर्माची फळं भोगतोय मी! हे राज्य, ही संपदा, हे सुखो-पभोग सारीं सारीं कर्माचीं फळं आहेत. या फळांच्या उपभोगानं संसार खुंटत नाहीं."

आणि मग तूं 'खरं सुख कुठं आहे' हें सांगण्यासाठीं सर्वस्वाचा त्याग केलास. दिगम्बर झालास.

नीलाकाश आणि सर्वरक्षक मेदिनी यांचा तूं मित्र झालास. त्या त्यागानें जग उजळलें, प्रकाशमान झालें.

तुझ्या त्यागाचाच हा सूर्यगोल बनला असावा. त्याशिवाय अखिल जगताला नित्य प्रकाशित करण्याचा मान त्याला कसा मिळाला असता ?

दुसऱ्याला प्रकाशमान करूं पाहणाऱ्याला स्वतः प्रकाशमान असावें लागतें. दुसऱ्याला मोक्षाचा उपदेश करणाऱ्याला स्वतः जीवनमुक्त व्हावं लागतं.

म्हणून अनेक वर्षें तूं जीवन मुक्तिसाठीं घालविली. तुझी तपश्चर्या फळाला आली. अज्ञान,

अविद्या, मोह, माया इत्यादिकांचे रेशमी व हवे-हवेसे वाटणारे भौतिक पाश तूं शांतपणें तोडून टाकलेस. सर्पानें कांत टाकावी तसें !

"शांति ! शांति" हाच तुझा आदेश. खळखळणाऱ्या दर्याला केवळ या दोन शब्दांनी शांति मिळाली. 'कुहु' 'कुहु' या दोन शब्दांनी जसें व संताचं आगमन सूचित व्हावं तसं केवळ 'शांति! शांति' या शब्दांनीं तुझी धर्मसाधना प्रगट झाली.

या शांति–धर्माचं प्रतीक म्हणून तूं मृगास–हरिणास जवळ केलंस. चंचल नयनाच्या या प्राण्यास, सिंहाच्या गर्जेनेनं मृतवत होऊन पडणाऱ्या मृगास, तूं जवळ केलंस ?

कां ?

क्रूरतेस क्रूरतेनं, हिंसेस हिंसेनं जिंकतां येणं अशक्य आहे म्हणून ! सिंहाची क्रूरता शांति–मृगा-

पुढं दीन ठरावी; हिंसकाची हिंसा अहिंसा सम्राटा-
पुढं नम्र व्हावी म्हणून !

माझ्या चंचल मना, तूं शांति–मृग हो ! प्रभूचें चिन्ह हो !

● ●

## : ४८ : श्री कुंथु

प्राणीमात्रावर दया करणें, हेंच परमात्म–स्वरूपाची प्रांप्ति करून घेण्याचें साधन आहे. सर्व प्राण्यावर दया करणें म्हणजे त्यांच्याविषयीं परम समता धारण करणें होय. शत्रु व मित्र याविषयीं रागद्वेषाचा त्याग करणें; शत्रू व मित्रभाव सोडून देणें यांसच पूर्ण अहिंसा म्हणतात. जेव्हां अशी

अहिंसा, अशी शांति आपणांस लाभते, तेव्हांच आत्म्यास परमात्मपद मिळतें.

अहिंसेचें पूर्ण पालन व्हावें, म्हणून सर्व परिग्रहांना तूं त्याग केलास, दिगंबर झालास. आत्म्याच्या ज्ञानस्वरूपांत विरोध उत्पन्न होईल, अशा वेषाचाहि तूं त्याग केलास. यामुळें तूं साक्षात अहिंसामूर्ति बनला आहेस.

तुझें हें अहिंसा तत्त्व सर्वांना कल्याणप्रद आहे. गृहस्थ व यतीकरितां तूं अहिंसेचें दोन वेगळें मार्ग सांगितलें. गृहस्थ स्थूलरूपानें अहिंसा पाळतो. तो वनस्पति, जल, वायु, अग्नि, पृथ्वी इत्यादिच्या हिंसेंचा त्याग करू शकत नाही. यत्नाचारपूर्वक स्थावर हिंसेबद्दल तो सावधान असतो; पण त्रस्त जीवांची म्हणजे द्वींद्रिय, त्रींदिय, चतुरिंद्रिय व

पंचेंद्रिय यांच्या हिंसेचा त्याग करतो.

आरंभिक हिंसा, विरोधी, औद्योगिक नि सांकल्पिक असें हिंसेचें चार प्रकार तूं कथन केले आहेत. यांपैकीं सांकल्पिक हिंसेचा त्याग गृहस्थ करतो. धर्म संरक्षणाकरितां, नीतीचें पालन करण्याकरितां किंवा राज्य रक्षणाकरितां गृहस्थ विरोधी हिंसा सावधानपूर्वक करतो. युद्धाच्या वेळीं तो शस्त्र उचलतो आणि जीवन निर्वाहाकरितां शेती-व्यापार इत्यादि क्रिया तो करतो. त्या वेळीं त्याच्या-कडून कांहीं प्रमाणांत हिंसा होते.

पण या साऱ्या हिंसेशी तो प्रामाणिक असतो. हिंसेशी प्रामाणिक हा शब्द-प्रयोग बरोबर वाटत नाहीं. पण खरोखरीच निष्ठावान माणूस केलेल्या हिंसेशी प्रामाणिक असेल, तर त्या हिंसेंतूनहि तो अहिंसेकडे जाईल.

झालेल्या हिंसेबद्दल तो प्रायश्चित्त घेतो. परमे-श्वराजवळ आपल्या दोषांची गाथा वाचतो. असमर्थना प्रगट करतो. हिंसेचें आचरण तो स्वत: दुर्बल आहे म्हणून करीत असतो. म्हणून तो आपल्या आपल्याशीं प्रामाणिक असतो.

तुझं अहिंसेचें प्रतीक म्हणून तूं 'बोकड' निवडला आहेस. बोकडावर जितके अत्याचार झाले तितकें अन्य प्राण्यावर झालें नाहींत. यज्ञांत त्याला मारण्यांत आलं. निरुपयोगी म्हणून मारून खाण्यांत आलं. त्यानं तुझा आश्रय घेतला.

अबलांचं बळ म्हणजे तूं. हिंसेची विरोधक तुझी दया ! तुझा दयामय धर्म !

: ४९ : श्री अरह

पवित्र दिव्यध्वनीला धारण करणाऱ्या तुझ्या धवल यशानें भूमंडल व्यापून टाकलें आहे. तुझी स्तुतीच मला पवित्र करतें. तुझं गुणकीर्तन तर दूरच राहो, पण केवळ तुझ्या नामोच्चारानेहि आमचे संचित पाप दूर होतें. आम्ही भक्तीनें तुझ्या नांवाचा उच्चार करतांच आमचें जीवन पवित्र बनतें. सांसारिक मनुष्याच्या ऐश्वर्याची शेवटची हद्द म्हणजे षट्खंडाचे सार्वभौम चक्रवर्तीपद ! पण तें सर्वश्रेष्ठ ऐश्वर्यहि तूं गवताप्रमाणें तुच्छ मानिलेस आणि क्षणांत त्याचा संपूर्ण त्याग केलास. तूं पवित्र दीक्षेचा स्वीकार केलास. ऐहिक लक्ष्मी तुच्छ मानून मुक्तिलक्ष्मीच्या प्राप्तीसाठीं तूं केलेला हा त्याग खरोखरच आदर्श आहे.

तूं जसा मोहाचा पराभव केला तसा मदना-

चाहि केला. एकदां रति आणि मदन विहाराकरितां निघालें असतां मार्गांत त्यांनीं तुला पाहिलें. त्या-वेळेस त्यांच्यांत मजेशीर संवाद झाला—

"प्राणनाथ! एकाद्या प्रचंड शिलेसारखी स्थिर बसलेली ही मनुष्याकृति कोणाची आहे?" —रति.

"प्रिये! हेच ते त्रिभुवनवंद्य नि जगज्जेते अरहनाथ जिनेश्वर!" —मदन.

"नाथ! आपण तर सर्व विश्वाला अंकित केलें आहे असें म्हणतां. असें असून ही व्यक्ति जगज्जेती कशी?"

"प्रिये! मदनाच्या शरसंधानानें घायाळ न होता त्याच्या कामबलावर विजय मिळणारे जे मोजके लोक या पृथ्वितलावर आहेत त्यांचेहि हे गुरु आहेत. प्रचंड वादळाच्या तडाख्यानें मोठा वटवृक्षहि मुळासकट कोसळून पडावा, त्याप्रमाणें वैराग्याच्या

झावातानें यांनीं आपल्या अंगांतील दुर्धर कामहि मुळासकट उपटून टाकला आहे. त्यामुळें यांच्यावर केलेला शरसंधान शुष्क गवताला पुन्हां संजीवनी देण्याप्रमाणें कठिण आहे."

" वाहवा ! तर मग तुमच्यावरहि विजय मिळविणारे कोणी आहेतच वाटतं. आपण आपल्या शौर्यांचे पोवाडे गाता; पराक्रमाच्या गोष्टीं सांगतां. त्या व्यर्थच तर ! "

" प्रिये ! सर्व राजाधिराज नि चक्रवर्ती यांच्यावरहि प्रभुत्व गाजविणारा सम्राट म्हणजे मोह! त्याचाहि यांनीं युद्धांत पराभव केला आहे. मी तर मोहसम्राटाचा चाकर. माझें या त्रिभुवन–श्रेष्ठ पुरुषापुढें काय चालणार? "

हे प्रभो ! मदनानेंहि तुझ्यापुढें हार खावीं असें तुझं तपोबल! ' हे अर्हत् जिनेश ' सर्व पदा–

र्थांना जाणणाऱ्या आपल्या ज्ञानरूपी ज्योतीनें–प्रकाशानें प्रगट झालेलें तुझें महत्त्व–पूज्यत्व व गुणदोषांचा विचार करणाऱ्या कोणत्या प्राण्याला नम्र बनविणार नाही?

तूं सर्वोदयतीर्थांचा प्रवर्तक आहेस. शांतीचा व समतेचा महान पुजारी आहेस. तुझ्या उपदेशाच्या अमृत जलांत सारें विश्व न्हाऊन निघाले.

तुझ्या तीर्थांत नित्य स्नान करणाऱ्या भक्ताचें प्रतीक म्हणून माशाला तू आदर्श मानलंस.

भक्तिचं जीवन मिळालें नाहीं तर हा मत्स्य तडफडून जीव देईल. भक्ति म्हणजेच त्याचें जीवन! तो जीवनाशी एकरूप झाला आहे.

मी भक्तिचें सोंग केलें, कांहीं काळ भक्तींत आणि सर्व काळ आसक्तींत हाच माझ्यां जीवनाचा

मंत्र झाला. यामुळं दंभी झालें. ढोंगीं झालें. तुझ्या दर्शनानं अद्याप माझे डोळे उघडत नाहीं. माझी विकृत दृष्टि विनष्ट होत नाहीं. विकृत दृष्टि, विकृत ज्ञान आणि विकृत चारित्र्य यामुळं माझी साधना अपुरी आहे.

मी मीनाक्षी आहे. तुझ्यासारखी चंचल आहे. पण भक्तिरसांत सदैव डुंबत राहण्याची कला मज जवळ नाही. तुझे सर्व कल्याणकारी तीर्थ असले तरी त्यांत अवगाहन करण्याची कला मजजवळ नाहीं.

मत्स्या, स्वतंत्र राहूनहि एक रूप होण्याची कला मला शिकव. माझे जीवन प्रभुभक्तींत, मिळन जाऊं दे !

★ ★

## : ५० : श्री मल्लि

रे मल्लिनाथ !

तुझ्या ज्ञानावरचें पटल नाहीसें झाल्यानें गडद निळ्या ढगांतून वाट काढून प्रकाशणाऱ्या तेजाळ सूर्याप्रमाणें तें प्रकाशात आहे. सर्व प्राण्यांना दोनच नेत्र असतात. पण तुझं वैशिष्टय हें कीं तुला तिसरा ज्ञाननेत्रहि लाभला आहे. त्यामुळंच तूं साऱ्या जगताला पाहूं शकतोस.

तुझ्या दिव्यध्वनीनं समस्त जीव मोहित होतात. ही अचेतन भासणारी पृथ्वीहि तुझ्या वाणीनं आकर्षित झाली आहे. सरोवरांतील विकसित कमळांच्या मिषानें ती गालांतल्या गालांत मंद हास्य करीत आहे.

मोहरूपी मल्लाचा तूं पाडाव केला म्हणून इंद्रांनीं तुझे नांव मल्लिनाथ असें ठेवलं. अनेक परा-

क्रमी नि निग्रही लोकांना मोहानं फसवून त्यांचा पराभव केला. मोठमोठ्या ऋषींची अगणित वर्षांची तपश्चर्या धुळीस मिळविली आहे. पण प्रभो! तुझ्या निग्रहापुढे मात्र त्याचा पूर्ण पाडाव झाला.

पूर्ण भरलेल्या कुंभाप्रमाणें तुझं ज्ञान परिपूर्ण आहे. जगांतील सगळा अज्ञानंधःकार तुझ्या ज्ञानाच्या पेटत्या मशालींनें कोठल्या कोठे लुप्त होतो.

मी माझ्या देहाचा कुंभ बनवून तुला अर्पण केला आहे. त्या कुंभावर मस्तकाचे श्रीफळ ठेवलं आहे. अन् अत्यंत नम्रीभूत होऊन माझ्या आत्यंतिक भक्तीचं जल त्यांत भरून ठेवलं आहे. हा पूर्ण कुंभ तुझ्यापुढें अभिषेकाकरितां ठेवला आहे. या कुंभाने मी जलधारांचा वर्षाव करते.

कुंभ हें तुझं चिन्ह ! किती सार्थक प्रतीक ! सारं विश्व म्हणजे एक कुंभ. त्यालाहि व्यापून तुझं

ज्ञान शिल्लक उरतं म्हणून तूं सर्वज्ञ.

प्रत्येकाचा देह म्हणजे एक कुंभ. मातीचा बनलेला. प्रभु–सेवेसाठीं निर्मिलेला. हा कुंभ घेऊन एकाद्या गोपिकेसारखी मी तुझ्या दर्शनासाठीं आतुरतेनें निघालें. भान विसरून निघालें.

वाटेंत विषयवासनेच्या खडकाशीं अडखडून पडलें. माझा कुंभ फुटला. माझा नाईलाज झाला.

दुसऱ्याहि जन्मांत मी तुझ्याकडे यायला निघाले. तुझ्या भक्तिरसांत हा कुंभ भरून घ्यावा. सर्वांगांत तुझं साहचर्य लाभावें. अणुरेणूत सामावूनहि भरून उरावं म्हणून मी वेड्यासारखी निघालें.

कुणी तरी मार्गांतून मला पळविलें. मीं मुर्च्छित झालें. मी तुला विसरून गेलें. कसें दिवस

काढलें हें मला कळालें नाहीं. आज मोहसम्राटाच्या बाहुपाशांतून माझी सुटका झाली आहे.

पुन: हा देह–कुंभ घेऊन मी तुझ्याकडे येत आहे. हा देह–कुंभ अपवित्र, घाण आहे.

पण मी ऐकलं आहे कीं तो कुंभ तुझ्या सेवेनें पवित्र होईल. तुझ्या भक्तिरसानं दिव्य होईल.

माझी दृष्टि सम्यक् झाली-निवळली. माझे ज्ञान सम्यक् झालं. माझं चरित्र सम्यक् झालं. माझा कुंभ पवित्र झाला. मी परिपूर्ण झालें.

● ●

## : ५१ : श्री मुनिसुव्रत

बाह्य राजवैभवांचे क्षणभंगुरत्व तुझ्या ध्यानांत येतांच वृक्षानं पिकलीं पानें झटकून द्यावींत त्याप्रमाणें तूं त्यांचा त्याग केलास. वैराग्याचा प्रादुर्भाव तुझ्या ठिकाणीं होतांच उग्र तपाचा तूं अंगीकार केलास.

शेताला कुंपण घातल्यानें बाह्य शत्रूपासून पिकांचें संरक्षण होतें. तप हे मनाला एक प्रकारचं कुंपणच आहे. त्यानं जगांतील अनेक मोहांपासून मनाचं संरक्षण होतं. शरीर, वचन व मन यांची शुद्धि होते.

तपाभावीं इंद्रियें अनावर होतात नि मनाची स्थिरता बिघडून कार्यांत विघ्नं येतात. आत्म्याचं चिंतवन करणं हेच खरें तप.

एकाग्रतेनं चंचल मन. प्रवृत्तींचा निरोध म्हणजे ध्यान! यास स्थिरतेची अत्यंत जरूरी असते. इष्ट वियोगानें मनुष्यप्राणी आक्रांत करतो नि अनिष्ट संयोगानें तो शोक करतो.

हिंसा करण्यांत, दुसऱ्यांची मालमत्ता लुटण्यांत, धन व परिग्रहाचा सांठा करण्यांत आनंद मानतो. हें त्याचं रौद्रध्यान !

माझ्या अिवल्याशा सुखदु:खांत मी मग्न होतें. थोडीशी सांपत्तिक सुस्थिति असली तर प्रसन्न वाटतं. कांही कमी जास्त झालं तर दु:ख !

सुखदु:खाच्या ऊनपावसांत सदोदित न्हाल्या-मुळं मनास स्थैर्य नाहीं ! मनास आवरण्यासारखी दृढता नाहीं—खंबीरपणा नाहीं.

मनाप्रमाणं अनिर्बंध होऊन वागावें तरी त्याला लागणारे सदृढ शरीर, बलवान मन, कुठं आहे ?

हे कासवा! इंद्रियांचा संयम कसा करावा हे तुला अधिक चांगलें कळते. म्हणूनच कदाचित तुला प्रभूचें प्रतीक होतां आलं.

या धर्म-सरोवरांत तूं मनसोक्त क्रीडा करतोस. तुझीं गात्रें कोमल आहेत, पण तुझी पाठ वज्रासारखीं कठीण आहे ! सुखदु:खाचें आसूड तूं फुलांप्रमाणें झेलतोस. माझं तसें नाहीं. हवं असणारं

मिळत नाही म्हणून मी दु:खी असतें. मिळालेलें अपुरं म्हणूनहि मी दु:खीच !

माझं दु:ख मींच हरण करू शकेन ! पण त्याचा मार्ग मी तुला विचारतें. प्रभूकडे जायचं तर सयमित मनानें, नम्रीभूत हृदयानें जावें हाच तुझा संदेश मला कृतींत आणायचा आहे.

पण तूं मला साहाय्यक हो ! माझ्या जीवन लतिकेला भक्तीच्या कळ्या लागाव्यात, स'यमाचे माधुर्य प्राप्त व्हावें म्हणून माझा प्रयत्न आहे. कूर्म-राज, तूं तुझ्या पाठीवर मला बसवून प्रभूकडे घेऊन चल. तूं स्थिर आहेस ! इंद्रियजित आहेस ! सर्व कार्यजित आहेस !

● ●

## : ५२ : श्री नमि

जनकल्यासाठीं ज्यावेळीं तुझा विहार होतो त्यावेळीं त्या प्रदेशांतील द्वेषभावना लुप्त पावते. सर्वत्र प्रेमभावनेचा प्रसार होतो. लोक आपापसांतील वैर विसरतात.

झाडांना सर्व ऋतूंतील फुलांफळांचा बहर येतो. त्याच्या विविध रंगांनीं सृष्टि खुलून दिसतें. अनेक रत्नांनीं मढविल्यासारखी दिसते. प्रभो ! तुझ्या विहाराच्या वेळीं खट्याळ वाराहि आपली विरुद्ध दिशा बदलून तुझ्या विहारानुकूल बनतो. सारीं सृष्टि झाडून स्वच्छ ठेवतो. पुष्पांचें पराग आणून तें तुझ्या मार्गांत पसरतो. दाही दिशा प्रसन्न वदनानें तुला नमस्कार करतात.

पण मी तुझी वाट पाहता पाहतां थकले. सारी सृष्टि तुझ्या स्पर्शानें पुलकित झाली. पण मी

तशीच राहतें आहें. तुझा पादस्पर्श जरी झाला तरी मी स्वत:स धन्य मानलें असतें.

जवळ असूनहि माझ्या प्रभूला मी पाहूं शकलें नाहीं. प्रभूच्या मंगलवीणेचा निनाद सर्वत्र निनादत असतांनाहि मला ऐकूं आला नाही. तूं भेटायला आला असतांहि मी भेटूं शकलें नाहीं.

प्रभूची पाद–सेवा कशी घडेल याच एका चिंतनेंत मी होतें. तुझं आगमन माझ्या गांवांत होणार ! तुझं दर्शन मला घडणार ? मी माझ्या हृदयाची सुनील कमलें जागोजाग पसरून ठेवणार आहे. त्या कमलावर तूं पाय ठेवित ये. माझ्या मस्तकावर तुझा पायधूळ पडूं दे. मला कृतार्थ होऊं दे.

● ●



श्री नेमिनाथांना त्यांची पत्नि राजुल संसार प्रवृत्त करीत आहे.

: ५३ : **श्री नेमि**

गगनचुंबी शिखरांकित गिरनारपर्वतावर तुझा निवास ! महान् तपस्वी म्हणून तूं जगाला तेथून दर्शन देतोस. या गिरनार पर्वतावरच तूं संसारत्याग केलास. कैवल्याचा व निर्वाणाचा महोत्सवहि देवांनीं येथेंच साजरा केला.

तुझ्या या पर्वतावरील सतत सहवासानें येथील अणुरेणु मंगल बनला आहे. येथील झाडं-झुडपं, पशुपक्षी नि मृत्तिकेचा प्रत्येक कण तुझ्या पदस्पर्शानें पुनीत बनला आहे. कोटयावधि आत्म-पिपासू आत्म्यांनीं या पर्वतावर महान् साधना केली आहे.

अनेक पशु-पक्ष्यांच्या लुसलुशीत मांसाची मेजवानी तुझ्या लग्न-प्रसंगी देण्यांत येईल हें कळतांच तू विवाहबंधनें झुगारून देऊन मुक्त झालास. होणारी पत्नी राजूल अत्यंत दु:खी झाली. तिचं

जीवन बिकट भविष्यानं अंधारून गेलं. भौतिक सौख्याच्या आधीन होऊन तिच्या अप्राप्तीनं तडफ– णाऱ्या राजुलमतीस अध्यात्मसुखाच्या उच्च वाता- वरणांत तू नेलंस. तुझ्याबरोबरच तिचं जीवनहि पुनीत केलंस !

राजुलदेवि, तारुण्यांत तुला याच प्रभुकडून सुरतसुख मिळावं, पतिदर्शनानं उफाळून आलेल्या प्रेमभावनांचं उपशम व्हावा, म्हणून लग्न कराव– वयास किती आतुर होतीस तू !

तारुण्याचे सर्व सुख–सोहाळे टाकून देऊन विरागी बनलेल्या पतीच्या मागें तू धांवत गेलीस.

तुला वाटलें होतें, आपल्या मधुरवाणींनं त्याला परत घराला आणीन. तू त्याच्याकडे गेलीस. त्या प्रभूची पावलें धरून तू म्हणालीस, 'मला एकदां तरी आलिंगन दे. माझ्या या मुसमुसलेल्या वक्षः–

स्थळांना प्रमुदित कर ! माझ्या रक्त–ओष्ठांतील अमृताचं एकदां तरी मनसोक्त पान कर. फक्त एकदांच मला तूं माझी म्हण ! '

या प्रेमवचनांनींहि जेव्हां तो वश होईना, तेव्हा तुझं कावेबाज स्त्रीमन प्रभूवर रागावलं. कारण सौन्दर्याचा तो अपमान वाटला तुला. कामिनीच्या यशाला लावलेला कलंक वाटला तुला. एखाद्या नागिणीप्रमाणें तूं प्रभूवर फूत्कार सोडलेस.

पण पहातें तों प्रभूच्या चेहऱ्यावर अनिर्वंद्व स्मित ! त्या स्मितानें तुझा अहंकार नष्ट झाला. तुझा काम विखारहि नष्ट झाला.

प्रभू म्हणाले, ' प्रिय, तूं पत्नी नाहींस, स्त्री नाहींस. मी पति नाहीं; पुरुष नाहीं. आपण दोघेहि चेतनाशील जीव आहोत. भोगापासून आनन्द मिळेल. पण त्यांत दुःखहि आहे. मीहि मृत्यु मानलें असते

नों. दि.

स्वतःला जर तूंहि माझ्याप्रमाणेंच विचार करू शकली असतीस. देहातींत विचार! आत्म्याचा विचार! असा विचार कीं जेथून पुनः हा संसार नाहीं!'

राजुल, प्रभूचा मार्ग तूं पत्करला. प्रभूहून कठोर तपश्चर्या केली. प्रभु पुरुष होते. तूं स्त्री होतीस!

स्त्रीसुलभ साऱ्या भावनांना जाळून तूं अमर झाली. नेमिनाथांच्या यशाची धवलता तुझ्या आत्मत्यागानें अधिकच धवल झाली.

गिरनारचं वैभव म्हणजे तूं! अबलेच्या आत्मसमर्पणाची दिव्य पताका तू रोवली. भारतीय नारीचा दिव्य आदर्श तूं तेथें आपल्या अमर चारित्र्यानं निर्माण केला.

तुझ्या यशाचा घोष शंखाने नित्यशः करावा;

तुझ्या मंगल त्यागाचे पोवाडे गाइले जावेत; तुझ्या सारख्या स्त्रिया भारतांत निर्माण व्हाव्यात म्हणून प्रभूनं तुझ्या दिव्य प्रेमाचं प्रतीकं म्हणून ' शंख " निवडला आहे.

हे शंखा, प्रेमाच्या पागलपणांत साहित्य, धर्म आणि संस्कृति यांचा लोप करणाऱ्या प्रवृत्तीच्या विरुद्ध आवाज कर. माझ्या मनांतील सद्विचारांना आवाहन कर. तुझ्या आवाजानें माझ्या अहंकाराचा फणा नष्ट कर.

प्रभूच्या चिंतनाशिवाय कसलीहि गोष्ट घडू नये म्हणून मी तुला आदर्श ठेवतें.

● ●

## : ५४ : श्री पार्श्व

सुखी व्हावं म्हणून तुझी मानव पूजा बांधतो. अनेकदां त्याला वाटतं, हा सर्व संसारभार उतरून ठेवावा. विरागी व्हावं.

अचिंत्य शक्ति असलेल्या आत्म्याची कदा- काळीं आठवण होते. देहाविषयीं अनुताप होतो. देहाची गुलामगिरी नष्ट करण्याचा आणि आत्म- सम्राट बनण्याचा निश्चयहि मी करतें.

पत्त्यांचा बंगला क्षणात नष्ट होतो. पुनः मी संसारांत रमते. पति सुखांत तल्लीन होते. स्वतः- च्याच आगींत जळून स्वतःला धन्य मानते !

शरण जाण्यास तूंच योग्य आहेस. तूंच शिव, तूंच शंकर, तूंच विष्णु, तूंच ब्रह्म आहेस. मांगल्य तूंच. त्राताहि तूंच, म्हणून तुझ्याकडे येते. पण तुझं दर्शन घडत नाही.

जेव्हां मी जन्माचा विचार करतें, तेव्हां हत-बुद्ध होते. मरणाचा विचार करतें तर मन घाबरून जातें. मरणाइतकीं निश्चित कोणतीहि गोष्ट नस-तांना तिचा विचारच मी केला नाहीं. मरणाच्या बिचारावरच धर्माची साधना साधक करतो. ठरलेल्या वेळीं ठरलेलें काम व्हावें. म्हणून घातलेली मर्यादा. म्हमजे मरण ती मर्यादा ओलांडून मी तुझ्याशीं समरस होईन.

सामाजिकतेंत माझें व्यक्तित्व, माझें एकत्व मी विसरून जातें. मी एकटी आलें, एकटीच जाणार. माझी सुखदु:खें मला एकटीलाच भोगावी लागणार म्हणून किती कष्टी होते. पण मला तुझ्या नाम–स्मरणानें धीर येतो, मला प्रकाशाचीं किरणें दिसतात. ओष्ठ पुलकित होतात. मी तुझ्या नामस्मरणानें हर्षित होतें.

मी माझ्या भौतिक पसाऱ्याकडे पाहते. माझें शेंकडों मित्र–मैत्रिणी दिसतात. मी बांधलेलीं घरें, वाडें, इमलें आकाशाला स्पर्श करीत आहेत. माझी रौप्यतुला, सुवर्णतुला, रत्नतुला झाली असून तें सर्व मी दान केलें आहे. माझे हें भौतिक वैभव पाहून क्षणभर मी थक्क होतें. हें माझ्या मृत्यूनन्तर दुसऱ्याचें होणार. जें दुसऱ्याचें होणार, तें माझें कसें. पूर्वी तें कुणाचें तरी असणार ! दुसऱ्यांचे म्हणजे उच्छिष्ट !

त्या उच्छिष्टाला मी माझें मानलें. मी त्याला कवटाळलं. निर्वाहाच्या साधनाला साध्य समजलें. हें सारें वेगळे ! संपूर्णतः वेगळे !

हा माझा विचार स्थिर व्हावा म्हणून हें प्रभ, मी तुझ्याकडे आलें.

तूं संकल्पदाता आहेस, म्हणून तुझ्या नांवावर

मंत्र–तंत्र करतात. जारण–मारण–ताडण या भौतिक साधनेंत ते तुझा उपयोग करतात.

सुवर्णसिद्धीसाठीं तुझ्या नामाचा उपयोग करणारे मांत्रिक माझ्या पहाण्यांत आहेत.

विघ्नहर्ता म्हणून अखिल जैन–समाज तुला 'ताईता' सारखं समजतात. तुझ्या नामस्मरणानें अनेकांची विष–बाधा दूर झालेली मी पाहिली आहे. तुझ्या स्मरणानें अन्धाला दृष्टि आली आहे. तुझ्या पद-स्पर्शानें निर्धनहि धनवान झालेला माझ्या घराजवळ राहात आहे.

पण प्रभो, मला हें भौतिक विश्व नको आहे. मला सेवक व्हायचें आहे. तुझ्या शिरावर तूं सहस्र फणांचा नाग धारण केला आहेस.

या नागराजानें तुझी सेवा केली. एकदा तुझ्यावर क्रुद्ध होऊन कमठानें तुझ्यावर भयंकर

आघात केले. दगडांचा वर्षाव केला. विजांच्या कडकडाहूनहि भयानक अशा गर्जना केल्या. सूडाची भावना त्याच्या हृदयांत जागृत झाली. ती शम–विण्यासाठीं त्यानें आपलें सर्व पाशविक सामर्थ्य उपयोगांत आणलें.

पण तुझं स्मित भंग करण्याचें सामर्थ्य त्याच्याकडं नव्हतं. याच वेळीं या नागराजानं तुझी सेवा केली. या नागराजांची पत्नी पद्मावती हीहि तुझ्या सेवेला धावून आली. दोघांना परमावधीचं दुःख झालं. पण प्रभो, आपण कमठाला क्षमा केली. क्षमेचं सामर्थ्यं चकचकित झालं. उज्वल झालं.

त्या दिवसापासून माता पद्मावती तुझी सेवा करूं लागली. त्या सेवेचं अमर प्रतीक म्हणून तूं नागफणा धारण केली आहेस. नागाला तूं क्षमा शिकविलीस हे फारच उत्तम केलंस ! ज्यांना विष

नाहीं, प्रत्याघाताचं सामर्थ्य नाहीं, जे दुर्बळ आहेत त्यांना क्षमा शोभत नाही. दृष्टिमात्रें करून ज्याचं विष पसरतं त्या नागराजाला क्षमेचा आदर्श म्हणून जागा दिलीस !

हे विघ्नहर्त्या प्रभूराजा, जीवन ज्योतीला काजळी लागण्यापूर्वी तुझा कृपाप्रसाद व्हावा.


तुझ्या नामस्मरणानं माझं जीवनपुष्प विकसित व्हावं, सुरभित व्हावं, सुकांक्षित व्हावं, सुनिर्मल व्हावं, सुप्रतिष्ठित व्हावं हीच माझी प्रार्थना.

● ●

## : ५५ : श्री वर्धमान

मनोज्ञ असं तुझं परमात्मस्वरूप पाहून माझं मन मोहरून जातं. तुझं हें रूप कधींहि नाश पावत नाहीं म्हणून तूं अव्ययी तुझी चिन्मयशक्ति सर्व चराचरांना प्रेमानं कवटाळिते म्हणून तूं बिभु आहेस. तुझे गुण अचिंतनीय म्हणून तूं अचिंत्य आहेस तुझ्या गुणाची संख्या मोजता येणं अशक्य आहे म्हणून तूं असंख्य आहेस. तुझ्यापासून हें शासनतीर्थ सुरूं झालं म्हणून तूं शास्ता आहेस, तूं प्रमोदाचा निधान आहेस म्हणून तूच ब्रह्मदेव शोभतोस. तूं कृतकृत्य झालास म्हणून तुला ईश्वर हें नांव शोभून दिसतं.

केवलबोधानें युक्त आहेस म्हणून तुला लोक बुद्ध म्हणतात. तूं साऱ्या भुवनत्रयास सुखी करतोस म्हणून तू शंकर आहेस. पुरुषांच्या सर्व दुर्गुणावर नि विकारावर तूं विजय मिळविल्यानें



भ. महावीरांचा निर्वाण महोत्सव

संग्रहालय
अनुक्रम
विभाग

खरा पुरुषोत्तम शोभतोस.

तूं त्रिशलेचा पुत्र ! भौतिक—आधिभौतिक, दैविक या तीन शल्यांपासून तूं मुक्त आहेस. क्रोधादि विकारापासून सर्वथैव मुक्त झाला म्हणून तूं वीर!

अहिंसेचा सम्राट म्हणून सारं जग तुझी पूजा करतं. दयेची मांगल्यमूर्ति म्हणून तुझी स्थापना मंदिरात, अभ्यासिकेंत होत आहे.

हिंसेशिवाय जीवन नाहीं या वादांत तूं हिंसेलाच पराभूत केलंस. हिंसेशिवायहि जीवनाचा रथ मार्ग आक्रमू शकतो हें तूं जगाला दाखविलं.

यज्ञांतील हिंसा धर्म्य मानणाऱ्यांना तूं हात धरून सन्मार्गाला आणलंस. आईनं बालकांना आणावं तसं. हें करतांना तूं आईच्या ममतेनं वागलास. सारी भारतीय दर्शनें तुझ्या या मोलाच्या सिद्धान्तानं भारावली.

भारतीय दर्शनशास्त्रें कारुण्यानं ओथंबलीं. तुझ्या या सिद्धांतानें लोकांना भक्तीमार्ग सुचला. कारण ज्ञानानें गर्व वाढू लागतो. पण भक्तीनें नाहीं. चारित्र्यानें अहंकार मूळ धरू शकतो. पण भक्तीनें नाहीं.

भक्तीनें भक्त स्वत:ला विसरले. तें तुझ्याशीं एकरूप झाले. ते तादात्म्य पावले. तूं रंगून गेलास भक्तांचा मेळावा वाढत गेला. तुझ्या नामाचा गज-रहि निनादत राहिला. सर्व भक्त देहभान विसरले, मनें भक्तिरसानें न्हाऊन निघालीं. आत्मे तुझ्या रसांत भिजून निघाले.

मी ज्ञानी नाहीं. चारित्र्यवान नाहीं. भक्ति हेंच माझं मनोकलेवर. भक्ती हेंच माझं जीवन. भक्तीच्या प्रकाशांत मी माझी भावपल्लवी तुला अर्पण करणार आहे.

सत्याचं तेज प्रगट करायला असत्याचं पोलादी कवच दूर सारलं पाहिजे. तें कवच सिंहाच्या नखांनीं भेदून टाकून तूं सत्याचं दर्शन जगाला घडविलंस!

तूं एवढा विहार (प्रवास) केला कीं, ज्या प्रांतात तूं हिंडलास त्यास विहार हें नांव प्राप्त झालें. अडीच हजार वर्षानन्तरहि तो प्रदेश बिहार म्हणून प्रसिद्ध आहे !

कार्तिक कृष्ण अमावस्येला पावानगरीस तूं निर्वाणपदास प्राप्त झालास. साऱ्या गणतंत्रीय राजांनीं पावापुरीस येवून तुला श्रद्धांजली वाहिली. सहस्त्र सहस्त्र दीपज्योति पाजळून तुझा निर्वाण-महोत्सव साजरा केला. आजहि छत्तीस कोटी लोक या दिवशीं शुचिर्भूत होऊन उत्सव साजरा करतात.

मी दि ..............

चि. .................. [illegible] ..................

मी तुला दीप दाखवावा, हें मला शास्त वाटत नाहीं. माझ्या दीपाचा प्रकाश माझ्या दीपाची तूं ज्योत, माझ्या दीपाचं तूं कलेवर !

वीरनाथा, तुझ्या कृपाछत्राखाली मी निर्भय झालें आहे. विकार शांत झालें आहेत. सर्व जग शांत आहे. केवळ मंगल ॐकार ध्वनि सर्वत्र निनादत आहेत.

त्या ध्वनींतच माझी भावपल्लवी पल्लवित झाली आहे, ती तुला सादर समर्पण.

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 30755
विभाग का. वा.
क्रमांक 2325
नों. दि.

# सुरस प्रकाशनें

| | |
|---|---|
| | रु. |
| छत्रसाल–वालचंद शहा, ३ री आवृत्ती ... ... | ३ |
| भिरभिरे–गंगाधर गाडगीळ ... ... | ३ |
| तू भेटायला नको होतास–डॉ. कु. सरोजिनी बाबर ... | ३ |
| मायेचा पाझर–शांता शेळके ... ... | ३॥ |
| सर्व हक्क स्वाधीन–बोकील ... ... | ४ |
| भूकबळी–सुरेश शर्मा ... ... | २ |
| पूर्व आणि पश्चिम–शांतिलाल भंडारी ... ... | ४॥ |
| अल्मिनार–पद्माकर डावरे ... ... | ३ |
| जीवननृत्य–मिनाक्षी साने ... ... | ३॥ |
| बजाजी निंबाळकर–वालचंद शहा. ... ... | ४ |
| नौकाडुबी–टागोर, २ री आवृत्ती ... ... | ५ |
| गोषांतील सुंदर स्त्रिया–कोठारी, ३ री आवृत्ति... ... | ५ |
| जागरण–अरविंद गोखले ... ... | ३ |
| पाटलाची लेक–चौगुले ... ... | ३ |
| ओझरती नजर–नाईक के. मा.; २ री आवृत्ति ... | ३ |
| मदिरा–मस्तानी–भांगरे, २ री आवृत्ति ... ... | २॥ |
| सैन्य चालले पुढें–बोकील ... ... | ३ |
| कावळा व ढापी–न. चिं. केळकर ... ... | ४ |
| क्रांतीवीर रासबिहारी बसू–बाळशास्त्री हरदास ... | १॥ |
| तिसऱ्यांदा चिमणराव–चिं. वि. जोशी ... ... | ३ |
| भावकला–ल. रा. पटवर्धन ... ... | ६ |
| हिरवा चुडा–डॉ. कु. सरोजिनी बाबर ... ... | २ |
| कुमार अशोक–लिमये ... ... | ५ |
| जगाचा बाजार–भाग १ ते ३, प्रत्येकीं ... ... | ५ |
| सोनेरी खंजीर–ग. वि. कुलकर्णी, ३ री आवृत्ति ... | २॥ |
| धरणीकप–वि. वा. हडप ... ... | ४ |
| अजिता–डॉ. कु. सरोजिनी बाबर ... ... | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| हिंदी–मराठी कोश–संपादक–प्रि. सुमेरजी | ... | ... | ३;५. |
| सत्यमेव जयते | ... | ... | ३ |
| ऐक माणसा तुझी कहाणी–प्रा. आठवले | ... | ... | १।।। |
| अर्धपुतळा ,, | ... | ... | १।। |
| स्त्रियश्चरित्रम् ,, | ... | ... | ३ |
| हा व्यवहार आहे ,, | ... | ... | २ |
| पांढरा बाजार ,, | ... | ... | १।।। |
| उगवते अंकुर–वालचंद शहा | ... | ... | ६ |
| रावबाजी ,, | ... | ... | ६ |

## पॉकेट प्रकाशनें

### रु. १–१४–० प्रत्येकीं

| | | |
|---|---|---|
| परिवर्तन (विकी बाम)– | ... | प्रा. वुद्धिसागर |
| संघर्ष | ... | शांतिलाल भंडारी |
| जटाशंकर–२ री आवृत्ति | ... | द. भि. रणदिवे |
| चंद्रकाता–२ री आवृत्ति | ... | ,, |
| गोरा–(गुरुदेव टागोर) २ री आवृत्ति | ... | प्रा. वुद्धिसागर |
| विश्वामित्र | ... | वालचंद शहा |
| संसार–प्रबोधकुमार संन्याल | ... | शं. बा. शास्त्री |
| प्रवाह | ... | प्रा. मा का. देशपांडे |
| क्षिप्रा | ... | शरश्चंद्र मुक्तिबोध |
| पतिपत्नी–(गुरुदेव टागोर) ३ री आ. | ... | वा. रा. कोठारी |
| कमळाचं जाळं ३ री आ. | ... | डॉ.कु.सरोजिनी बाबर |
| विजय कमान | ... | स. शं. देसाई |
| आशेची पहांट | ... | द. का. हसमनीस |
| एरिक | ... | अंबादास देवळे |
| मनीषा | ... | सौ. कुमुदिनी रांगणेकर |
| सौभाग्य | ... | मा. वि. आपटे |

प्रतिभा ... द. का. हसमनीस
मधुर मीलन ... सौ. प्रभावती केसकर
शनिवारवाडा ... वालचंद शहा
दिवास्वप्न ... सुरेश शर्मा
हृद्गंध ... पं. सुमतीबाई शहा
देवबाप्पा ... सौ. नलिनी शहा
तुमचा आमचा संसार ... वि. वि. बोकील
वहिनी ... श्रीनिवास कोचकर
मातृत्व ... प्रा. बुद्धिसागर
जातकुळी ... सौ. नलिनी शहा
घरकुल (इमिली ब्रॉंटि) ... प्रा. निरंतर
काजळीरात्र ... ना. रा. शेंडे
सारंच जगावेगळं ... जिआँ पॉल सार्त्र
आई ... मॅक्झिम गॉर्की
कुळाईची आन ... सौ. नलिनी शहा
मी ... फ्राँसोआ मॉरिआक
ज्ञानगंगा ... के. मा. नाईक
भाव पल्लवी ... पं. सुमतिबाई शहा

● ● ●

अमरकोश पॉकेट साइस हिंदी–मराठी–हिंदी रु. ४
,, क्राऊनसाइस कापडी बाइंडिग रु. ७

# सु र स सा क्ष र मा ला

## प्रत्येकीं ५० नये पैसे

★ हर्षचरित्र ★ कादंबरी
★ मुद्राराक्षस ★ रघुवंश

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २

शुभ्र व दाणेदार साखरेचे कारखानदार
मध्यम वर्गाच्या भांडवलाचा व
मालकीचा एकमेव

★ म्हणजेच ★

## —: सिंडिकेटचा साखर कारखाना :—

---


## मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.


★

व्याजाचा दर व इतर माहितीसंबंधीं
पत्रव्यवहार करावा.

★

| | |
|---|---|
| ९८० सदाशिव पेठ,<br>लक्ष्मी पथ,<br>पुणें २ | दि. ब. नीळकंठ चिंतामण लिमये<br>C. B. E., B. A., LLB.<br>अध्यक्ष. |




गेल्या २५ वर्षांपासून विशाल राष्ट्रीय योजना वालचंद समूहाच्या संचालकत्वाखाली चालणाऱ्या उद्योगधंद्यांवरच विश्वासपूर्वक सोंपविल्या जात आहेत. योजनांच्या प्रारंभापासून प्रत्यक्ष पूर्ततेपर्यंत वालचंद समूहानें राष्ट्राच्या आकांक्षा सदैव परिपूर्ण केल्या आहेत... वालचंद समूहाची कार्यक्षमता, साधनसामुग्री व त्यांचा बहुमोल दीर्घ अनुभव यामुळेंच त्यांना हातीं घेतलेलें कोणतेहीं कार्य यशस्वीपणें पार पाडतां येतें. त्यांच्या सल्लामसलतीमुळें आपला फायदाच होईल.

# वालचंद समूह उद्योग



प्रीमियर कन्स्ट्रक्शन कं. लि.

मुख्य कार्यालय :
**कन्स्ट्रक्शन हाऊस,** विटेट रोड, बॅलार्ड एस्टेट,
फोर्ट, मुंबई-१.

★ कमालीचा स्वस्त !

ना. चव्हाण पुरस्कृत

# अमर कोश

## हिन्दी-मराठी-हिन्दी

★

| | |
|---|---|
| शब्दसंख्या | २१,००० |
| वाक्प्रचार | २५०० |
| म्हणी | ५०० |
| समोच्चारित शब्द | ४०० |
| विपरीतार्थबोधक | ३०० |

★

पृष्ठें ५२५ कि. ४ / रु.

पोस्टखर्च निराळा.

★ ★

सु र स ग्रं थ मा ला, सो ला पू र.

USE

# HUME PIPES

FOR

- ✦ WATER SUPPLY,
- ✦ DRAINAGE CULVERTS,
- ✦ DUST BINS,
- ✦ CABLE CONDUITS,
- ✦ SEPTIC TANKS,
- ✦ CHANNELS,
- ✦ TANKS,
- ✦ SENTRY CABINS,
- ✦ CATTLE TROUGHTS,
- ✦ LATRINES, etc.

*Sizes from 3" to 96" Diameter*

★

Excellent tests are taken.
Excellent testimonials are obtained

Over 60 Factories all over
India, Pakistan and Ceylon

★

*Head Office :*

**The Indian Hume Pipe Co. Ltd.**

**Construction House, Wittet Road,**
**Ballard Estate, BOMBAY 1.**

*Phone:* 262994 (3 Lines) *Grams:* "Humepipe"

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. ................. प्रा. दि .. ..............


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेडच्यूल्ड बँक

भांडवल

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. २३,५०,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | रु. ११,५०,००० |
| खेळते भांडवल | रु. ९,२५,००,००० चे वर |

संचालक मंडळ

श्री. वा. पु. वर्दे, अध्यक्ष — श्री. न. ग. पवार, उपाध्यक्ष
श्री. धों. कृ. साठे — श्री. फ. दो. पदमजी
श्री. मा. वी. शहा — श्री. भा. म. गुप्ते
श्री. न. बा. जांभेकर — श्री. म. स. पारखे

**शाखा :**

अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बेळगांव, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), भिवंडी, चाळिसगांव, धुळें, हरिहर, हिंगोलें, हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, लातूर, नागपूर, नांदेड, नाशिक, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना, खडकी व सोमवार पेठ, टिळक रोड), रत्नागिरी, सांगली, सोलापूर ( फलटण गल्ली व मुरारजी पेठ ) श्रीरामपूर व ठाणें.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता,
पुणें २.


IRBK-0106982

IRBK-0106982